# अधिसूचना

नाशिक महानगरपालिका
कार्यालय,नाशिक . ४२२००१
दिनांक : ०४/०८/२००६

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९**
शासन निर्णय क्रमांक - नामपा/१९०५/१००२/प्र.क्र.२१९/२००६ नवि-२५/दि.२६ जुलै २००६.
मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) अंतर्गत कलम १४९ च्या उपकलम १ आणि कलम १२७ च्या उपकलम (२) मधील खंड (अ), कलम ४५५ च्या उपकलम (२)आणि कलम ४५७ च्या खंड ७ मधील उपखंड (क) नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार, आणि या संदर्भात पूर्वी तयार करण्यात आलेल्या सर्व नियमांचे अधिक्रमण करुन नाशिक महानगरपालिका, उक्त कायद्याच्या कलम १४९ मधील उपकलम (२) मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेने, उक्त कायद्याच्या कलम ४५५ उपकलम (१) प्रमाणे पूर्व प्रकाशित करुन,महानगरपालिका क्षेत्रात जकात कराची आकारणी, निर्धारण आणि संकलन यासंबधी खालील नियम करीत आहे.

## नियम

१) **संक्षिप्त नाव-**

(१) या नियमांना नाशिक महानगरपालिका (जकात) नियम, २००५ असे संबोधण्यात येईल.

२) **व्याख्या :-**

या नियमात,संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, -

(अ) अधिनियम याचा अर्थ,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९ (१९४९ चा मुंबई ५९)

(आ) **महानगरपालिका** याचा अर्थ नाशिक महानगरपालिका.

(इ) आयुक्त या संज्ञेत हया नियमांच्या तरतुदींद्वारे किंवा अन्वये आयुक्तांकडे प्रदान केलेल्या किंवा त्यांचेवर सोपविण्यात आलेल्या किंवा त्यांच्याकडे असलेले अधिकार,कर्तव्ये आणि कार्ये यांचा वापर करण्यासाठी,पालन करण्यासाठी किंवा पार पाडण्यासाठी अधिनियमांच्या कलम ६९ च्या पोट-कलम (१) अन्वये आयुक्ताद्वारे शक्ति प्रदान करण्यात आलेला कोणताही महानगरपालिका, अधिकारी किंवा कर्मचारी,याचा समावेश होतो.

(ई) **शुल्क देय माल** याचा अर्थ अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला माल.

(उ) **प्रवेश नाका** याचा अर्थ,आयातीच्या प्रयोजनासाठी माल जेथे येतो असा जकात नाका.

(ऊ) **निर्गमन नाका** याचा अर्थ ,निर्यातीच्या प्रयोजनासाठी माल जेथे येतो असा जकात नाका.

(ए) **निर्गत नाका अधिकारी** याचा अर्थ निर्गत नाक्यावर निर्यातीचे कामासाठी असलेला महानगरपालिकेचा सेवक.

(ऐ) **निर्यात** याचा अर्थ महानगरपालिकेच्या जकात हद्दीतून अशा हद्दीबाहेर कोणत्याही ठिकाणी कोणताही माल हलविणे किंवा घेऊन जाणे.

(ओ) **निर्यातक** याचा अर्थ,आयात देयकात आयातक म्हणून दर्शविलेली व्यक्ती आणि आयात केलेला माल,या नियमांच्या तरतुदीनुसार निर्यात करणारी व्यक्ती.

(औ) **शासन** याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य शासन.

(अं) **नमुना** याचा अर्थ,या नियमांना जोडण्यात आलेला नमुना.

(अः) **आयात** याचा अर्थ, महानगरपालिकेच्या जकातीच्या हद्दीबाहेरुन अशा हद्दीच्या आत कोणत्याही ठिकाणी कोणताही माल आणणे किंवा मालाचा प्रवेश करणे. यामध्ये कोणत्याही शासकिय अथवा खाजगी मालकीच्या ठिकाणांचा समावेश आहे.

(क) **आयातक** याचा अर्थ,कोणताही माल आयात करणारी व्यक्ती असा आहे आणि यात आयातीच्या वेळी ज्याच्याकडे मालाची मालकी आहे अशा व्यक्तीचाही समावेश होतो.

(ख) **जकात हद्दी** याचा अर्थ, विविक्षीत वेळी अस्तित्वात असल्याप्रमाणे किंवा वेळोवेळी वाढविण्यात आलेल्या किंवा कमी करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या हद्दी.

(ग) **जकात नाका** याचा अर्थ,ज्या ठिकाणी मालाची आयात किंवा निर्यात केली जाते असा महानगरपालिकेचा नाका.

(घ) **जकात अधिकारी** याचा अर्थ, जकात नाक्याच्या प्रभारी असलेला किंवा जकात नाक्याशी संबंधीत असलेला महानगरपालिकेचा अधिकारी किंवा सेवक असा आहे आणि यात महानगरपालिकेच्या जकात विभागात काम करणारा कोणताही अधिकारी किंवा आयुक्तांनी या बाबतीत प्राधिकृत किंवा पदनिर्देशित केलेला कोणताही अन्य अधिकारी यांचा समावेश होतो.

(च) **नियम** याचा अर्थ अधिनियमाच्या कलम ४५७ च्या पोट कलम (७) व (१७) अन्वये आणि कलम १४९ च्या पोट कलम (१) अन्वये जकातीची आकारणी व वसुली करण्याकरीता महानगरपालिकेने तयार केलेला/केलेले नियम.

(छ) **अनुसूची** याचा अर्थ, या नियमांना जोडण्यात आलेली अनुसूची.

(ज) **कलम** याचा अर्थ, अधिनियमांचे कलम.

(झ) **विक्रेता** म्हणजे कोणतीही व्यक्ती की जो, दलाली,मोबदला किंवा इतर फायद्यासाठी मालाची खरेदी/विक्रीचा व्यवसाय महानगरपालिका जकात हद्दीत करीत आहे त्यास विक्रेता असे संबोधण्यात येईल तसेच यामध्ये कोणतीही सोसायटी,क्लब,असोसिएशन किंवा संघटना यांनी त्यांचे सभासदांसाठी मालाची खरेदी करुन विक्री करीत असतील त्यांचाही समावेश करण्यात येत आहे.

(ट) **स्थायी आदेश** याचा अर्थ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६६ (अ) (१) प्रमाणे महानगरपालिका आयुक्त यांनी प्रस्तुत केलेले स्थायी आदेश.

(ड) **मालाची किंमत** याचा अर्थ,जकात कर आकारण्यासाठी मालाच्या किंमतीचे प्रमाण म्हणजेच नियम क्र.१७ मधील तरतूदीनुसार निर्धारीत केलेली किंमत.

### ३) जकातीचे स्वरुप आणि आकारणी आणि जकातीस पात्र असलेला माल :-

१) अधिनियमाच्या व त्या अन्वये तयार करण्यात आलेल्या नियमांच्या तरतूदी यांना अधीन राहून अनुसूची एक मधील स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आणि महानगरपालिकेच्या हद्दीत खप,वापर,उपयोग व विक्री किंवा इतर अन्य कारणाकरीता आयात करण्यात येणा-या मालावर महानगरपालिका जकात आकारील.

२) कोणत्याही मालावर महापालिकेद्वारे आकारण्यात येणा-या जकातीचा दर हा अनुसूची (१) मधील स्तंभ (४) मध्ये नमूद केलेल्या दरापेक्षा कमी असता कामा नये व स्तंभ (३) च्या कमाल दरापेक्षा जास्त असता कामा नये.

३) किमान/कमाल दरास शासनाने मान्यता दिल्यानंतर किमान दर अस्तित्वात येतील. या दरात कमाल दरापर्यंत वेळोवेळी वाढ करण्याचे अधिकार महापालिकेला राहतील. त्यासाठी शासनाची वेळोवेळी मान्यता घेण्याची आवश्यकता राहणार नाही.तथापि कमाल दरापेक्षा अधिक दराने किंवा किमान दरापेक्षा कमी दराने आकारणी करावयाची असल्यास त्यास शासनाची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल.

४) या नियमांतर्गत जकात दराची रचना,दरात वाढ अथवा घट करतांना अनुसूची १ च्या स्तंभ (२) मध्ये समाविष्ट असलेल्या विविध वस्तूसाठी आणि त्यांचे वेगवेगळे प्रकार या गुणवस्तू यासाठी वेगळे दर आकारण्याचा अधिकार महापालिकेला राहिल. तसेच जकात कर आकारणीसाठी या अनुसूचीत नविन वस्तूंचा समावेश करण्याचा अधिकार महापालिकेला असेल.

४) **जकातीपासून सुट मिळालेला विशिष्ठ माल :-**

अनुसूची दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालापैकी कोणत्याही मालावर त्या समोर उल्लेखलेल्या शर्ती किंवा अपवाद (असल्यास) यांच्या अधीन राहून अनुसूची २ भाग १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालावर कोणतीही जकात देय असणार नाही.

(१) भाग १ मध्ये महानगरपालिकेस ज्या मालावर जकात देय असणार नाही अशा मालाची यादी.

(१ अ) भाग १ अ ज्या मालावर विवक्षित औद्योगिक उपक्रमांकडून कमी दराने जकात देय असेल अशा मालाची यादी.

(२) भाग २ महानगरपालिका नवीन/आजारी उदयोग इ. औद्योगिक प्रकल्पास (मेगा प्रोजेक्ट) महासभेवर धोरणात्मक निर्णय घेऊन जकात सवलत देणे बाबत.

(३) महानगरपालिकेच्या मते शासनाच्या मंजुरीस अधीन काही विशिष्ठ स्थानिक कारणामुळे (ही कारणे महानगरपालिकेच्या ठरावात नोंद करण्यात येतील) कायम किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट कालावधीकरीता सुट मिळण्यास पात्र असेल अशा मालाची संख्या पंधरा पेक्षा अधिक नसेल अशी सूट फक्त दारिद्रय रेषेखालील कुटूंबांच्या दृष्टीने जीवनावश्यक वस्तूंसाठी असेल.

५) **जकात बसविण्यापुर्वी अनुसरावयाची कार्यपध्दती :-**

(१) हया नियमास राज्य शासनाची मंजुरी संमत झालेवर महासभा ठरावाद्वारे महानगरपालिका -

अ) अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेगवेगळया मालावर ज्या दरांनी जकात बसविण्यात येईल ते दर महानगरपालिका निश्चीत करील.

ब) ज्या तारखेपासून नव्या दराने जकात बसविण्याचे ठरविले असेल ती तारीख ठराव केल्याच्या तारखेपासून ३० दिवसाहून अलिकडची असता कामा नये.

क) महापालिका आयुक्त स्थायी समितीचे मान्यतेने जकात नाक्याची संख्या व जागा वेळोवेळी निश्चीत करील,जो माल त्वरीत निर्यात करण्याच्या इराद्याने पाठविला असेल तो माल प्रवेश नाक्यापासून निर्गमन नाक्यापर्यंत ज्या मार्गाने जाईल ते मार्ग विनिर्दिष्ट करील व संरक्षकाविना पुढे नेण्यास परवानगी देण्यात येईल अशा मालाच्या संबंधी प्रवेश नाक्यापाशी वसूल करावयाच्या अनामत रक्कमांचे (मालाच्या अंदाजित मुल्यावर आधारलेली असेल) असे प्रमाण ठरवील.

(२) असा ठराव संमत झालेवर (सात दिवसाच्या आत) महानगरपालिका,महानगरपालिका क्षेत्रात जाहिर नोटीस प्रसिध्द करील -

अ) जकात ज्या दरानी बसविण्यात येईल ते दर व ज्या तारखेपासून बसविण्यात येईल ती तारीख.

ब) जकात नाक्यांची संख्या व जागा,त्वरीत निर्यात करण्याच्या इराद्याने पाठविलेला माल प्रवेश नाक्यापासून (त्वरीत निर्यात करण्याचा इरादा असलेला माल जाण्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या ) निर्गमन नाक्यापासून ज्या मार्गांनी जाईल ते मार्ग आणि पोट-नियम (१) मधील खंड (ब) अन्वये ठरविलेले अनामत रक्कमांचे प्रमाण.

(३) महानगरपालिकेस,वेळोवेळी महासभेत संमत केलेल्या ठरावाद्धारे अनुज्ञेय मर्यादित कोणत्याही मालावरील जकातीचे दर वाढविण्याचे किंवा कमी करण्याचे ठरविता येईल. तदनुसार महानगरपालिका ते दर वाढविण्याचे किंवा कमी करण्याचे ठरवील तेव्हा ती पोट-नियम (२) मध्ये घालून दिलेल्या कार्यपध्दतीचे अनुकरण करील व अशाप्रकारे वाढविलेला किंवा कमी केलेला दर महानगरपालिकेने त्या प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून लागू होईल.

(४) त्याचप्रमाणे सभेत संमत केलेल्या ठरावाद्वारे महानगरपालिकेस अनुसूची दोनच्या भाग २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही मालास जकातीची माफी देण्याचे किंवा अशी मंजुर केलेली माफी काढून घेण्याचे वेळोवेळी ठरविता येईल. जकातीची माफी देण्याचे किंवा अशी कोणतीही माफी काढून घेण्याचे महानगरपालिका ठरविल तेव्हा ती पोटनियम २ मध्ये घालून दिलेल्या कार्यपध्दतीचंचे अनुकरण करील व अशी माफी महानगरपालिकेने त्या प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून अंमलात येईल किंवा काढून घेण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(५) या नियमान्वये जकातीचे दर ठरवितांना वाढवितांना किंवा कमी करतांना अनुसूची एकच्या स्तंभ २ मधील कोणत्याही एका बाबीखाली येणा-या मालासाठी तसेच अशा मालाच्या वेगवेगळया दरांसाठी व दर्जांसाठी वेगवेगळे दर ठरविण्यासाठी मुभा महानगरपालिकेला असेल.

## ६) जकात विभाग निर्माण करणे :-

(१) महानगरपालिका एक जकात विभाग निर्माण करील व चालविल.

(२) महानगरपालिकेस जकात विभागाच्या यथोचित व कार्यक्षम प्रशासनासाठी जो जबाबदार राहिल अशा उपआयुक्त /सहा.आयुक्त/जकात अधिक्षक म्हणून संबोधण्यात येणा-या अधिका-यांची नेमणूक करता येईल. त्यांच्या कार्यालयास मध्यवर्ती जकात कार्यालय असे संबोधण्यात येईल.

(३) पोट नियम (२) अन्वये जकात अधिक्षक नेमण्यात येईल तोपर्यंत किंवा त्या पोट नियमाखाली जकात अधिक्षक नेमण्यात आला नसेल त्या बाबतीत

(४) आयुक्त/उपआयुक्त,सहाय्यक आयुक्त, जकात अधिक्षकाच्या सर्व शक्तीचा वापर करील व सर्व कर्तव्याचे पालन करील.

(५) जकात अधिक्षकास त्याच्या शक्तीचा वापर किंवा कर्तव्याचे पालन करण्याचे कामी मदत करण्यासाठी एका किंवा अधिक जकात उपअधिक्षकाची व सहा. अधिक्षकाची, निरिक्षकाची व महानगरपालिकेस आवश्यक वाटतील अशा इतर कर्मचा-यांची नेमणूक महानगरपालिकेस वेळोवेळी करता येईल व एक किंवा अधिक शाखा जकात कार्यालये निर्माण करुन ती चालविता येतील.

## ७) जकात अधिका-यांनी ओळखपत्र परिधान करणे :-

प्रत्येक जकात अधिका-याने कामावर असतांना त्याच्या कार्यपदाचे ओळखपत्र परिधान केले पाहिजे किंवा त्याच्याजवळ आयुक्ताद्वारे किंवा उपआयुक्त (कर) द्वारे किंवा याबाबतीत उप-आयुक्ताद्वारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याने योग्य रितीने स्वाक्षरी केलेले नियुक्तीचे आदेश असले पाहिजे.

## ८) जकात नाक्याची प्रस्थापना :-

जकात बसविण्याच्या,गोळा करण्याच्या प्रयोजनासाठी महानगरपालिका नियम ५ अन्वये निश्चीत केलेल्या जागी जकात नाक्याची प्रस्थापना करील व त्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग नेमील. त्याचप्रमाणे आयात वाहतूक वाटेत अडविण्यासाठी किंवा ती नजीकच्या जकात नाक्याकडे वळविण्यासाठी महानगरपालिकेस आणखी जकात नाक्यांची प्रस्थापना करता येईल.

## ९) जकात दर प्रदर्शित करणे आणि वजने मापे इत्यादी ठेवणे :-

१) आयुक्त/उपआयुक्त त्या त्या वेळी बसविण्याजोग्या असलेल्या जकातीची कोष्टके,त्यामध्ये ज्या मालावर जकात बसविण्यात येईल तो माल व त्या दराने ती बसविण्यात येईल ते दर विनिर्दिष्ट करुन,मराठीत छापून घेईल व प्रत्येक जकात नाक्याजवळ ती ठळक लावण्याची व्यवस्था करतील.

२) महानगरपालिका क्षेत्रात त्या त्या वेळी अंमलात असलेले जकातीचे प्रत्यक्ष दर दर्शविणा-या अनुसूची व नमुने असलेली या नियमाने मराठी मुद्रीत केलेली किंवा सुवाच्च अक्षरात लिहीलेली प्रत,तसेच अनुसूची दोन नियम (४) अन्वये जकातीतून माफी दिलेला तो माल विनिर्दिष्ट केला असेल त्या मालाची यादी प्रत्येक जकात नाक्यावर व जकात कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये लोकांच्या निरीक्षणासाठी विनामूल्य उपलब्ध असली पाहिजे. त्याप्रमाणे जकात यथामूल्य आकारण्यासाठी नियम १७ अन्वये महानगरपालिकेने शुल्कपात्र मालाचे वेळोवेळी निश्चीत केलेले मुल्यांकन व नियम ५ च्या पोटनियम (१) च्या खंड (ब) अन्वये ठरविलेले अनामत रक्कमांचे प्रमाण दर्शविणा-या कोष्टकाची मुद्रीत किंवा सुवाच्च अक्षरात लिहीलेली प्रत सुध्दा प्रत्येक जकात नाक्यावर व कार्यालयामध्ये निरीक्षणासाठी ठेवण्यात आली पाहिजे.

३) महानगरपालिका मध्यवर्ती कार्यालयामध्ये आवश्यक ती वजने व मापे आणि वजन व मापनयंत्रे किंवा उपकरणे पुरवील. त्याचप्रमाणे प्रत्येक जकात नाक्यावरुन सामान्यत: जाणा-या मालाचे स्वरुप व परिमाण लक्षात घेऊन जी वजने व मापे आणि वजन मापनयंत्रे किंवा उपकरणे अशा जकात नाक्यावर पुरविणे आवश्यक वाटेल ती वजने व मापे, वजन व मापनयंत्रे महानगरपालिका प्रत्येक जकात नाक्यावर पुरवील.

**१०) शुल्कबंद वखार चालविणे :-**

१) आयुक्त,ज्यावर जकात भरलेली नाही असा शुल्कदेय माल रोखून ठेवण्याकरीता किंवा जकात हद्दीत तात्पुरता ठेवून नंतर निर्यातीचा उद्देश असल्याचे जाहिर केलेला माल तात्पुरता रोखून ठेवण्याकरीता शुल्कबंद वखार बाळगू शकेल.

२) कोणत्याही आयातिकाने तात्पुरता ठेवून नंतर निर्यात करण्यासाठी आयात केलेला माल ठेवण्यासाठी महानगरपालिका अशा आयातिकास एक खाजगी शुल्कबंद वखार ठेवण्याची परवानगी देऊ शकेल व त्या प्रयोजनासाठी आयातिकास एक अनुज्ञप्ती देवू शकेल ही अनुज्ञप्ती तिच्यात घालून दिलेल्या अटीशर्तीस व निर्बंधास अधीन असेल. अशी अनुज्ञप्ती देण्याशी संबंधीत स्थायी आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी अशा अनुज्ञप्तीसाठी फी आकारण्यात आली पाहिजे.अशी फी वेळोवेळी ठरविण्याचे अधिकार आयुक्त/महानगरपालिकेला असतील.

**११) सर्व शुल्कदेय माल जकात नाक्यावर आणणे :-**

१) कोणताही शुल्क देय माल महानगरपालिका जकातीच्या हद्दीत आणतांना आयातकाने किंवा असा माल ज्याच्या ताब्यात आहे अशा व्यक्तीने तो माल या नियमानुसार जकात पूर्ततेकामी महानगरपालिकेच्या प्रवेश नाक्यावर थांबवून जकात कर भरण्याच्या कारवाईची पूर्तता केली पाहिजे.

२) कोणताही माल जकात हद्दीत बाहेरुन आणण्यात आला आहे किंवा काय व आणला असल्यास अशा मालावरील जकात यथोचितरित्या भरण्यात आली आहे किंवा काय हे निश्चीत करुन घेण्यासाठी जकात हद्दीतील कोणत्याही ठिकाणी जकात अधिकारी,कोणत्याही मालाची तपासणी करु शकेल. नियम १५ अन्वये अशा मालावर आकारलेली कोणतीही जकात आयातिकाने भरलेली नाही किंवा त्या जकातीच्या रक्कमेपेक्षा कमी भरली आहे असे तपासणीनंतर आढळून आल्यास,उक्त आयातिक किंवा तो माल ताब्यात असलेला इसम यांनी आयात केलेली वस्तू किंवा मालाचा भाग नियम १४ च्या पोट नियम (२) अन्वये अनामत ठेवण्यात आलेली नसेल तर,जकात अधिका-यास अशा मालाच्या बाबतीत देण्याजोगी जकातीची रक्कम जागच्या जागी भरण्याबद्यल त्याला फर्मविता येईल व त्याने जागच्या जागी पैसे भरण्यास नकार दिल्यास या नियमाच्या नियम ४० मधील तरतुदी नुसार जकात अधिक तडजोड फी वसूल केली जाण्यासाठी तो माल,त्याच्या स्वत:च्या खर्चाने निकटतम मध्यवर्ती जकात गोडावून येथे घेवून येण्याबाबत त्याला फर्मविता येईल.

१२) **वाहनाचे चालक इ.नी तपासणीकरीता नाक्यावर थांबणे :-**

कोणत्याही स्वरुपाचा कोणत्याही गाडीच्या किंवा वाहनाच्या प्रत्येक चालकाने आणि ओझ्याच्या जनावराची मालकी असलेल्या प्रत्येक व्यक्तीने तिची गाडी किंवा वाहन किंवा जनावर उक्त गाडी किंवा वाहन यातील माल किंवा प्राणी वाहून नेत असलेला माल जकातीकरीता पात्र आहे किंवा कसे याची खात्री करुन घेण्यासाठी जकात कर्मचा-यांना सोयीस्कर व्हावे याकरीता जकात नाक्यावर थांबविले पाहिजे. त्याचप्रमाणे जकात हद्दीत माल आणणा-या इतर सर्व व्यक्तींनी त्यांच्या ताब्यात असलेला माल जकातीकरीता पात्र आहे किंवा कसे याची खात्री करुन घेण्यासाठी जकात कर्मचा-यांना सोयीस्कर व्हावे याकरीता जकात नाक्यावर थांबले पाहिजे.

१३) **आयातक,वाहनचालक इत्यादींनी मालाची तपासणी होईपर्यत व देय जकात (कोणतीही असल्यास) चुकती केल्याशिवाय जकात नाका न सोडणे :-**

कोणत्याही आयातकाने,वाहनचालकाने किंवा इतर व्यक्तीने जकात कर्मचा-यांकडून मालाची तपासणी आणि संबंधित कागदपत्रे तयार केली जाईपर्यंत आणि वसुली योग्य असलेल्या कोणत्याही मालावरील जकात भरल्याशिवाय जकात नाक्यावरुन आयात माल हलवता कामा नये. मालाचा सर्व तपशिल देऊन आणि जकातीयोग्य मुल्यनिर्धारण करण्याकरीता आणि जकात वसुल करण्याकरीता आवश्यक असलेली संबंधित कागदपत्रे सादर करुन जकात अधिका-यांना सहाय्य केले पाहिजे. तसेच नाका अधिकारी यांचे तपासणी कामी मालाची उतराई आणि भराई ही आयातकाला स्वखर्चाने करावी लागेल.

१४) **आयातकाने करावयाचे प्रतिज्ञापन इत्यादी :-**

१) जकात नाक्यावर कोणताही शुल्कदेय माल आल्यावर जकात अधिकारी आयातकास गाडी चालकास किंवा वाहन चालकास किंवा ओझ्याचे जनावर ताब्यात असलेल्या व्यक्तीस किंवा माल आणणा-या इतर व्यक्तींना निर्देश देतील की :-

अ) महानगरपालिका क्षेत्रात खप,वापर,उपयोग,साठवण किंवा विक्री याकरीता आयात केलेल्या मालाच्या संबंधात जकात पुर्तता करण्यासाठी आवश्यक असलेल्या तपशिलाचे नमुना १ मध्ये प्रतिज्ञापन भरुन देणे.

ब) नियम ५ च्या पोटनियम (१) च्या खंड (क) अन्वये ठरविण्यात आलेल्या प्रमाणानुसार दयावयाची अनामत रक्कम ठरविण्याच्या प्रयोजनासाठी व नियम १८ अन्वये मंजुर करावयाची कोणतीही अनामत असल्यास लेखी परवानगी नि-परिवहन पासातील तपशिल भरण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यकता भासल्यास जो माल त्वरीत निर्यात करण्याचा इरादा असेल त्या मालासंबंधी नमुना २ मध्ये प्रतिज्ञापन नि अर्ज भरणे.

(क) महानगरपालिकेने चालविलेल्या शुल्कबंध वखारीमध्ये (कोणतीही असल्यास) तात्पुरता ठेवून नंतर निर्यात करण्याचा इरादा असेल अशा मालासबंधी नमुना ३ मध्ये अर्ज सादर करणे.

(ड) स्वत: जवळ तात्पुरत्या ठेवून नंतर निर्यात करण्याचा इरादा असेल अशा मालासंबंधी नमुना ४ मध्ये प्रतिज्ञापन भरणे.

(इ) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ चे कराधान नियम २८ व नियम १५ च्या पोटनियम (५) नुसार महानगरपालिकेने चालू खाते ठेवण्याची परवानगी दिलेला कोणताही इसम, व्यापारी पेढी किंवा संस्था किंवा त्यांच्यावतीने आयात केलेल्या / करण्यात आलेल्या मालासंबंधी नमुना ५ मध्ये प्रतिज्ञापन भरणे.

(फ) मालाचे वर्णन, संख्या, परिमाण, वजन व माप सांगणे व जेथे जकात यथामूल्य बसविण्याजोगी असेल त्या बाबतीत मालाचे मूल्य सांगणे.

२) जेथे आयातक, गाडीचा किंवा वाहनाचा चालक किंवा ओझे वाहणारे जनावर ताब्यात असणारी व्यक्ती किंवा माल आणणारी इतर व्यक्ती,प्रतिज्ञापत्र करु शकत नसेल आणि आवश्यक माहितीच्या अभावी किंवा मूळ बीजकांसारख्या दस्तऐवजाच्या अभावी पोट नियम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे तपशिल देऊ शकत नसेल तेव्हा नियम १७ च्या तरतूदीनुसार निश्चित करण्यात आलेल्या मालाच्या किंमतीच्या आधारावर जकात अधिका-याने हिशोब करुन काढलेल्या शुल्कावर/किंमतीवर नियमानुसार होणारी जकात वसुल केली पाहिजे. ती भरण्यास आयातीकाने नकार दिल्यास जकातीच्या रक्कमेइतकी रक्कम अनामत म्हणून ठेवील जर अनामतीच्या प्रदान दिनांकापासून एका महिन्याच्या आत आयतकाला, चालकाला किंवा इतर व्यक्तीला जकात अधिका-याची खात्री पटेल अशा पध्दतीने आयात मालाची खरी किंमत सिध्द करणे शक्य असेल किंवा मूळ बीजकासारखी कागदपत्रे सादर करणे शक्य असेल आणि देय असलेल्या जकातीपेक्षा ठेव म्हणून जादा रक्कम ठेवण्यात आल्याचे आढळून आले तर अशा जादा रक्कमेचा परतावा मध्यवर्ती जकात कार्यालयातून मिळविता येईल. जर ठेव प्रदान केल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत जकात अधिका-याची खात्री पटवून देण्यास तो असमर्थ ठरला तर ठेव म्हणून ठेवलेली रक्कम ही जकात म्हणून प्रदान केलेली रक्कम असल्याचे मानण्यात येईल.

### १५) जकातीचे आकारणीची व वसुली यांची कार्यपध्दती :-

१) जकात हद्दीच्या आत आयात केलेला माल महानगरपालिका क्षेत्रात उपयोगात आणण्याचा, वापरात आणण्याचा, साठवण करण्याचा किंवा विक्री करण्याचा उद्येश असेल त्या बाबतीत जकात अधिका-याने प्रतिज्ञापत्रात देण्यात आलेल्या मालाचे वर्णन, संख्या, परिमाण, वजन, माप आणि किंमत याची तपासणी करुन त्याच्या अचूकते बाबतची खात्री पटल्यावर किंवा या नियमात तरतूद केल्याप्रमाणे या बाबींच्या निश्चितीद्वारे देय असलेल्या जकातीच्या रक्कमेचे निर्धारण करावे आणि प्रदानाची मागणी करुन असे प्रदान झाल्यावर आयातक किंवा त्याच्या प्रतिनिधींना दिनांक व वेळ नमूद असलेली प्रदानाची पावती द्यावी.

२ - अ) जकात हद्दीमध्ये आयात करतेवेळी एखाद्या इसमाकडे जकात अधिका-याने जकात भरण्याची मागणी केल्यानंतर ती भरण्यासाठी पैसे नसतील तर कोणतीही वस्तू किंवा मालाचा जो कोणताही भाग जकात अधिका-याचे मते मागणी पूर्ण करणेसाठी पुरेशा किंमतीचा असेल ती वस्तू किंवा मालाचा भाग त्याने जकात अधिका-याकडे अनामत ठेवला पाहिजे.

संबंधीत जकात अधिका-याने अशाप्रकारे अनामत ठेवलेली वस्तू किंवा मालाचा भाग याचे अदमासे मूल्य व वर्णन असलेली व अशाप्रकारे अनामत ठेवलेली वस्तू किंवा मालाचा भाग ज्या मुदतीत सोडवून घेता येईल ती मुदत विनिर्दिष्ट केलेली एक पावती त्या इसमास दिली पाहिजे. जकात भरतेवेळी (वस्तू किंवा माल) अनामत ठेवणा-या इसमाने अनामत ठेवलेली वस्तू किंवा मालाचा भाग परत मिळाला असल्याचे पृष्ठांकन करुन ती पावती जकात अधिका-यास परत केली पाहिजे.

ब) तीस दिवसाचे मुदतीत जकातीची रक्कम भरण्यात आली नाही व ती वस्तू किंवा मालाचा भाग सोडवून घेण्यात आला नाही तर ती वस्तू किंवा तो माल जकातीचा भरणा न केल्याबद्यल मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२८ अन्वये जप्त केलेला माल असल्याचे मानण्यात येईल व तदनुसार त्यावर नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

३) मालाचे वर्णन, नग, परिमाण, वजनमाप किंवा मूल्य यांचा अचूकपणा आणि जकात अधिका-याने त्यावर ठरविलेली रक्कम, माल आयात करणा-या इसमास समाधानकारक वाटली नाही तर जकात अधिका-याने ठरविलेल्या जकातीच्या रक्कमेइतकी रक्कम अनामत म्हणून भरण्यात येईल. मालाचे वर्णन,नग,परिमाण,वजनमाप, किंवा मूल्य व जकात अधिका-याने ठरविलेली जकातीची रक्कम अचूक नसल्याबद्यल माल आयात करणा-

या इसमाने, अनामत रक्कम भरल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत जकात अधिक्षकाची खात्री पटविली तर अनामत ठेवलेली रक्कम व त्याने आयात केलेल्या मालावर देय होणारी जकातीची रक्कम यातील तफावतीएवढी रक्कम मिळवण्याचा हक्क त्याला असेल ही रक्कम मध्यवर्ती जकात कार्यालयामधून मिळेल. उक्त १५ दिवसाच्या मुदतीत जकात अधिक्षकाची खात्री पटविण्यात तो निष्फळ ठरला तर अनामत रक्कम ही भरण्यात आलेली जकात असल्याचे समजण्यात येईल.

४) निकटपूर्ववर्ती नियमान्वये नमुना ५ मधील प्रतिज्ञापन पोचल्यानंतर जकात अधिकारी ज्याच्या वतीने माल आयात करण्यात आला असेल त्या इसमाचे व्यापारी पेढीचे किंवा संस्थेचे नावे खाते चालु ठेवण्यास परवानगी दिलेल्या इसमांच्या, पेढयांच्या किंवा संस्थांच्या यादीमध्ये आहे अथवा नाही हे पाहिल व असल्यास प्रतिज्ञापनात भरलेल्या तपशिलाशी माल जुळतो हे तपासून व प्रतिज्ञापनाखालील प्रमाणपत्र भरुन नमुना ६ मध्ये एक पास देईल. जकात अधिकारी अशी सर्व प्रतिज्ञापने त्याच्या यादीच्या दोन प्रतीसह पुढील कार्यवाहीसाठी मध्यवर्ती जकात कार्यालयामध्ये पाठवील.

<u>५) जकात चालू खाते (करंट अकाऊंट) ठेवण्याचा अधिकार :</u>

अ) आयुक्तांस स्थायी समितीच्या मान्यतेने ज्या मालावर जकात बसविणे योग्य आहे असा माल जकात हद्यीत आणण्याच्या वेळी व्यावसायिक आयातकाकडून अशा रितीने देय असलेल्या जकातीचे एक चालू खाते महानगरपालिकेच्या वतीने ठेवण्याविषयी निर्देश देता येईल. व याबाबत अटीशर्तीसह बंधपत्र करुन देणे व्यावसायिकास बंधनकारक असेल.

ब) ज्या व्यावसायिक आयातकाची मासिक सरासरी जकात रक्कम रुपये १ लाख किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशाच व्यावसायिक आयातकांना चालू खातेची सुविधा देण्यात येईल. जकात रक्कम मासिक सरासरी काढण्याकरीता अशा व्यावसायिक आयातिकाची मागील आर्थिक वर्षातील सलग ६ महिन्याची जकात रक्कम विचारात घेतली जाईल तसेच हे नियम अंमलात येण्याच्या दिनांका पूर्वी पासून व्यवसाय करणा-याने चालू खाते सुविधा मागणी करतांना संपूर्ण जकात थकबाकीची रककम भरुन तशी पावती अर्जासोबत दाखल केली पाहिजे.

क) ज्या व्यावसायिक आयातकास चालू खाते मंजुर केले आहे अशा आयातकांनी त्यांच्या हिशोबाची तोंडमिळवणी एक महिन्यापेक्षा जास्त नाही इतक्या मुदतीत केली पाहिजे. एक महिन्याच्या कालावधीची तोंड मिळवणीची रक्कम पुढील महिन्याच्या पाच तारखेच्या आत महानगरपालिका ठरवून देईल त्या विहीत नमुन्यात दाखल केली पाहिजे. अशी पुर्तता न करणा-या व्यावसायिक आयातकाच्या चालू खात्याची तपासणी महानगरपालिका जेव्हा करील व जी जकात कराची रक्कम निश्चीत करील ती रक्कम अशा व्यावसायिक आयातकास त्या रक्कमेच्या प्रथम देय दिनांकापासून भरावी लागेल. अशा आकारणीबाबत कोणताही वाद उत्पन्न करता येणार नाही.

ड) असे खाते सुरु करण्यासाठी आयुक्त ठरवतील एवढी अनामत रक्कम म्हणजे व्यावसायिक आयातकाच्या देय जकातीच्या एक महिन्याइतकी रक्कम रोख स्वरुपात बीनव्याजी महानगरपालिकेकडे अनामत म्हणून ठेवावी लागेल. याशिवाय मागिल वर्षाच्या उलाढालीत सरासरीने येणारी एक महिन्याची जकात डिपॉझिट रक्कमेपेक्षा अधिक असल्यास अतिरिक्त होणारी रक्कम डिपॉझिट म्हणून रोख स्वरुपात बिनाव्याजी म्हणून ठेवावी लागेल.

ई) मंजुर चालु खात्यास आयुक्त यांनी निर्गत केलेल्या स्थायी आदेशाच्या तरतूदी लागु राहतील.

फ) महानगरपालिकेने ज्या व्यावसायिक आयातकांना जकात चालु खाते (करंट अकांऊट) दिले आहे. त्यांनी होणारी जकात नियमानुसार पुढील महिन्याच्या दहा तारखेच्या आंत भरणे बंधनकारक आहे. जर याची पूर्तता संबंधित चालू खाते असणा-या व्यावसायिक आयातकांनी

केली नाही तर निकटवर्ती पोटकलम ई च्या उपबंधास अधिन राहून कोणतीही पूर्वसूचना न देता चालू खाते (करंट अकांऊंट) बंद करण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील. तसेच विहीत मुदतीत देय जकात व महानगरपालिकेने ठरवून दिलेले विवरण पत्र दिले असले तरी त्या खात्याची महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचारी यांचेमार्फत अंतिम पूर्ण तपासणी झाल्याशिवाय हिशोबाची पूर्तता झालेली आहे असे समजले जाणार नाही. अशा तपासणी कामी आवश्यक ती कागदपत्रे तपासणी पूर्ण होईपर्यंत महानगरपालिका मागणी करील त्यावेळेस त्या त्या ठिकाणी तपासणी कामी उपलब्ध करुन दिली पाहिजेत. जकात तपासणी निरीक्षक कोणत्याही मागिल कालावधीची तपासणी करुन जकात भरल्याबाबतची खात्री करेल व याबाबत मुदतीचे बंधन राहणार नाही. त्यामध्ये जकात फरक आढळल्यास तो भरणे करंट अकौंट धारकास बंधनकारक असेल.

ग) जकात चालू खाते मंजुर केल्यानंतर कुठल्याही आर्थिक वर्षातील ६ महिन्यात मासिक सरासरी जकात रक्कम १ लाख पेक्षा कमी झाल्यास असे चालु जकात खाते कार्यालयामार्फत बंद करण्यात येईल आणि असे बंद झालेले चालू खाते पुन्हा सुरु करण्याकरीता या नियमाच्या पोटकलम अ, ब, क, ड, ई व फ मधील तरतुदी अशा व्यावसायिक आयातकास लागू होतील.

घ) काही नैसर्गिक आपत्तीमुळे कागदपत्रे उपलब्ध होऊ न शकल्यास मंजुर चालू जकात खाते तपासणी करुन जकात कराची रक्कम निश्चित करणे शक्य होत नसल्यास अशा व्यावसायिक आयातकाची चालू जकात खात्याच्या बाबतीत अशी घटना घडण्यापूर्वीच्या लगतच्या ६ महिन्याची मासिक सरासरी जकात रक्कम तसेच घटनेनंतरच्या लगतच्या ६ महिन्याच्या मासिक सरासरी रक्कम किंवा महानगरपालिके कडेस उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन काढण्यात आलेली जकात रक्कम यापैकी जी अधिक असेल अशी रक्कम मासिक जकात रक्कम म्हणून भरावी लागेल.

च) सदरचे नियम अंमलात आल्याच्या दिनांकास यापूर्वी अस्तित्वात असलेली चालू जकात खातेधारक यांना नवीन अटीशर्तीची पूर्तता करावी लागेल. व्यावसायिक, आयातकास सदर नियमाच्या तरतुदीस अधीन नवीन चालू खाते मिळण्यासाठी अर्ज करता येईल.

छ) चालू करंट अकौंट धारकाचे तपासणी मध्ये काही जकात फरक आढळून आल्यास त्याची स्वतंत्र मागणी नोटीस देण्यात येईल व सदर नोटीस मिळालेपासून सदरची जकात दर फरक / बिल फरकाची व बिनाजकात मालाची मागणी रक्कम नोटीस मिळालेपासून १५ दिवसाचे आत भरणे करंट अकौंट धारकास बंधनकारक राहिल. तसे न केल्यास सदरची मागणी रक्कमेची वसुली करंट अकौंट धारक यांचे अनामत रक्कमेतून किंवा अधिनियमाच्या कलम १२८ प्रमाणे कारवाई करुन करण्यात येईल.

ज) चालू खाते सुविधा मंजुर केल्यानंतर आयुक्ताने विहित नमुन्यात निर्दिष्टीत केलेल्या नमुन्यात अभिलेखे ठेवणे बंधनकारक राहिल. व आयुक्त ज्या ज्या वेळेस मागणी करतील त्यावेळेस चालू खातेधारक यांनी :

१) चालु वर्षाचे खरेदी-विक्री रजिष्टर २) माल आयात रजिष्टर (Goods Received Note ) व त्या अनुषंगिक कागदपत्रे तपासणी कामी हजर करतील.

२) करंट अकौंट परवानगीसाठी प्रत्येक वर्षी २५ मार्च पुर्वी करंट अकौंटधारकाने विहित नमुन्यात अर्ज करुन नुतनीकरण करणे बंधनकारक राहिल. नुतनीकरण करतांना करंट अकौंटधारक कंपनीने त्यांचा लेखापरिक्षण अहवाल,इन्कमटॅक्स रिटर्न,सेल्सटॅक्स रिटर्न,एक्साईज रिटर्न व वॅट रिटर्न देणे बंधनकारक राहिल.

**१६) वजन व माप ठरविण्यासंबंधी उपबंध :**

१) मालाची आवेष्टने किंवा पात्रे यांसह मालाच्या एकूण वजनावर किंवा मापावर जकात आकारण्यात येईल.

२) मालाच्या वजनावर जकात आकारावयाची असेल त्या बाबतीत मालाच्या दर १० किलोवर जकात आकारण्यात येईल माल किंवा मालाचा भाग १० किलोहून कमी असेल त्याप्रसंगी जकातीची आकारणी मालाचे किंवा मालाच्या भागाच्या जे प्रत्यक्षात वजन असेल त्यावर आकारण्यात येईल. व आकारणी १० किलो ग्रॅमला जकातीचा दर असेल त्याच्या प्रमाणात करण्यात येईल. जकातीचा हिशेब करतांना पैसे अपूर्णाकांत आले तर पूर्ण पैसा धरण्यात येईल.

३) मालाचा संपूर्ण भार हा एकाच प्रकारचा मालाचा मिळून बनलेला असेल व तो पुढीलपैकी कोणत्याही प्रकारचा असेल त्याबाबतीत आयात केलेल्या मालाचे वजन सामान्यपणे भाराच्या प्रत्येक प्रकाराच्यासमोर दर्शविण्यात आलेल्या वजनाइतके असल्याचे गृहीत धरण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ) डोक्यावरुन भार व सायकलवरील भार - | | ३० कि.ग्रॅम |
| ब) कावड भार | - | ५० कि.ग्रॅम |
| क) तट्टू,खेचर किंवा गाढव याच्यावरील भार | - | ८० कि.ग्रॅम |
| ड) बैलावरील भार | - | १०० कि.ग्रॅम |
| इ) रेडयावरील / म्हशीवरील भार | - | १२० कि.ग्रॅम |
| फ) उंटावरील भार | - | २७५ कि.ग्रॅम |
| ग) एका प्राण्याने जोडलेले गाडीतील भार | - | ३०० कि.ग्रॅम |
| ह) दोन प्राण्यांनी जोडलेले गाडीतील भार | - | ५०० कि.ग्रॅम |
| य) माल मोटारीतील (मोटार लॉरी)भार | - | जकात योग्य (वजन किंवा वाहनाचे किमान भार नसतांना होणारे वजन यातील तफावत.) |

परंतु वर निर्दिष्ट केलेले प्रमाण समतुल्य वजन आयातिकास मान्य नसेल तर नाक्यावर सर्व पुडक्याचे वजन केले जाण्याची मागणी करण्याचा अधिकार त्याला असेल. परंतु त्याला स्वतःच्या खर्चाने तो माल वजन करण्याचा यंत्रापासून किंवा काटयापर्यंत न्यावा लागेल व तेथून हलवावा लागेल.

**४) या नियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज जकातीचे निर्धारण बीजकांच्या (इनव्हाईसच्या) आधारे करण्यात येईल, मुल्य देय डाकेच्या (व्ही.पी.च्या) रक्कमांच्या किंवा बँकाच्या पावत्यांच्या,पत्राच्या किंवा हुंडयांच्या आधारे ते करण्यात येणार नाही.**

**१७) जकात पात्र मालाची किंमत निश्चित करण्याकरीता तरतूदी :-**

अ) जर, आयातकाकडून मूळ बीजक सादर करण्यात आले व ते जकात अधिका-याकडून स्विकारण्यात आले तर मालाची किंमत , अधिक वाहतूक आकार, वाहन आकार, नौवहन आकार, विमा,उत्पादन शुल्क, विक्रीकर, विक्री शुल्क प्रतिशुल्क, उलाढाल कर,मुल्यावर्धित कर (वँट) आणि जकात हद्दीत माल येईपर्यंत आयातकाकडून भरले जाणारे इतर सर्व तदअनुषंगिक आकार डिस्काऊंट/कन्सेशन/रिबेट यांचेसह मिळून होणारे मूल्य असा आहे.

ब) जेथे आयातीचे वेळी मूळ बीजक दाखल करण्यात आले नसेल किंवा दाखल करण्यात आलेले बीजक अपुरे असेल किंवा खरे असल्याचे मानले गेले नसेल तर जकात अधिकारी मालाच्या मूल्याची परिगणना करतांना महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास बाजारभावातील जकात पात्र मालाचे चढ उतार लक्षात घेऊन वर्षातून किमान एकदा मालाचे बाजारभावानुसार यादी तयार करता येईल व त्यानुसार ठरवून दिलेल्या बाजारभाव यादीनुसार मालाच्या मूल्याची परिगणना करील. जर कोणताही एखादया वर्गाच्या मालाचे मूल्य अशाप्रकारे ठरविण्यात आले नसेल तर जकात अधिकारी स्वतः खात्री करुन घेतलेल्या प्रचलित घाऊक बाजार भावाच्या व (M.R.P.) अधिकृत किरकोळ विक्री किंमतीचे आधारे आपल्या पराकाष्ठा निर्णय शक्तीनुसार त्या मालाच्या मूल्याची परिगणना करील.

क) महापालिका आयुक्त आवश्यकते प्रमाणे जकात पात्र मालाचा बाजारभाव निश्चीत करणेसाठी बाजारातील विविध वस्तूंच्या बाजारभावातील किंमतीच्या बाबत माहिती असलेल्या तज्ञ व्यक्तींची मदत घेऊन बाजारभाव निश्चीत करतील.

ड) उपरोक्त अ व ब संदर्भात आयात करण्यात आलेल्या मालाचे मुल्याच्या बाबतीत जकात अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहिल. त्याबाबत काही वाद निर्माण झाल्यास सदरचा माल त्या बिलात नमुद केलेल्या किंमतीवर खरेदी करण्याचे अधिकार मनपास राहतील.याबाबत आयुक्त यांचा निर्णय अखेरचा राहिल.

**१८) त्वरीत निर्यात करण्याच्या इराद्याने आयात केलेल्या शुल्कपात्र मालासाठी कार्यपध्दती :-**

१) रेल्वे, समुद्र, हवाई किंवा सडक मार्गे आयात केलेल्या व जो त्वरीत निर्यात करण्याचा इरादा असेल अशा मालावर या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२) त्वरीत निर्यात करण्याच्या इराद्याने जकात हद्दीमध्ये आयात केलेला माल ज्याच्या ताब्यात असेल अशा इसमाने तो माल प्रवेश नाक्याशी आल्यावर नियम ५ च्या पोट-नियम (१) च्या खंड (क) अन्वये प्रवेश नाका ते निर्गमन नाका या अंतरासाठी विनिर्दिष्ट केलेल्या मार्गे तो माल संरक्षकविना वाहून नेण्यासाठी जकात अधिका-याकडे एक लेखी परवानगी नि परिवहन पासाकरीता अर्ज केला पाहिजे, तसेच महानगरपालिकेने त्या प्रयोजनासाठी नियम ५ च्या पोट नियम (१) च्या खंड (क) अन्वये ठरविलेल्या अनामत रक्कमांच्या प्रमाणानुसार जकात अधिका-याने परिगणना केलेली अनामत रक्कम त्याने त्याचवेळी प्रवेशनाक्यावर भरली पाहिजे. लेखी परवानगी नि परिवहन पासासाठीची फी कोणतीही असल्यास भरल्यानंतर जकात अधिका-यास आवश्यक वाटल्यास नमुना २ मध्ये प्रतिज्ञापन नि अर्ज सादर केल्यानंतर जकात अधिकारी उक्त इसमास नमुना ७ मध्ये लेखी परवानगी - नि - परिवहन पास देईल व संरक्षकविना माल घेऊन पुढे जाण्यास त्या इसमास परवानगी देईल. अशी परवानगी देतांना सदर वाहनातील संपूर्ण माल हा मनपा हद्दीबाहेर निर्यात होणारा असल्यास लेखी नि परिवहन पासाकरीता दोन तासाची मुदत देण्यात येईल. जर एका वाहनामध्ये मनपा हद्दीतील जकात पात्र माल असेल व काही माल मनपा हद्दीबाहेरील असल्यास अशा वाहनातील मनपा हद्दीबाहेरील मालाकरीता लेखी नि परिवहन पासाकरीता आठ तासाची मुदत असेल.

३) प्रवासामध्ये मालात काही उणे अधिक न होता माल जशाच्या तसा निर्गमन नाक्याशी आल्यानंतर व लेखी परवानगी नि परिवहन पास परत करण्यात आल्यानंतर जकात अधिकारी त्यातल्या नोंदीबरोबर माल पडताळून पाहील व उक्त पासात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असलेल्या मालाचा तपशील निर्गमन नाक्याशी आलेल्या मालाशी जुळत असेल तर उक्त पासात नमूद केलेली अनामत रक्कम परत करील.

४) पोट नियम (३) अन्वये परतावा देण्यासाठी नगरपालिका निर्गमन नाक्याच्या प्रभारी अधिका-यांना त्यांच्या गरजेनुसार पुरेशी आगाऊ रक्कमा देईल.

५) अनामत रक्कमेचा परतावा घेणा-या इसमाने लेखी परवानगी नि परिवहन पासामध्ये त्या प्रयोजनासाठी राखून ठेवलेल्या जागेमध्ये परतावा मिळाल्यावर सही केली पाहिजे. अशाप्रकारे दिलेल्या पासाच्या स्थळप्रती (counter foils) व मूळप्रती मध्यवर्ती जकात कार्यालयात आयुक्ताने किंवा उपआयुक्ताने ठरविलेल्या वेळी पाठविण्यात आल्या पाहिजेत. जकात अधिक्षक किंवा त्या प्रयोजनासाठी नेमलेला अधिकारी स्थळप्रतीची मूळ प्रतीशी व नोंद वहयाशी तुलना करील व त्यांचा मेळ बसत असल्याबद्यल स्वत:ची खात्री करुन घेईल व त्यानंतर आगाऊ दिलेली रक्कम पुन्हा भरुन काढण्याचा आदेश देईल. कोणतीही नियमबाहयता आढळल्यास ती आयुक्त / उप आयुक्तास तात्काळ कळविण्यात येईल.

६) एखादया महानगरपालिके कडे संरक्षक पुरविण्याची व्यवस्था असेल व शुल्क पात्र माल ताब्यात असलेला इसम त्या प्रयोजनासाठी नियम ५ च्या पोटनियम (१) च्या खंड (क) अन्वये निर्दिष्ट केलेल्या मार्गाने तो माल प्रवेश नाक्यापासून निर्गमन नाक्यावर संरक्षकासमवेत नेण्यास तयार असेल त्याबाबत त्याने त्यासंबंधी अर्ज केल्यास व त्यासंबंधी महानगरपालिकेने निश्चीत केलेली फी, कोणतीही असल्यास ती भरल्यानंतर त्याला असा माल संरक्षकासमवेत घेऊन जाण्याची लेखी परवानगी नमुना ७ - अ मध्ये देण्यात येईल. सदरचा माल व वाहन निर्यात नाक्यावर जाणेकरीता दोन तासांची मुदत देण्यात येईल. अशा प्रकारणामध्ये निर्गमन नाक्यावरील जकात अधिकारी लेखी परवानगी परत करण्यात आल्यानंतर उक्त इसमास त्या नाक्यावरुन मालासह जाऊ देईल. आणि तो माल जकात हद्यीच्या बाहेर पोचल्याबद्यल संरक्षक स्वत:ची खात्री करुन घेतील.

७) पोट नियम (२) मध्ये उल्लेख केलेल्या लेखी परवानगी-नि-परिवहन पासासाठी विर्निर्दिष्ट फी आणि पोट नियम (६) मध्ये उल्लेख केलेली संरक्षणाखाली माल वाहून नेण्याच्या लेखी परवानगीची फी (मार्गस्थ दाखला/एस्कॉर्ट फी) ही महानगरपालिकेला वेळोवेळी ठरावान्वये निश्चित करता येईल.

**१९) महानगरपालिकेने चालविलेल्या शुल्कबंद वखारीमध्ये तात्पुरता ठेवून नंतर निर्यात करण्याच्या इरादयाने आयात केलेल्या मालाच्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपध्दती :-**

१) शुल्कपात्र माल जकात हद्यीमध्ये तात्पुरता ठेवून नंतर निर्यात करण्याच्या इराद्याने जकात हद्यीत आयात केलेला असेल व तो महानगरपालिकेने चालविलेल्या शुल्कबंध वखारीमध्ये (BONDED WEAR HOUSE) ठेवायचा असेल त्याबाबतीत असा माल अशा शुल्कबंध वखारीत ठेवण्याच्या लेखी परवानगी साठी आयातिकाने प्रवेश नाक्यावरील जकात अधिका-याकडे नमुना ३ मध्ये (दोन प्रतीमध्ये) अर्ज केला पाहिजे. आयातिकास शुल्कबंध वखारीत माल ठेवण्यास परवानगी दिल्याची नोंद जकात अधिका-याने त्या अर्जावर केली पाहिजे. अशी कोणतीही परवानगी देण्यात येईल त्याबाबतीत ज्या मालासंबंधी अशी परवानगी देण्यात आली असेल तो माल,आवश्यकता भासल्यास मोहोरबंद करुन त्यावर खुणा करण्यात येतील व संरक्षकासमवेत तो शुल्कबंध वखारीत नेण्याची परवानगी देण्यात येईल.

२) शुल्कपात्र माल शुल्कबंध वखारीमध्ये आणण्यात आल्यानंतर त्या शुल्कबंध वखारीचा प्रभारी अधिकारी संरक्षकास परत जाण्याची परवानगी देईल व मालाची पडताळणी करुन आणि उपरोक्त परवानगीसाठी त्या संबंधीच्या स्थायी आदेशात विनिर्दिष्ट केलेली फी, कोणतीही असल्यास, ती वसूल करुन तो माल शुल्कबंध वखारीत एकावेळी ७ दिवसाहून अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी व एकुण ३० दिवसाहून अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी ठेवण्याची परवानगी देईल व माल प्रारंभी ठेवतेवेळी व माल ठेवण्याची मुदत वाढवून दिली असेल तेव्हा अशी मुदत वाढविण्याच्या वेळी, अशा दोन्ही वेळेस अर्जामध्ये खालच्या बाजुस त्यासाठी ठेवलेल्या जागेत त्या अर्जाची नोंद दोन्ही प्रतीवर करील व एक प्रत आयातिकास देईल. माल घेऊन ज्या मुदतीसाठी ठेवण्याची परवानगी देण्यात आली असेल ती मुदत संपल्यानंतरही माल हलविण्यात नाही आला तर उप आयुक्त / जकात अधिक्षक आयातिकास माल घेवून जाण्याची नोटीस देईल व त्या नोटीशीच्या तारखेपासून ३ दिवसाच्या आत माल घेवून जाण्याबद्यल फर्मावील. या नोटीशीचे अनुपालन करण्यात आयातिकाने कसूर केली तर तो माल मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२८ अन्वये जकात न भरल्याबद्यल जप्त केलेला माल असल्याचे समजण्यात येईल व तद्नंतर त्यावर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

## २०) महानगरपालिकेने चालविलेल्या शुल्कबंध वखारीमध्ये (BONDED WEAR HOUSE) ठेवलेला माल निर्यात करण्याची कार्यपध्दती :-

१) कोणत्याही आयातिकाला महानगरपालिकेने चालविलेल्या शुल्कबंध वखारीत (BONDED WEAR HOUSE) ठेवलेल्या मालाची निर्यात करावयाची असेल तर, तो व्यक्तीशः अथवा त्याच्या प्राधिकृत अभिकर्त्यामार्फत लेखी परवानगी नि निर्यात पासासाठी नमुना ८ मध्ये सूचना नि अर्ज व त्यासोबत नमुना ३ मध्ये त्याने केलेल्या अर्जाची एक प्रत देईल व त्या मालावर बसविता येईल अशी जकाती इतकी रक्कमसुध्दा अनामत ठेवील. शुल्कबंध वखारीचा प्रभारी अधिकारी अनामत ठेवलेल्या रक्कमेबद्यल एक ठेव पावती देईल व त्या बाबतीत केलेल्या स्थायी आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी फी,कोणतीही असल्यास, भरल्यास आणि आयातिकाची किंवा त्याच्या प्राधिकृत अभिकर्त्याची लेखी परवानगी नि निर्यात पासावर नमुन्याची सही घेतल्यानंतर नमुना ९ मध्ये उक्त पासाच्या दोन प्रती देईल. आवश्यक वाटल्यास असा प्रभारी अधिकारी निर्यात करावयाचा माल मोहोरबंद करील आणि माल निर्गमन नाक्याकडे नेण्यासाठी शक्य असेल तेव्हा संरक्षण देवून आयातिकाच्या स्वाधीन करील. तसेच प्रभारी अधिकारी असा माल ज्या कालमर्यादेच्या आत व ज्या मार्गाने निर्यात केला पाहिजे ती कालमर्यादा व तो मार्ग निर्दिष्ट करील असा अवधी प्रत्येक बाबतीत अंतर व परिवाहनची सोय याकडे योग्य लक्ष पुरवून निश्चीत करण्यात येईल. पण ती कोणत्याही बाबतीत असा पास दिल्याच्या वेळेपासून बारा तासापेक्षा अधिक असणार नाही.

२) तो माल निर्गमन नाक्याच्या ठिकाणी सादर केल्यानंतर जकात अधिकारी लेखी परवानगी नि निर्यात पासात नमूद केलेल्या वेळेच्या आत तो माल सादर केला आहे किंवा काय व त्यावरील मोहोर, कोणतीही असल्यास जशीच्या तशी आहे किंवा नाही याविषयी प्रथम खात्री करुन घेईल तो माल सर्व बाबतीत म्हणजे वजन, संख्या व परिमाण किंवा कोणत्याही इतर खुणा याबाबतीत तसाच आहे अशी त्याची खात्री होईल तर तो उपरोक्त पासाच्या दोन्ही प्रतीवर त्या आशयाचे प्रमाणपत्र लिहील.

३) तो माल जकात हद्यीबाहेर प्रत्यक्षपणे निर्यात केल्यानंतर उक्त पासाची एक प्रत जकात अधिकारी स्वतःकडे ठेवून घेईल आणि या प्रयोजनार्थ ठेवलेल्या नोंदणीपुस्तकात संबंधित नोंदी केल्यानंतर व पासाची एक प्रत मिळाली असल्याबद्यल नोंदणी पुस्तकात आयातिकाची पोच मिळाल्यानंतर त्या पासाची दुसरी प्रत आयातिकाच्या स्वाधीन करण्यात येईल. जकात अधिका-यांनी स्वतःकडे ठेवून घेतलेल्या पासाच्या अशा सर्व प्रती अशा स्वाधीन केलेल्या पासाच्या यादीच्या दोन प्रतीसह दुस-या दिवशी जकात अधिक्षकाकडे सादर करतील.

## २१) महानगरपालिकेने चालविलेल्या शुल्कबंध वखारीमध्ये ठेवलेल्या मालाची रेल्वेने,समुद्रमार्गे, हवाईमार्गे किंवा राज्य परिवहन मंडळाच्या बसगाडयांद्वारे निर्यात करावयाचा असेल त्या बाबतीत जकात अधिकारी खालील कार्यपध्दती अनुसरील.

१) तो माल लेखी परवानगी नि निर्यात पासातील त्यांच्या तपशिलावर हुकूम आहे याची पडताळणी केल्यानंतर तो पासाच्या दोन्ही प्रतीवर माल रेल्वे आगाराकडे/बंदराकडे/विमानतळाकडे/राज्य परिवहन स्थानकाकडे घेवून जाण्याची अनुज्ञा देण्यात येत आहे. असे मुद्रांकित करील या पासाच्या दोन्ही प्रती आयातिकाच्या स्वाधीन करील. नंतर आयातिकास तो माल रेल्वेने आगाराकडे किंवा बंदराकडे किंवा विमानतळाकडे किंवा राज्य परिवहन स्थानाकडे उपलब्ध असल्यास,संरक्षकास घेवून जाण्याची अनुज्ञा देण्यात येईल.

२) माल नोंदविण्यात आल्यानंतर आयातिक रेल्वेची, आगबोटीची, विमानाची किंवा राज्य परिवहन महामंडळाची पावती व पासच्या दोन्ही प्रती त्याच जकात अधिका-यापुढे सादर करील. नोंदविलेला माल पासमध्ये नमूद केलेला माल एकच आहे याविषयी जकात

अधिकारी स्वत:ची खात्री करुन घेईल आणि पासाच्या दोन्ही प्रतीवर पावतीचा तपशिल नमूद करील व निकटपूर्ववर्ती नियमाच्या पोट नियम (३) मध्ये ठरवून दिल्याप्रमाणे पुढची कार्यपध्दती अनुसरील.

३) असा माल आयातिकाने त्याचे वैयक्तीक सामान म्हणून निर्यात केला असेल त्या बाबतीत तो रेल्वेचा, आगबोटीच्या,विमानाच्या किंवा राज्य परिवहन महामंडळाच्या पावतीऐवजी सामानाची पावती किंवा यथास्थिती रेल्वेचे, आगबोटीचे, विमानाचे किंवा राज्य परिवहन महामंडाळाचे तिकीट जकात अधिका-यास सादर करील आणि असा जकात अधिकारी त्याचा तपशिल पासाच्या दोन्ही प्रतीवर नमूद करील.

**२२) महानगरपालिकेने चालविलेल्या शुल्कबंध वखारीमध्ये ठेवलेला माल विहित कालमर्यादेच्या आत निर्यात केला असेल त्याबाबतीत कार्यपध्दती. :**

१) महानगरपालिकेने चालविलेल्या शुल्कबंध वखारीत ठेवलेला माल, आयातिकाच्या आटोक्याबाहेरील कारणामुळे लेखी परवानगी नि निर्यात पासात विहित केलेल्या कालमर्यादेच्या आत निर्यात करणे शक्य नसेल त्याबाबतीत, तो अशी कालमर्यादा वाढवून घेण्यासाठी शुल्कबंध वखारीच्या प्रभारी अधिका-याकडे अर्ज करील असा अधिकारी तो माल पडताळून पाहिल आणि निर्यात करण्यात ज्या कारणामुळे तो असफल झाला त्या कारणाविषयी स्वत:ची खात्री करुन घेईल, खात्री झाल्यास त्याला ती कालमर्यादा वाढविता येईल पण कोणत्याही बाबतीत वाढविलेली एकूण मुदत बारा तासापेक्षा अधिक असणार नाही.

२) अशा कालमर्यादेच्या आत तो माल निर्यात करणे शक्य नाही असे आयातिकास वाटत असेल त्या बाबतीत, त्यास शुल्कबंध वखारीत तो माल पुन्हा ठेवता येईल व पूर्वीचा लेखी परवानगी नि निर्यात पास रद्द करुन घेतल्यानंतर नवीन पासासाठी अर्ज करता येईल. अशा बाबतीत नियम २० अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे त्याला नवीन अनामत रक्कम ठेवावी लागणार नाही. पण तो अशा लेखी परवानगी नि निर्यात पासाबद्यल, त्या बाबतीत केलेल्या स्थायी आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेली फी कोणतीही असल्यास देण्यास पात्र असेल.

३) रेल्वे, आगबोट, विमान किंवा राज्य परिवहन मंडळाच्या बसगाडया यांच्याद्वारे निर्यात करावयची असेल त्या बाबतीत, आयातिकास पासात विहित केलेल्या कालमर्यादेच्या आत मालासाठी जागा मिळू शकत नसेल तर तो ती वस्तुस्थिती संबंधीत जकात अधिका-यास कळवील व विहित कालमार्यादा वाढविण्यासाठी लेखी विनंती करील. योग्य ती चौकशी केल्यानंतर जकात अधिकारी अशी मुदतवाढ मंजूर करील. रेल्वे,आगबोट,विमान किंवा राज्य परिवहन मंडळाची पावती सादर करण्यासाठी अनुज्ञेय असलेली कमाल कालमर्यादा पास दिल्याच्या तारखेपासून सात दिवसांची असेल.

**२३) अनामत रक्कमांच्या परताव्याची मागणी . :**

नियम २० अन्वये ठेवलेल्या अनामत रक्कमेच्या परताव्याची मागणी करणारा प्रत्येक आयातिक निर्गमन नाक्याच्या जकात अधिका-याने यथोचितरित्या पृष्ठांकन केलेला लेखी परवानगी नि निर्यात पास अनामत रक्कमेची पावती यासह परताव्यासाठी नमुना १० मध्ये जकात निश्चीत केलेल्या वेळेत कोणत्याही कामाच्या दिवशी माल प्रत्यक्ष निर्यात केलेल्या तारखेपासून एक महिन्याच्या मुदतीत करता येईल. मागणी नियमानुसार आहे अशी खात्री झाल्यावर उप आयुक्त त्यांनी धारण केलेल्या स्थायी ॲग्रिममधून ती रक्कम ताबडतोब परत देईल.

**२४) नंतर निर्यात करावयाचा शुल्कपात्र माल आयातकाने स्वतः तात्पुरता ठेऊन**

**घेण्यासाठी कार्यपध्दती : -**

महानगरपालिका हद्दीमध्ये खालील पोटनियम १, २ व ४ प्रमाणे कोणत्याही कारणास्तव तात्पुरत्या स्वरुपासाठी माल आयात करुन नंतर निर्यात करावयाचा असल्यास त्याकरीता प्रथम आयुक्त यांचेकडेस अर्ज करुन रितसर परवानगी घेऊन नंतरच आयातिकास तसे करता येईल.

१) जो माल जकात हद्दीमध्ये तात्पुरता ठेऊन नंतर निर्यात करावयाचा असेल असा शुल्कपात्र माल किंवा परत केलेला माल आयातिकास त्याच्या निवासस्थानी किंवा नियम १० पोटनियम (२) अन्वये अनुज्ञाप्ती दिलेल्या एखादया शुल्कबंध वखारीच्या ठिकाणी जकात हद्दीत ठेवावयाचा असेल त्याबाबतीत त्यास नमुना नं.४ मध्ये जकात अधिका-याला प्रतिज्ञापत्र दिल्यावर आणि प्रवेश नाकयाच्या ठिकाणी त्यावर देय असलेल्या पूर्ण जकातीच्या रक्कमे इतकी रक्कम रोखीच्या स्वरुपात अनामत म्हणून भरल्यावर त्यास तसे करता येईल.

२) आयातक संपूर्ण मालाचे विभाजन न करता किंवा यंत्रसामूग्रीच्या बाबतीत जुळणी व चाचणी घेतल्या वाचून माल निर्यात करु शकत नसेल त्या बाबतीत (मनपा हद्दीत तात्पुरत्या स्वरुपासाठी जुळणी व चाचणी करीता आयात होऊन निर्यात होणा-या मालाचे बाबतीत) आयुक्ताने त्या प्रयोजनार्थ प्राधिकृत केलेल्या अधिका-याच्या समक्ष व त्याचे लेखी मंजुरीनेच ती गोष्ट करील. आवश्यक असल्यास अशा मालाची पुडकी तयार करण्यात येतील. व प्राधिकृत केलेल्या अधिका-यास ती मोहरबंद करुन त्यावर खुणा करता येतील व पोटनियम १ मध्ये ठरवून दिल्याप्रमाणे पुढील कार्यपध्दत अनुसरील.

३) दुरुस्ती व फेरनिर्यात करण्यासाठी आयात केलेली यंत्रसामुग्री, उपकरणे किंवा इतर वस्तू व त्यांचे सुटे भाग (यात टायर व टयुब यांचा समावेश होतो) यांचे बाबतीत आयातिकाने उक्त प्रयोजनासाठी असा माल आयात करण्यासंबंधी पोटनियम १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अनामत रक्कम भरल्यानंतर कार्यशाळा व्यवस्थापक यांचेकडून त्याच्या कार्यशाळेत दुरुस्त्या करण्यात आल्या अशा आशयाचे प्रमाणपत्र घेतले पाहिजे. असे प्रमाणपत्र निकटवर्तीय नियमाच्या पोटनियम (१) अन्वये मालाची निर्यात करण्यापूर्वी त्याची पडताळणी करतांना सादर करण्यात येईल.

४) पोट-नियम (३) मध्ये नमूद केलेल्या तरतूदी व स्थायी आदेशात नमूद केलेल्या अटी जरुर त्या फेरफारासह प्रक्रिया करण्यासाठी व त्यानंतर फेरनिर्यातीसाठी जकात हद्दीत आयात करण्यात आलेल्या शुल्कपात्र मालाच्याही बाबतीत लागू असतील.

**२५) आयातकाने तात्पुरता ठेवून घेतलेला शुल्कपात्र माल निर्यात करण्याची कार्यपध्दती :**

१) आपल्याजवळ ठेवून घेतलेला शुल्कपात्र माल आयातकास निर्यात करावयाचा असेल तेव्हा तो माल निर्यात करण्यासाठी लेखी परवानगी मिळवण्याकरीता आवश्यक तो तपशिल देऊन नमुना ११ मध्ये सूचना व अर्ज प्राधिकृत अधिका-यास सादर करील आणि असा माल मध्यवर्ती जकात कार्यालयात किंवा महानगरपालिकेने त्या प्रयोजनार्थ स्थापन केलेल्या अशा इतर कोणत्याही ठिकाणी प्राधिकृत अधिकारी निश्चित करील अशावेळी कोणत्याही दिवशी पडताळणीसाठी हजर करील.

२) प्रत्येक आयातक आपल्या स्वत:च्या मालाबद्दल एक स्वतंत्र सूचना व अर्ज देईल. मालाच्या एकेक पाठवणीबद्दल एक सूचना व अर्ज पुरेसा असेल. पाठविलेल्या अशा मालात निरनिराळ्या वर्णनाच्या मालाचा अंतर्भाव असेल तेव्हा सूचना व अर्जात संपूर्ण तपशिल स्वतंत्रपणे देण्यात येईल.

३) असा कोणताही सूचना व अर्ज खालील परिस्थितीत स्विकारला जाणार नाही.

अ) जर तो सर्व बाबतीत अपूर्ण असून, त्यावर आयातकाने स्वत: किंवा याबाबतीत त्याने लेखी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने स्वाक्षरी केलेली नसेल.

ब) त्याच्या पुष्टयर्थ आयातीच्या वेळी भरलेल्या अनामत रक्कमेची पावती लावलेली नसेल व आयातीच्या वेळी दाखल केलेले मूळ बीजक कोणतेही असल्यास जोडलेले नसेल.

क) सदर नियमाच्या पोट नियम (२) च्या उपबंधाना अधीन राहून, निरिक्षणार्थ सादर केलेला व निर्यात करण्याचा इरादा असलेला माल, आयातीच्या वेळी तो जसा होता तसाच नसेल.

ड) या मालाचा आयातक व निर्यातक एकच व्यक्ती नसेल आणि अशा वस्तूंच्या मालकीत बदल होत असेल.

इ) पोट नियम २४ मधील (३) व (४) चे कारणासाठी आयात झालेल्या मालाचे बाबतीत सदर आयात मालाची जुळणी किंवा उत्पादन झाल्याचे किंवा विक्री झाल्याचे निदर्शनास आल्यास, तसेच नियम २४ (२) प्रमाणे निर्यात झाला नसल्यास,

**टीप** : ज्या शुल्कयोग्य मालास लगतपूर्ववर्ती नियमाचे पोट नियम (३) व (४) लागू होतात. त्या मालाच्या बाबतीत खंड (क) चे उपबंध लागू होणार नाही.

४) अशा सुचना व अर्ज मिळाल्यावर आणि निर्यात करण्याचा इरादा असलेला माल मध्यवर्ती जकात केंद्रावर येऊन पोहचल्यावर जकात अधिक्षक किंवा त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी :

अ) वर विहीत केलेल्या सर्व शर्ती पूर्ण केलेल्या आहेत. या विषयी स्वत:ची खात्री करुन घेईल.

ब) निरीक्षणासाठी प्रत्यक्षपणे सादर केलेला माल सूचना नि अर्जात व संबंधित आयात बीजकात (असल्यास) किंवा नमुना ४ मध्ये आयात प्रतिज्ञापत्रात वर्णन केल्याप्रमाणे आहे हे पडताळून पाहिल आणि आवश्यक वाटेल तेव्हा असा माल मोहरबंद करील व त्यावर खुणा करील आणि

क) अशा पासावर आयातकाची किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या आभिकर्त्यांची नमुना स्वाक्षरी घेण्यात आल्यानंतर नमुना १२ (२५) मध्ये लेखी परवानगी व परतावा निर्यात पास देईल.

५) महानगरपालिकेने संरक्षकांची तरतूद केली असेल तर आयातक अशा संरक्षकासमवेत तो माल त्यानंतर पासात विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेच्या आत व विनिर्दिष्ट केलेल्या मार्गाने निर्गमन नाक्यामधून जकात हद्यीच्या पलिकडे घेऊन जाईल. निर्गमन नाका ओलांडण्यापूर्वी आयातक तो माल पासासह निर्गमन नाक्याच्या जकात अधिका-यास निरिक्षणार्थ सादर करील. ही कालमर्यादा मध्यवर्ती जकात कार्यालयापासून किंवा शाखा कार्यालयापासून निर्गमन नाक्यापर्यंतचे अंतर लक्षात घेऊन, निश्चित करण्यात येईल. परंतु ती कालमर्यादा कोणत्याही बाबतीत परवानगी नि परतावा निर्यात पास दिलेल्या वेळेपासून २ तासापेक्षा अधिक असणार नाही.

६) असा माल व त्याचप्रमाणे असा पास सादर केल्यावर,निर्गमन नाक्याचा जकात अधिकारी पुढील गोष्टीविषयी आपली खात्री करुन घेईल.

अ) पास व त्याचप्रमाणे तो माल विनिर्दिष्ट कालमर्यादेच्या आत सादर करण्यात आला आहे.

ब) मुद्रा किंवा खुणा, कोणत्याही असल्यास जशाच्या तश्या आहेत. आणि

क) तो माल प्रत्यक्ष पासात नमूद केलेल्या मालाशी तंतोतंत जुळतो.

ड) अशा प्रकारे खात्री करुन घेतल्यावर जकात अधिकारी, त्या प्रयोजनार्थ ठेवलेल्या नोंद वहीत संबंधित नोंदी करील त्यावर आयातकाची स्वाक्षरी घेईल, पासावर दिलेल्या प्रमाणपत्रावर सही करील, तो आयातकाच्या स्वाधीन करील व जकात हद्यीच्या पलीकडे माल जाऊ देईल.

(७) असा माल पासात विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेच्या आत निर्गमन नाक्यावर हजर केला नसेल, तर त्या निर्गमन नाक्याच्या जकात अधिका-यास मुख्य आयातकार अधिक्षक किंवा त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी यांच्याकडून त्या मालाची पुन्हा पडताळणी करुन घेईल आणि असा मुख्य आयातकर अधिक्षक किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी आपल्या दुस-या तपासणीच्या वेळी तांबडया शाईने पृष्ठांकन करील व कालमर्यादाही वाढवील. पडताळणी केलेला माल, त्या मालाची फेर पडताळणी केल्यानंतर, अनुज्ञेय कालमर्यादेच्या आत पासासह निर्गमन नाक्याच्या ठिकाणी हजर करण्यात आला तर, पूर्ववर्ती पोटनियमात निश्चीत केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

(८) असा माल रेल्वेने, समुद्रमार्गे, विमानाने किंवा राज्य परिवहन महामंडळाच्या बस गाडयांद्वारे निर्यात करावयाचा असेल तर, निर्गमन नाक्याचा जकात अधिकारी :

अ) पोटनियम (६) मध्ये नमुद केलेल्या तीन बाबींविषयी प्रथम आपली खात्री करुन घेईल.

ब) नोंदवहीत संबंधीत नोंदी करुन, त्यावर आयातकाची स्वाक्षरी घेईल व पासावरील आवश्यक त्या प्रमाणपत्रावर सही करील.

क) निर्यातकाने रेल्वेची, आगबोटीची, विमानाची किंवा राज्य परिवहन महामंडळाची पावती किंवा सामानाची पावती किंवा रेल्वेचे, आगबोटीचे,विमानाचे किंवा राज्य परिवहन महामंडळाचे तिकीट सादर केल्याशिवाय निर्यात पूर्ण नाही असा शेरा /ठसा पासावर मारील आणि

ड) निर्यातकाला तो माल रेल्वे आवार, बंदर ,विमानतळ किंवा राज्य परिवहन स्थानिक यांचेकडे उपलब्ध असल्यास संरक्षकासमवेत नेण्यास परवानगी देईल.

(९) माल पाठविण्यासाठी नोंदविल्यावर, आयातक रेल्वेची, आगबोटीची, विमानाची किंवा राज्य परिवहन महामंडळाची पावती त्या पाससह उक्त जकात अधिका-याला माल पाठविण्यासाठी नोंदविल्याच्या तारखेपासून तीन दिवसाच्या आत सादर करील, जकात अधिकारी पाठविण्यासाठी नोंदविलेला माल व पासांत वर्णन केलेला माल एकच आहे. या विषयी स्वत:ची खात्री करुन घेईल आणि त्यानंतर रेल्वेच्या आगबोटीच्या,विमानाच्या किंवा राज्य परिवहन महामंडळाच्या पावतीचा तपशिल त्या पासावर नमूद करील, त्यावर निर्यात पूर्ण असे पृष्ठांकन करील. अशा पृष्ठांकनावर सही करुन तारीख घालील व तो पास आयातकाच्या स्वाधीन करील अशी कार्यपध्दती सामानाची पावती किंवा रेल्वेचे, आगबोटीचे, विमानाचे किंवा राज्य परिवहन महामंडळाचे तिकीट सादर करुन वैयक्तीक सामान म्हणून तो माल निर्यात केला असेल तर त्या बाबतीतही अनुसरण्यात येईल.

## २६) घाऊक विक्रेते आणि व्यापारी यांचेकडे तात्पुरता ठेवलेल्या शुल्कदेय मालाच्या निर्यातीबाबत : -

घाऊक विक्रेते आणि व्यापारी यांनी आयात केलेला शुल्क देय माल स्वत:कडे ठेऊन नंतर निर्यात करावयाचा झाल्यास आयात झालेल्या शुल्कदेय मालाचे बाबतीत नियम २४, २५ व २८ प्रमाणे कार्यपध्दती राहिल.

(१) आयुक्त कोणत्याही घाऊक विक्रेत्यांना किंवा व्यापा-यांना निकटपूर्ववर्ती नियमात तरतूद केल्याप्रमाणे मुख्य जकात कार्यालयात किंवा शाखा कार्यालयाच्या ठिकाणी प्रत्यक्ष पडताळणी केल्याशिवाय मालाची निर्यात करण्यास व बीजकामध्ये निर्दिष्ट केलेल्या मालासाठी अशा पडताळणी शिवाय लेखी परवानगी नि परतावा निर्यात पास प्राप्त करण्यास परवानगी देऊ शकेल. तथापि आयुक्त अथवा उपआयुक्त, सहा.आयुक्त (कर) किंवा जकात अधिक्षकाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास पुडकी उघडण्याची आणि निर्यात व त्याचप्रमाणे आयात बीजकाबरोबर तो माल कोणत्याही अधिका-यास पडताळून पाहण्याची मोकळीक असेल. आणि अशा बाबतीत निर्यातकाने पडताळणीसाठी अशी पुडकी उघडली पाहिजेत. असा आयातिक या सवलतीचा दुरुपयोग करीत असेल, सकारण वाटत असेल त्याबाबतीत आयुक्तास अशी सवलत काढून घेता येईल.

२) आयुक्त अशा आयातिकांना निकटपूर्ववर्ती नियमात तरतूद केल्याप्रमाणे पडताळणीसाठी तो माल मध्यवर्ती जकात कार्यालयाकडे किंवा शाखा कार्यालयाकडे न आणता देखील रेल्वेने, आगाबोटीने, विमानाने किंवा राज्य परिवाहन महामंडळाच्या बसगाडयांनी मालाची मोठया प्रमाणावर निर्यात करण्यासाठी परवानगी देवू शकेल. अशा बाबतीत नमुना ११ मध्ये सूचना नि अर्ज मिळाल्यानंतर लेखी परवानगी नि परतावा निर्यात पास देण्यात येईल. निर्गमन नाक्याचा जकात अधिकारी माल पडताळून पाहिल व माल रेल्वे आवार, बंदर, विमानतळ किंवा राज्य परिवहन स्थानक याकडे घेऊन जाण्याची परवानगी देण्यापुर्वी त्या पासाच्या पाठीमागील बाजुवर मालाचे स्वरुप,त्यातील वस्तू व त्याचे वजन नमूद करील. पाठविण्यासाठी माल नोंदविल्यानंतर आयातिक रेल्वेची, आगबोटीची, विमानाची किंवा राज्य परिवहन महामंडळाची पावती व पास मध्यवर्ती जकात कार्यालयात सादर करील.

अशा मध्यवर्ती जकात कार्यालयात तो पास ठेवून घेण्यात येईल व ती पावती आयातिकास परत करण्यात येईल. प्रत्येक महिन्याच्या शेवटी आयातिक रेल्वेच्या,आगबोटीच्या, विमानाच्या किंवा राज्य परिवहन महामंडळाच्या पावतीत दिलेल्या वजनाच्या आधारे परताव्यासाठी एक बिल पाठवील. अशी पावती पासाबरोबर ताडून पाहण्यात येईल व पासात नमूद केलेल्या वजनानुसार परतावा मंजुर करण्यात येईल्. हा पोट नियम ज्या मालावरील शुल्क वजनाच्या आधारे वसूल करण्यात येईल त्या मालाच्या बाबतीत लागू होईल.

**२७ अ) पेट्रोल आणि पेट्रोलजन्य उत्पादनाच्या घाऊक वितरणाचा व्यवहार करणा-या शासन अंगीकृत व खाजगी कंपन्यांच्या बाबतीत व्यवस्था : -**

१) पेट्रोल व पेट्रोलजन्य उत्पादने यांचे घाऊक वितरण करणा-या कंपन्यांच्या बाबतीत आणि ज्यांना या प्रयोजनाकरीता मोठया साठयाच्या साठवणीकरीता टाक्यांचा वापर करावा लागतो. त्याच्या बाबतीत आयुक्त या वस्तूंचा आयात व निर्यातीची मासिक विवरणपत्रे सादर करण्यास त्यांना परवानगी देईल. उक्त मासिक विवरणपत्रे ही प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपूर्वी नियमितपणे पाठवण्यात येतील. आयुक्त एका महिन्याहून जास्त नसलेल्या अंतराने उक्त विवरणपत्रांची छाननी केल्यावर हिशेब करील आणि उक्त कंपन्याकडून महानगरपालिकेस देय असलेली जकात निश्चीत करील हिशेब करावयाच्या वेळी मालाच्या निर्यातीवर नियमांनुसार अनुज्ञेय परताव्याची रक्कम, रीतसर विचारात घेण्यात येईल.

२) उक्त कंपन्यांनी आयुक्तास आवश्यक वाटेल अशी माहिती किंवा तपशिल दिला पाहिजे आणि कागदपत्रे सादर केली पाहिजेत. अशा कंपन्यांकडून कोणत्याही वेळी देय अशी रक्कम वळती करण्याकरीता अशा देय रक्कमांच्या बाबतीत उक्त कंपन्या आयुक्तास पुरेशी वाटेल अशी अनामत रक्कम देखील ठेवतील.

३) पोट नियम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे हिशेब नक्की केल्यानंतर कोणतीही रक्कम महापालिकेस देय असल्याचे आढळून आले व जर ती मागणी केल्यानंतर देण्यात आली नाही तर ती पोट नियम (२) मध्ये उल्लेखलेल्या अनामत रक्कमेतून वसूल करता येईल किंवा जर उक्त अनामत अपुरी असेल तर अधिनियमाचा अवलंब करुन ती वसूल करता येईल.

**ब) दुचाकी व चार चाकी अथवा इतर वाहने मनपा हद्दीत आयात करुन शोरुमला तात्पुरत्या स्वरुपासाठी पीडीआय, प्रदर्शन व विक्री करीता आयात होणा-या वाहनांचे जकात भरणेसाठी उपाययोजना : -**

नाशिक महानगरपालिका हद्यीतील दुचाकी, चारचाकी व इतर वाहन विक्रेत्याचे शोरुमला तात्पुरत्या स्वरुपासाठी पीडीआय प्रदर्शन व विक्री करीता आयात होणा-या वाहनांचे जकात वसुली करीता शोरुमला ठेवण्यात येणा-या वाहनांच्या संख्याचे किंमतीवर होणा-या

जकातीइतक्या रक्कमेइतकी सरासरी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून स्विकारुन स्थायी आदेशातील विहीत अटीशर्तीवर परवानगी देण्यात येईल.

**२८) अनामत रक्कम परत करण्यासाठी उपबंध : -**

१) ज्या मालाकरीता त्याची आयात करतेवेळी नियम २४ अन्वये अनामत रक्कम देण्यात आलेली असेल असा माल निर्यात करण्यात येईल तेव्हा, वसूल केलेली अनामत रक्कम पोटनियम (२) च्या उपबंधाच्या अधीन राहून व स्थायी आदेशात नमूद केलेल्या कार्यपध्दतीने परत करण्यात येईल.

२) खालील सर्व शर्ती पूर्ण केलेल्या असतील तर परतावा अनुज्ञेय असेल.

अ) निर्यातीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत परताव्यासाठी अर्ज केलेला असेल.

ब) असा माल त्याच्या आयातीपासून सहा महिन्यांच्या आत जकात हद्दीच्या बाहेर निर्यात केलेला असेल.

क) परताव्याच्या अर्जाच्या पुष्ठर्थ यथोचितरित्या प्रमाणित केलेल्या लेखी परवानगी व परतावा निर्यात पास पाठविण्यात आलेला असेल.

ड) नियम २५ च्या पोट नियम (३) मधील सर्व शर्ती पूर्ण केलेल्या असतील.

इ) निर्यात केलेला माल आयातीच्या वेळी आयातकाकडे तात्पुरता ठेवून नंतर निर्यात करण्याचा इरादा असल्याचे आयात नाक्यावर जाहिर केले असेल.

फ) परताव्याकरीता देय रक्कम १००/- रुपयाहून कमी नसेल.

ग) आयातीच्या वेळी निर्यात केलेला माल हा परत केलेला माल म्हणून आयात नाक्यावर जाहीर केलेला असेल.

ह) ज्या मालाच्या आयातीच्या वेळी नियम २४, २५ व २६ अन्वये अनामत रक्कम जमा केली असेल अशा अनामत रक्कमेचा परतावा देतांना जकात रक्कमेच्या १० टक्के रक्कम प्रशासकीय खर्च म्हणुन वजा करुन उर्वरित रक्कम परत करण्यात येईल. सदरच्या प्रशासकीय खर्च वेळोवेळी ठरविण्याची अनुमती महानगरपालिकेस असेल.

३) नियम २३ आणि २४ प्रमाणे अनामत भरुन आयात झालेल्या मालाची महानगरपालिका हद्दीमध्ये खप, वापर, विक्री, किंवा उत्पादन झाल्याचे निदर्शनास आल्यास परतावा अनुज्ञेय राहणार नाही.

४) लेखी परवानगी नि परिवहन पास यात नमूद केल्याप्रमाणे अनामत रक्कम नियम १८ अन्वये दिलेल्या परवानगी कम ट्रान्झिट पासात नमूद केलेल्या मुदतीच्या नंतर व नियम १८ (२) अन्वये आयात नाक्यावर भरलेल्या डिपॉझिटच्या वेळेपासून ४८ तासापर्यंतचे मुदतीत माल निर्यात नाक्यावर आल्यास सदरहू डिपॉझिटची रक्कम सहा.आयुक्त/अधिक्षक यांची आगाऊ परवानगी घेतल्याशिवाय निर्गमित नाक्यावर रिफंड दिली जाणार नाही.

५) हा नियम ज्या तारखेस महानगरपालिका क्षेत्रात अंमलात येईल त्या तारखेपासून जकात हद्दीमध्ये आयात केलेल्या मालास लागू होईल.

**२९) परताव्याच्या कार्यपध्दती : -**

१) अनामतीच्या परताव्यासाठी करायचा अर्ज आयातिकाने स्वत: किंवा याबाबतीत योग्य रितीने लेखी प्राधिकृत केलेल्या त्याच्या अभिकर्त्याने महानगरपालिकेने पैशाच्या व्यवहारासाठी निश्चीत केलेल्या वेळेत, कोणत्याही कामाच्या दिवशी प्रत्यक्ष निर्यातीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत नमुना १३ मध्ये मध्यवर्ती जकात कार्यालयाकडे केला पाहिजे. परताव्याच्या मागणीसाठी असलेला शेवटचा दिवस एखादया सार्वजनिक सुटीचा दिवस असेल तर असा अर्ज नंतरच्या कामाच्या दिवशी स्विकारण्यात येईल.

२) अशा अर्जासोबत यथोचितरित्या प्रमाणित केलेली संबंधीत लेखी परवानगी नि परतावा निर्यात पास पाठविण्यात आला पाहिजे आणि त्यात आयातिकाने अगोदरच दिलेल्या संबंधीत निर्यात सूचना नि अर्जासंबधी निर्देश असला पाहिजे. प्रत्येक लेखी परवानगी नि परतावा निर्यात पासासाठी एक स्वतंत्र अर्ज केला पाहिजे.

३) परताव्याचा अर्ज नियमानुसार असून निकटपूर्ववर्ती नियमात विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शर्ती करीत असेल तर, परताव्याच्या रक्कम नंतरच्या अनुवर्ती नियमात विहीत केलेल्या मर्यादेस अधीन राहून अचूकपणे निश्चीत करण्यात आली पाहिजे.

**३०) परताव्याच्या प्रयोजनासाठी मालाचे मूल्य व वजन इत्यादी : -**

जो माल यथामूल्य शुल्क आकारले जाण्यास पात्र असेल, त्या मालाच्या बाबतीत परताव्याची मागणी केलेली असेल तेव्हा परताव्याच्या प्रयोजनासाठी मूल्य हे त्यावेळी ठरविण्यात आला होता असा वाहतुकीचा खर्च व इतर अनुषंगिक खर्च यासह ज्या बीजकच्या आधारे शुल्क मूलतः भरले होते त्या बीजकानुसार असलेले मूल्य असेल. असे मूल्य बीजकाच्या अभावी आयातिच्या दिवशी चालू बाजारभावाच्या आधारे निश्चीत केलेले असेल त्या बाबतीत फक्त तेच मूल्य विचारात घेतले पाहिजे आणि निर्यातीच्या दिवशी स्थानिक बाजारात चालू असलेला बाजारभाव विचारात घेण्यात येवू नये.

**३१) परताव्याचा अर्ज तातडीने निकाली काढणे : -**

१) परताव्याच्या सर्व अर्जावर तत्परतेने कार्यवाही केली पाहिजे व एखादी मागणी नियमानुसार असल्याचे आढळून येईल तेव्हा रक्कम स्वीकारण्यासाठी अर्जदारास सूचना देण्यात येईल. परताव्याची रक्कम मागणी केल्यानंतर परत करण्यात येईल.

२) जकात निरिक्षका कडून ( ऑक्ट्रॉय इन्स्पेक्टर ) कमी दर्जा नसलेला महानगरपालिका अधिका-याने आयातिकाकडे - अ) दिलेली जकात किंवा द्यावयाची जकात ब) आयातिकाने जकातीची माफी किंवा सवलती मिळवण्यासाठी किंवा मिळविल्या असल्यास त्यासंबंधी पाळावयाची बंधने, क) आयातिकाने केलेले प्रतिज्ञापत्र, ड) आणि अन्य अशा बाबी... यासबंधी प्रश्न उद्भवल्यास त्या सबंधीची निवेदन, नोंदणी पुस्तके किंवा इतर कागदपत्रे यासंबंधीची मागणी केल्यास अशी निवेदन, नोंदणी पुस्तके किंवा इतर कागदपत्रे त्याने ताबडतोब सादर केली पाहिजेत.

कोणतेही प्रतिज्ञापत्र केल्याच्या तारखेनंतर किंवा जकात किंवा अनामत रक्कम भरल्याच्या तारखेपासून किंवा यथास्थिती कोणत्याही कारणाने जशी रक्कम भरण्यात आली नसेल त्या बाबतीत, ज्या तारखेस आयातीच्या ठिकाणाहून माल सोडवण्यात आला असेल त्या तारखेपासून एक वर्षाहून अधिक काळानंतर उक्त अधिका-याने वरीलप्रमाणे कोणतीही मागणी करता कामा नये.

**३२) परताव्याची रक्कम देण्यासाठी स्थायी ॲग्रिम रक्कम ठेवण्यात येईल. :**

परताव्याची रक्कम देण्यासाठी जकात अधिक्षक स्थायी ॲग्रिम रक्कम ठेवील.

**३३) ज्या कारखान्याकडून तडजोडीच्या रुपाने ठोक रक्कम आगाऊ स्विकारली असेल त्या कारखान्याच्या भोगवटदारानी आयातिचे व निर्यातीचे मासिक विवरण सादर करणे . : - (असा माल आयातीचे वेळी जसा आहे तसाच निर्यात होत असल्यास)**

एखादया कारखान्याच्या कोणत्याही भोगवटदारानी दयावयाच्या जकातीच्या रक्कमेबद्दल तडजोडीच्या रुपाने महानगरपालिकेने अनामत रक्कम अथवा बँक गॅरंटी घेऊन संबंधितास महानगरपालिका लादील अशा कोणत्याही इतर अटीशर्ती सह त्या महिन्यात आयात व निर्यात केलेला शुल्कयोग्य असा सर्व माल दर्शविणारे मासिक विवरणपत्र व दहा टक्के सेवा शुल्कासह जकात अधिक्षक फर्मावेल अशा नमुन्यात (कोणत्याही असल्यास) जकात अधिक्षकास सादर करील. असे मासिक विवरण आगामी महिन्याच्या १० व्या दिवसापूर्वी नियमितपणे सादर करण्यात येईल. सदर परवानगी देणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त यांना असतील.

**३४) जकातीस पात्र असलेला माल तपासण्याचा अधिकार : -**

१) महानगरपालिका जकात हद्दीबाहेरुन आलेला माल आयात करणा-याने आयुक्तांनी/उपआयुक्तांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याने मागणी केल्यास तो माल जकातीस पात्र आहे अगर कसे आणि जकात किती आकारावी लागेल याची खात्री करुन घेण्याकरीता सदर नमुद तरतूदीचे, नियम व स्थायी आदेशातील सर्व तरतूदीचे पालन करावे आयातकाने खालील अटीचेही पालन करावे.

अ) नाका अधिकारी याचे तपासणीकामी मालाची उतराई आणि भराई ही आयातकाला स्वखर्चाने करावी लागेल.

ब) मालाचे वजन, नग संख्या, त्यावरील शिक्का, मुद्रा किंवा ओळखण्या साठी इतर खुणा याची तपासणी व पडताळणी करण्याचा अधिकार जकात अधिका-यास राहील.

क) वाहनामध्ये किंवा ओझे वाहू प्राणी यावरील मालाची तपासणी व पडताळणी करण्याचा अधिकार जकात अधिका-यास राहिल.

ड) जकात हद्दीतील कोणत्याही भागात कोणताही माल, तो माल जकात हद्दीच्या बाहेरुन आणण्यात आला किंवा नाही आणि बाहेरुन आणला असल्यास त्यावरील जकात कर भरला की नाही याची तपासणी करण्याचा अधिकार जकात अधिका-यास राहिल.

इ) आयातकाने त्याच्या ताब्यात असलेल्या मालाची बीजके किंवा इतर अनुषंगिक कागदपत्रे जकात अधिका-यास पडताळणी करणेकामी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहिल.

फ) आयात मालाची सादर केलेली कागदपत्रे योग्य व अचूक असले बाबत लेखी प्रतिज्ञापत्र नमुना १ मध्ये आयातिकाने लिहून दयावे लागेल.

१) प्रत्येक वाहन चालकाने आणि जनावरांचा ताबा असलेल्या प्रत्येक इसमाने वाहनात अगर जनावरांचे पाठीवरील मालाचे वर्णन, वजन आणि मालाची संख्या दाखविणारे नमुना १ मध्ये इकरारपत्र जकात अधिकारी यांस दिले पाहिजे.

२) आयुक्त/उपआयुक्त यांनी याकामी प्राधिकृत केलेल्या अधिका-याने मागणी करुनही जर आयातकाने महापालिकेच्या जकात हद्दीमध्ये आयात होणा-या मालाचे वाहन अथवा ओझे वाहून नेणारा प्राणी याद्वारे आयात होणा-या मालाचे तपासणीसाठी वाहनाची वा प्राण्याची तपासणी करण्यास नकार दिल्यास ते वाहन अथवा प्राणी मालासह जकात मध्यवर्ती गोडावून येथे जमा करुन ताब्यात घेऊन जकात विभाग प्रमुख यांच्यापुढे तपासणीसाठी सादर करतील.

३) महानगरपालिकेचे जकात विभाग प्रमुख अधिका-यापुढे वरीलप्रमाणे माल हजर करण्यास आलेला खर्च, माल आयात करणा-या इसमाने न दिल्यास तो त्या इसमाकडून त्याचा जंगम माल जप्त करुन, व त्याची विक्री करुन अगर दिवाणी कोर्टामार्फत मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३९८, ३९९ प्रमाणे वसूल केला जाईल.

**३५) महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालाची आवश्यक ती तपासणी करणेचे अधिकार : -**

आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांना महापालिका हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालाची देय जकात भरली किंवा नाही याकामी मागील ३ वर्षाचे हिशोबाचे संपूर्ण कागदपत्र तपासणी करणेचे खालील प्रमाणे अधिकार असतील.

अ) जकात अधिका-याने जकात हद्दीत कोठेही तपासणीसाठी मागणी करीता आयात मालाबाबतचे लेखी पुरावे व इतर कागदपत्रे किंवा आयात मालाबाबत साठा रजिष्टर, खरेदी रजिष्टर व डिलीव्हरी रजिष्टर इन्कम टॅक्स/सेल्स टॅक्स/एक्साईज रिर्टन्ससह आणि इतर तदअनुषंगिक कागदपत्रे आयातकाने, विक्रेत्याने, उत्पादकाने किंवा वाहतुकदाराने सादर करणे बंधनकारक राहील.

ब) आयातकाने, विक्रेत्याने, उत्पादकाने किंवा वाहतुक व्यावसायिकाने आयात मालाबाबत ठेवलेले साठा रजिष्टर,खरेदी रजिष्टर, विक्री रजिष्टर डिलीव्हरी रजिष्टर इत्यादी संबंधी लेखे व रजिष्टर्स व इतर तदअनुषंगिक कागदपत्रे यांची अधिकारी तपासणी करतील व जरुर पडल्यास त्यांचा गोषवारा किंवा नकला घेऊन सदर मालासंबंधी प्रत्यक्ष पडताळणी करतील.

क) आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास आयातक,वाहतुकदार, किरकोळ विक्रेता, उत्पादक यांना कोणत्याही आयात मालाची जकात चुकविली आहे किंवा जकात चुकविण्याचा प्रयत्न केला असल्याचा संशय असल्यास किंवा तक्रार प्राप्त झाल्यास त्यांचे गोदाम व व्यवसायाचे ठिकाणी व जेथे पुरावे आढळतील अशा ठिकाणी प्रवेश करुन त्यासंबंधीचा पुरावा आढळल्यास त्यांचे लेखे, रजिष्टरर्स व इतर तदअनुषंगिक कागदपत्रे जप्त करतील व तसेच जप्त केलेल्या कागदपत्रांबाबत रितसर पावती देण्यात येऊन पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी किंवा कायदयातील / नियमातील किंवा स्थायी आदेशातील तरतूदीप्रमाणे कायदेशिर कार्यवाहीसाठी ताब्यात घेतील.

ड) उपरोक्त क च्या प्रयोजनार्थ लेखे रजिष्टर्स व इतर अनुषंगिक कागदपत्रे तपासणीअंती त्यांचे खरेखोटेपणा बाबत शंका असल्यास अशा मालाबाबत केंद्र व राज्य शासनाच्या संबंधीत नियंत्रित विभागाकडील कागदपत्रे व त्यातील नोंदी आधारभूत व ग्राहय मानल्या जातील व त्याप्रमाणे नियम ४० मधील तरतुदीनुसार जकात कराची अधिक १० पट तडजोड फी सह वसुली केली जाईल. याबाबतचा जकात अधिका-याचा निर्णय अंतिम राहील व तो यथास्थिती पूर्वलक्षी प्रभावाने सुध्दा असू शकेल.

इ) केंद्र व राज्य शासनाच्या संबंधीत नियंत्रण कार्यालय / विभाग प्रमुखांनी महापालिकेस आवश्यक माहिती पुरविणे बंधनकारक राहील.

ई) आयातीक विक्रेता, उत्पादक वितरक इ. यांनी जकात भरणा कागदपत्र न दाखविल्यास किंवा दाखविण्यास असमर्थता दाखविल्यास संबंधितांच्या व्यवसायाचे ठिकाणी जकात अधिका-यास सिल लावता येईल किंवा संबंधीत आयातिकाचा त्यापुढे नाक्यावर येणारा माल अटकवून ठेवता येईल. त्याबाबत संबंधितांस पोहच पावती देण्यात येईल. याबाबतचा अंतिम निर्णय जकात अधिका-यांचा असेल. ज्या वाहनातून जकात चोरी झाली आहे असा संशय आहे ते वाहन अटकवून ठेवता येईल.

फ) **जकात पूर्तता केली आहे किंवा नाही याची तपासणी करण्याचे अधिकार** :
जकात अगर त्यांनी अधिकार प्रदान केलेले महानगरपालिकेचे कर्मचारी व अधिकारी यांना जकात हद्यीमध्ये आयातकांची खाजगी मालकीची दुकाने,औद्योगिक उपक्रम, फर्मस, व्यावसायिक व व्यावसायिकांची ठिकाणे, खाजगी शुल्कबंध परवाना धारक (ट्रान्सपोर्ट / ट्रेडर्स) यांच्या मालकीच्या व्यवसायाच्या ठिकाणी किंवा ज्या ठिकाणी सदर माल ठेवलेला आहे. अशा जागांची जकात पूर्ततेच्या तपासणी कामी झडती घेऊन त्या मालाच्या बिलांची,कागदपत्रांची मागणी करुन तपासणी करु शकतील. त्यासाठी संबंधितांकडे उत्पादन शुल्क, विक्रीकर व आयकर भरण्याबाबत प्रत्येक वर्षातील विवरणपत्राची मागणी करेल. अथवा संबंधित खात्याकडून माहिती घेऊन जकात भरल्याची खात्री करता येईल. ज्या प्रकरणात जकात भरली नाही असे आढळून आल्यास संबंधितांकडून त्यावेळी प्रचलित दराने असलेली जकात नियम ४० प्रमाणे जकात अधिक १० पटीपर्यंत तडजोड फी ची आकारणी करतील व अशी रक्कम भरण्यास कसूर झाल्यास संबंधीत मालाचा लिलाव करुन किंवा अशी कसूर करणा-या व्यक्तीच्या विरुध्द अधिनियमातील कलम १२८ नुसार कारवाई करुन अथवा दिवाणी दावा दाखल करुन वसुली केली जाईल.

**३६) न दिलेल्या जकातीबाबत खास तरतूदी : -**

अ ) १) आयुक्त यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने जकातीच्या रक्कमेची मागणी केली असता जकातीची रक्कम भरली नाही तर ज्या मालावर जकात आकारावयाची अशा

मालापैकी जकात, जप्तीसाठी येणारा खर्च, माल ठेवणे व विक्रीसाठी लागणारा खर्च, या सर्व रकमेची भरपाई होईल इतक्या किंमतीचा माल अगर सर्व माल आणि आवश्यक असल्यास वाहनेही अटकवून ठेवू शकेल.

२) अटकाव करुन ठेवलेला माल जर नाशवंत असेल,तसेच सदरचा माल ठेवण्यासाठी येणारा खर्च व त्या मालावरील जकात अशी दोन्ही मिळून होणारी रक्कम ही मालाच्या किंमतीपेक्षा अधिक होत असेल तर तशी कल्पना आयातकास देऊन जकात रक्कम आणि सदरचा माल ठेवण्यासाठी येणारा तदअनुषंगिक सर्व खर्च अशी एकुण रक्कम वसूल होईल अशा रितीने मालाची विक्री करण्याचा हक्क अधिका-यास असेल.

३) ज्याच्या ताब्यामधून माल रोखून ठेवण्यात आला आहे त्याने होणारी जकात अधिक दंडासह/तडजोड फी सह इतर तदअनुषंगिक खर्च महापालिका कार्यालयात भरल्यास आयुक्त जप्त केलेला माल आयातिकास परत करतील.

४) जर अशी रक्कम भरली नाही तर जप्त केलेल्या मालाची विक्री करुन येणा-या रकमेमधून होणारी जकात व जप्तीचा खर्च, माल ठेवणे व विक्रीसाठी लागणारा खर्च याची वसूली करण्यात येईल.

५) अशा मालाच्या विक्रीच्या रक्कमेमधून जकात व इतर अनुषंगिक खर्च वसूल करुन उरलेली शिलकी रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येईल. ज्याच्या ताब्यातून माल जप्त केला आहे त्याने आयुक्तांकडे अथवा प्राधिकृत केंद्रीय अधिका-यास मालाची विक्री झाल्यापासून तीन महिन्याच्या आत लेखी अर्ज करुन अशा शिल्लक रक्कमेची मागणी केल्यास ती परत करण्यात येईल. जर अशा प्रकारचा अर्ज केला नाही तर सदरची रक्कम जप्त करण्यात येईल.

**ब) बीजकामध्ये दाखविलेल्या किंमतीप्रमाणे जकात वसूल केली गेली नसल्यास अशी योग्य जकात वसूल करणे.**

१) ज्यावेळी स्थायी आदेशाप्रमाणे ठरवलेल्या पध्दतीने आयुक्त यांनी ठरवून दिलेल्या मालाच्या किंमतीवर आयात नाका अधिकारी यांनी जकात वसूल केली असेल, त्यावेळी आयुक्त/उपायुक्त आयातकास आयात केलेल्या मालाच्या किंमती बाबत मूळ बीजक/बील अगर इतर कागदपत्रे, तपासणीसाठी महानगरपालिका कार्यालयामध्ये हजर करण्यास सांगू शकतील अशी मागणी केलेली कागदपत्रे आयातकाने एक महिन्याच्या आत हजर केली पाहिजेत. कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर योग्य व देय जकातीच्या रक्कमेपेक्षा कमी जकात वसुल केली आहे असे आढळल्यास, सदरची कमी भरलेली जकात जर आयातीकाने हेतूपुरस्कर कमी भरल्याचे जकात अधिका-याचे निदर्शनास आले तर जकात नियमाप्रमाणे जकात अधिक नियम ४० प्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल. परंतु जकातीतील फरकाची रक्कम ही अनावधानाने बेरजेतील चुकीमुळे अथवा वाहनचालकाच्या अज्ञानपणामुळे झाल्याचे जकात अधिका-याची खात्री झाल्यास व तसे पुरावे मिळाल्यास याबाबतीत फक्त जकात फरकाची रक्कम वसुल केली जाईल. जकातीतील फरकाची रक्कम भरण्याबद्यल आयुक्त/उपआयुक्त आयातकास आदेश देतील आणि त्याप्रमाणे आयातक रक्कम भरण्याची तजवीज करतील. मागणी केल्यापासून सात दिवसात रक्कम भरली गेली नाही तर सदर रक्कम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार वसूल करण्यात येईल.

२) ज्यावेळी मालाचे मूळ बीजक/बीलावर जकात न आकारता स्थायी आदेशातून वेळोवेळी ठरवून दिलेल्या पध्दतीने आयुक्त यांनी ठरवून दिलेल्या मालाच्या किंमतीवर आयातनाका अधिका-याने जकात वसुल केली असेल आणि अयातकाने मूळ बीजक/बील आणि आयात केलेल्या मालाची किंमत दाखविणारे कागदपत्र महानगरपालिका कार्यालयामध्ये हजर केल्यास त्यावेळी योग्य व देय असलेली जकातीपेक्षा कमी रक्कम वसूल झाली असल्यास वरील

पोटनियम १ मध्ये सांगितल्याप्रमाणे जकातीतील फरकाची रक्कम मागण्याचा व वसूल करण्याचा अधिकार आयुक्त/उपआयुक्त यांना राहील.

**क) चुकीच्या आकारणीमुळे योग्य व वाजवी जकात वसूल करणे.**

१) आयात नाका अधिका-याने चुकीची आकारणी केल्यामुळे योग्य व वाजवी जकात वसूल केलेली नाही असे आयुक्त यांना आढळून आल्यास आयातकाकडून कमी वसुली झालेल्या जकातीची मागणी करण्याचा अधिकार आयुक्त/उपआयुक्त यांना राहिल.

जर त्याने सदरची रक्कम मागणीप्रमाणे भरली नाही तर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२८, ३९८ व ३९९ च्या तरतुदीप्रमाणे जकातीची रक्कम वसूल करण्यात येईल.

२) चुकीमुळे अगर चुकीच्या आकारणी केलेमुळे वाजवीपेक्षा जादा जकात वसुल करण्यात आली आहे असे आयुक्त यांना आढळून आले तर जादा वसुल झालेली रक्कम मूळ बीजक/बील व पावती सोबत इतर तदअनुषंगिक कागदपत्रे पावती झालेचे तारखेपासून एक महिन्याच्या आत आयातकाने पावती जोडून अर्ज केल्यास ती परत केली जाईल.

**३७) स्थानिक स्वराज्य संस्था, महाराष्ट्र शासनाची शिधा वाटप यंत्रणा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाच्या अखत्यारितील विविध खाती यांच्या आयात होणा-या मालाबाबत : -**

१) स्थानिक स्वराज्य संस्था, म.रा.प.महामंडळ, म.रा.वि.म., आणि भारत सरकारच्या सरंक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीतील विविध अगर कायद्याने स्थापन झालेल्या सार्वजनिक उपयोगी संस्था यांनी किंवा, त्यांच्या मालकीचे आणि आयात केलेल्या मालावरील (महानगरपालिकेच्या जकात हद्दीत वापर,उपयोग आणि विक्री यासाठी) जकात वसुली बाबत आयुक्त स्वतंत्र व्यवस्था करतील आणि अशा व्यवस्थेस नियम २७-अ मधील तरतूदी लागू राहतील.

**२) शिधावाटपाच्या प्रयोजनाकरीता जिल्हाधिकारी नाशिक यांनी अन्नधान्य वितरण अधिकारी,नाशिक म्हणून आयात केलेल्या मालावरील जकातीच्या वसुलीकरीता विशेष कार्यपध्दती :-**

अ) जेव्हा जेव्हा अन्नधान्ये आणि इतर वस्तु, शिधा वाटपाच्या प्रयोजनाकरीता किंवा महानगरपालिकेच्या जकात हद्दीतील तातडीची गरज भागविण्याकरीता जिल्हाधिकारी नाशिक, अन्न धान्य वितरण अधिकारी म्हणून आयात करतील तेव्हा तेव्हा आयुक्त, त्यांच्याकडून जकात योग्य माल शहरात आणतेवेळी जकातीचे प्रदान आवश्यक न करता त्याऐवजी त्यांना त्या त्या महिन्यात झालेली आयात व निर्यात दर्शविणारे एक मासिक विवरणपत्र सादर करण्याची मुभा देईल. उक्त मासिक विवरणपत्र पुढील प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपुर्वी नियमितपणे पाठवणे आवश्यक राहिल. आयुक्त विवरणपत्राची छाननी केल्यानंतर एक महिन्याहून जास्त नसलेल्या कालावधीच्या अंतराने हिशोब करतील व महानगरपालिकेस प्रदानयोग्य जकातीची निश्चीती करतील. हिशोब करतांना मालाच्या निर्यातीवर नियमानुसार अनुज्ञेय परताव्याची रक्कम रितसर विचारात घेतली जाईल.

ब) जिल्हाधिकारी,अन्नधान्य वितरण अधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी नाशिक म्हणून आयुक्तास आवश्यक अशी माहिती किंवा तपशील देतील आणि कोणत्याही वेळी देय रक्कम भरुन काढण्यासाठी आयुक्तास पुरेशी वाटेल अशी रक्कम ठेव म्हणून ठेवतील.

क) पोट नियम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे हिशोब केल्यावर महापालिकेस देय असल्याचे आढळून आलेली कोणतीही रक्कम, जिल्हाधिकारी यांनी प्रदान केली नाही तर पोट नियम (२) मध्ये उल्लेख केलेल्या जमा रक्कमेमधून वसुल करण्यात येईल.

**३८) प्रक्रिया किंवा दुरुस्तीसाठी / प्रदर्शन, चाचणीसाठी माल जकात हद्यीबाहेर नेणे व फेरआयात करण्यासाठी अवलंबण्याची पध्दत : -**

जो आयातक आयातीचे वेळी पुर्ण जकात भरलेला माल किंवा त्यापैकीच माल काही प्रक्रियेसाठी किंवा दुरुस्तीसाठी किंवा मनपा हद्यीत उत्पादीत केल्याने प्रदर्शन आणि चाचणीसाठी मनपा हद्यीबाहेर निर्यात करील अशा मालावर जकातीसंबंधी स्थायी आदेशात नमूद केलेली पध्दत लागू राहील. असा माल ६ महिन्याचे आत आयात होणे आवश्यक राहिल व त्या मालाचे प्रक्रिया / रिपेअरिंग च्या खर्चावर होणारी जकात भरणे आवश्यक राहिल.

**३९) जादा जकात परत करणे : -**

१) नियमाप्रमाणे ज्या मालावर जकात माफ आहे अशा मालावर जकात आकारणी केली असल्यास, दुबार जकात वसूल केली गेली असल्यास, प्रचलित दरापेक्षा आकारलेल्या दरात तफावत असल्यास, शुल्कपात्र माल जकात हद्यीतील नसताना तसेच बिलाअभावी नाका अधिका-याने ठरविलेल्या रक्कमेबाबत वाद निर्माण झाला तर आयातकास मान्य रक्कमेवरील जकात पावती द्यावी व उर्वरीत वादाच्या रक्कमेवर अनामत रक्कम भरुन घ्यावी. स्थायी आदेशात नमूद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे परतावा देण्यात येईल.

**२) चुकीचे वजन व वर्णन इत्यादीमुळे चुकीची जकात वसुली केली आहे या कारणास्तव परतावा मंजुर न करणे.**

जकात वसुली व परतावा तसेच आयात व निर्यातीचे संदर्भात महानगरपालिकेच्या कर्मचा-याचे हातून निरनिराळी ठरवून दिलेली कागदपत्रे भरताना मालाचे चुकीचे वजन आणि वर्णन याबाबतीत विसंगती आढळल्यास चुकीची जकात वसुल झालेली आहे. अशी तक्रार सबंधित इसमाने १ महिन्याचे आत लेखी अर्जाने महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-याकडे मागणी केली नसेल तर अशा कोणत्याही इसमास त्या बाबतचा परतावा मागता येणार नाही व तो दिला जाणार नाही. अशा विसंगतीचे बाबतीत छाननी करणे अशक्य असेल त्या बाबतीतही परतावा दिला जाणार नाही.

**३) प्रदर्शित करण्यासाठी आणलेल्या फिल्म्स निर्यात केलेवर त्यावरील जकातीचा परतावा दिला जाणार नाही.**

महापालिकेच्या हद्यीमध्ये प्रदर्शित करण्यासाठी आयात करण्यात आलेल्या फिल्म्स, रिळ, व्हिडीओ कॅसेटस, सिडीज वर भरलेली जकात सदरची फिल्म निर्यात झाल्यावर जकातीचा परतावा मागता येणार नाही किंवा मंजुर केला जाणार नाही.

**४) परतावा प्रदान करण्याकरीता ठेवण्याची कायमची आगाऊ रक्कम.**

परताव्याच्या प्रदानाकरीता जकात अधिकारी स्थायी ॲग्रीम रक्कम ठेवील.

**४०) बिना जकात मालाची तडजोड फी वसूल करणे : -**

जकात नाकेवरुन आयात होणारा माल बिना जकातीने आयात झाल्याचे तपासणीत आढळून आल्यानंतर या मालाची जकात अधिक १० पट रक्कम वसुल करण्याचे अधिकार आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास असतील. सदरची वसुली ही स्थायी आदेशात नमुद केल्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**४१) शास्ती (दंड) : -**

१) जो कोणी कोणत्याही पूर्वगामी नियमाचा भंग करील त्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतूदीनुसार पाचशे रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा देण्यात येईल आणि नियमांचा भंग करणे पुढे चालु ठेवल्यास नियमाच्या पहिल्या भंगाच्या अपराध सिध्दीनंतर जितक्या दिवसांपर्यत नियमांचा भंग सुरु राहील तो पर्यंत अपराध्याला प्रत्येक दिवसाकरीता २०० रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा देण्यात येईल.

२) कोणत्याही व्यक्तीने/फर्मने/संस्थेने

अ) देय रक्कम आणि योग्य जकात देण्याच्या दायित्वाची टाळाटाळ केल्यास

ब) या नियमाद्धारे किंवा नियमानुसार कार्यवाही केली जाणा-या कोणत्याही बाबीच्या संबंधात चुकीची किंवा दिशाभुल करणारी माहिती दिल्यास किंवा

क) या नियमात समाविष्ट तरतुदीनुसार सादर करण्यास सांगितलेली माहिती सादर करण्यात कसूर केल्यास,अपराध सिध्दीनंतर विना जकात आढळून येणा-या मालाची जकात अधिक जकातीचे रक्कमेच्या १० पटीपर्यंत दंडासह त्या व्यक्तीला ५०००/- रुपयांपर्यतच्या दंडाची शिक्षा करता येईल.

**४२) नियमात दुरुस्ती करणे :**

नियमामध्ये दुरुस्ती करणे, भर घालणे व जकात वसुली करतांना येणा-या अडीअडचणी दुर करणेकामी नियमात बदल करावयाचा झाल्यास मा. शासनाचे मंजुरीने तसे करणेचे अधिकार महानगरपालिकेस असतील.

दिनांक : / /२००

**आयुक्त**

नाशिक महानगरपालिका,नाशिक

ठिकाण : नाशिक

# अनुसूची - १

## नाशिक महानगरपालिका जकातीचे प्रचलित दर

## अनुसूची - १ नियम (३) (१) (२) (३) (४)

| बाब क्र. १ | मालाचा प्रकार २ | जकात किंमतीवर शेकडा दर कमाल दर ३ | किमान दर ४ |
|---|---|---|---|
| वर्ग १ : माणसे किंवा प्राणी यांचेकडून अन्न किंवा पेय म्हणून वापरण्यात येणा-या वस्तू व औषधी द्रव्ये | | | |
| १ | धान्य,पीठ,दाळी आणि गवार,सोयाबीन,भाजलेले धान्य, साळी, रवा,कणी,लाहया,कुरमुरे,फुटाणे व पोहे धरुन सर्व प्रकारची कडधान्ये. | दर १० किलोस १.०० | दर १० किलोस ०.२० |
| २ | गवत, सुके गवत, भुसा, तणूस (फेरा), कोंडा, कडबा व घास (घोडयासाठी वैरण) | | जकात माफी |
| ३ | चुणी,मोहा,कोणत्याही प्रयोजनार्थ वापरण्यात आलेले धान्याचे खांडस धरुन पेंड | २.०० | ०५० |
| ४ | सर्व प्रकारची गळीताची धान्य फोलपाटासह किंवा फोलपाटावाचून भूईमुग व सरकी धरुन परंतु बाब ३५ मध्ये विनिर्दिष्ट केलेली वगळून. | दर १० किलोस १.०० | दर १० किलोस ०.२५ |
| ५ अ | हायड्रोजनेटेड तेले किंवा वनस्पती यांच्या निर्मितीसाठी वापरावयाची खाद्य तेले हायड्रोजनेटेड तेले किंवा वनस्पती किंवा बाटली बंद केलेली तेले. | ३.०० | ०.५० |
| ५ ब | इतर सर्व प्रकारची खाद्य तेले. | ३.०० | १.०० |
| ६ अ | साखर व खडीसाखर चमचमी व बुरा | ३.०० | १.०० |
| ६ ब | सर्व प्रकारचा गुळ,राब,पेंड खजुर,शिरा व काकवी | ३.०० | ०.८० |
| ६ क | ऊस | १.०० | ०.२५ |
| ७ | मद्य व मद्यार्क,बीअर,गांजा व भांग,अफू,चरस,ताडी व माडी | ८.०० | १.०० |
| ८ | बर्फ | १.५० | ०.५० |
| ९ | तुप व लोणी (टेबल बटर व्यतिरीक्त) | ४.०० | १.०० |
| १० | वनस्पती व हैड्रोजनेटेड तेले | ३.०० | ०.८० |
| ११ | चहा,कॉफी व कॉफीच्या बिया | ४.०० | १.०० |
| १२ | केशर व कस्तुरी | ७.०० | १.०० |
| १३ अ | खाद्यपदार्थ बेकन व हेम,टेबल बटर,मार्गारिन,ताजीफळे व सुपारी वगळून सुकवलेली किंवा जतन केलेली फळे,व कवचफळे,डबाबंद मासळी,चीझ,खवा,मिठाई,मुरंबा व जेली,गोठलेले व जतन केलेले दुध,आईस्क्रीम,सर्व प्रकारचे पिठुळ अन्न,लोणची,कोको,कोकोचे बी व चॉकलेटस्,बिस्कीटे व केक,डुकराची पातळ चरबी (लार्ड) किंवा प्राण्यांची खाद्य चरबी,मावा,दुधाची मलई,चक्का व दही,फळांचे रस,सरबते व सर्व पेये,ग्लुकोज,डेक्स्ट्रोज किंवा कोणताही फलशर्करा (खाद्य तेला व्यतिरीक्त),तेल्याच्या दुकानातील माल,परिरक्षित किराणा माल,बेकिंग किंवा करी पावडर,सॅकरिन,सर्व प्रकारचे खाद्य रंग व अर्के,इतर सर्व प्रकारचे ग्लुकोज,सातूचे वाळलेले सत्व (माल्ट एक्स्ट्रॅक्ट) मध,पापड,बटाटयांचे वेफर्स,कोणत्याही वापरासाठी जतन केलेले मांस आणि स्कीन मिल्क पावडर किंवा निरा व विशेषरित्या तरतूद न करण्यात आलेले सर्व प्रकारच्या अन्न किंवा पेये , सर्व प्रकारचे मिक्स मसाले | ६.०० | १.०० |
| ब | ॲरिऐटेड आणि मिनरल वॉटर | ६.०० | १.०० |

| बाब क्र. १ | मालाचा प्रकार २ | जकात किंमतीवर शेकडा दर | |
|---|---|---|---|
| | | कमाल दर ३ | किमान दर ४ |
| १४ अ | सर्व रसायने,रासायनिक किटक नाशके,शल्य चिकीत्सकेच्या सर्व प्रकारच्या वस्तु,गॅसने भरलेल्या वस्तु,सॅनिटरी टॉवेल्स,पदार्थ विज्ञान विषयक व प्रयोग शाळेच्या सर्व प्रकारच्या वस्तू,पारा व सुरमा (खडे किंवा भुकटी) | ४.०० | १.०० |
| १४ ब | औषधी द्रव्ये व अॅलोपॅथिक औषधे आणि होमियोपॅथीक,युनानी व आयुर्वेदीक औषधे, औषधे बनविणेसाठी लागणारी सर्व घटक व द्रव्य. | ४.०० | १.०० |
| १५ | खजुर सुकी व ओली | ४.०० | १.०० |
| १६ | सर्व प्रकारची चिंच, सुके शिंगाडे, हळद, धने, अंबोशी (ड्रायमॅंगो पिसेस) किंवा अंबोशी कोकम, आले व रताळे | ४.०० | ०.५० |
| १७ | सर्व प्रकारची ताजी फळे | २.०० | ०.५० |
| १८ | नारळ | ४.०० (१०० नगास) | १.०० (१०० नगास) |
| १९ | सर्व प्रकारची भारतीय मिठाई,ब्रेड,बरी,चिवडा, | ४.०० | १.०० |
| २० | सर्व प्रकारची मेलेली किंवा जिवंत मासळी (डबा बंद न केलेली),अंडी व ताजे मांस | ३.०० | १.०० |
| २१ | कोंबडे,बदके,व इतर शिकारीचे पक्षी | ४.०० | ०.५० |
| २२ | वन्य प्राणी सर्व प्रकारचे शिकारीचे प्राणी | ३.०० | १.०० |
| २३ | विडयांची पाने (खाण्याची) | ३.०० | १.०० |
| २४ अ | सुपारी | ४.०० | १.०० |
| २४ ब | वेलची,काथ,लवंग,जायपत्री,जायफळ,ओलचा सिडस् ,मिरे व कापूर | ४.०० | १.०० |
| २५ | इतरत्र विनिर्दिष्ट न केलेल्या किराणा वस्तु त्यात खालील वस्तुंचा समावेश होतो. ओवा, आंबेहळद व ओव्याचे फुल,कथ्था, कलमी, काकडी बीज व कुंकू, खसखस व खसखसीचे बोंड, गुलाब, गोडंबी,सरस व गोंद (डिंक),जिरे,तेजपान,दालचिनी,नाकेश्वर व काळे मीठ, बुक्का, राळ, शिंधा, शेंदुर, शहाजिरे, खाण्याचा सोडा, संजिरे, शेंधवमीठ (असली व नकली) हिंग,खोबरे | ४.०० | १.०० |
| वर्ग २ : प्राणी | | | |
| २६ | मेंढया, बक-या, कोकरे व करडे | ४.०० नगास | २.०० नगास |
| २७ अ | बैल,गायी,म्हशी,रेडे,वासरे,घोडे व गाढवे | ६.०० नगास | ३.०० नगास |
| २७ ब | कुत्री,मांजरे,पोपट इ.सारखी पाळीव प्राणी | ४.०० नगास | २.०० नगास |
| २८ | डुकरे | ६.०० नगास | ३.०० नगास |
| २९ | उंट व हत्ती | १५.०० नगास | १०.०० नगास |
| वर्ग ३ : इंधनसाठी,प्रकाशासाठी,धुण्यासाठी,औद्योगिक वापरासाठी वापरल्या जाणा-या वस्तु | | | |
| ३० अ | लोणारी कोळसा | ३.०० | १.०० |
| ३० ब | कोळसा व कोक | ४.०० | १.०० |
| ३१ | फटाके, दारुकाम व त्याचे घटक भाग, कॅल्शियम कार्बोईड व रक्षणवर्ती (सेप्टीफयुज) | ७.०० | १.०० |
| ३२ | दीपमाला,ग्लोब,चिमण्या,विजेचे बल्ब,विजेच्या किंवा गॅसच्या प्रकाशासाठी असलेल्या वस्तु | ५.०० | १.०० |
| ३३ अ | सर्व प्रकारचे साबण | ५.०० | १.०० |
| ३३ ब | बुटाचे व धातुचे पॉलिश | ५.०० | १.०० |

| बाब क्र. १ | मालाचा प्रकार २ | जकात किंमतीवर शेकडा दर | |
|---|---|---|---|
| | | कमाल दर ३ | किमान दर ४ |
| ३४ | पोटॅश, रिटा, सोडा, तुरटी, लवण पदार्थ, शिकेकाई, धुण्याचा सोडा, परिष्कृत मिठाचे पेटरे, फिनेल व कपडे, फरशी व भांडी धुतांना वापरण्यात येणारी इतर पदार्थ | ४.०० | १.०० |
| ३५ | अखाद्य तेलाचे तेल बिया | ४.०० | १.०० |
| ३६ | अखाद्य वनस्पती तेले | ५.०० | १.०० |
| ३७ | काष्ठ मद्यार्क व विप्रकृत स्पिरिट व औद्योगिक अल्कोहोल | ५.०० | १.०० |
| ३८ अ | सर्व प्रकारची खनिज तेले, डिझेल तेल, पेट्रोल, विमानचालन स्पिरिट, सर्व प्रकारची वंगणे, व्हाईट ऑईल, तुर्कतेल, फरनेस ऑईल, पेट्रोलियम पदार्थ, माव्याचे तेल, शेवसाल ऑईल, सॉलव्हंन्ट ऑईल,किटकनाशके म्हणून उपयोगात आणलेली इतर ज्वलन तेले,नैसर्गिक गॅसेलिन, रंग (नोंद ४८ खाली येत असतील त्या व्यतिरिक्त), सोल्युशन व कॉम्पोझिशेन, टर्की रेड ऑईल व खजिन तेलांचे उपपदार्थ परंतु यात यापुर्वी अंतर्भूत केलेल्या वस्तुंमध्ये या पोट नोंदीखाली घासलेटचा अंतर्भाव होणार नाही. | ४.०० | १.०० |
| ३८ ब | अशुध्द तेल (क्रुड ऑईल) | ४.०० | १.०० |
| ३८ क | द्रवरुप पेट्रोलियम गॅस | ४.०० | १.०० |
| ३८ ड | घासलेट | ४.०० | ०.५० |
| ३९ | ग्रिस व पेट्रोलियम जेली | ५.०० | १.०० |
| ४० अ | खाद्य म्हणुन उपयोगात न येणारे सर्व प्रकारची अखाद्य चरबी, वराव (टॅलो) डुकराची पातळ चरबी (लार्ड) | ४.०० | १.०० |
| ४० ब | सर्व प्रकारची रसायणे सोडियम सल्फेट, सायझिंग सल्फेट, लोखंडाचे सल्फेट, तांब्याचे सल्फेट, ॲल्युमिनियमचे सल्फेट, सोडयाचे शैलिक (सिलीकेट), कॉस्टीक सोडा आणि अन्यत्र विनिर्दिष्ट केलेली नसतील असे इतर क्षार, सल्फर, पोटॅशियम क्लोराईड, स्टोरिया, झिंक क्लोराईड, मॅग्नेशियम क्लोराईड, सॉल्ट पेट्रे सर्व प्रकारची आम्ले, सुलॅमोनिक, बोरेक्स, पांजणीचे पीठ | ५.०० | १.०० |
| ४१ | मेणबत्त्या, आगकाडीच्या पेटया इतरत्र व तरतुद करणेत न आलेले गॅस किंवा दिवाबत्तीसाठी असलेल्या इतर वस्तु, इस्त्र्या व त्याचे सुटे भाग | ५.०० | १.०० |
| ४२ | सरपण (जळाऊ लाकडे) | ३.०० | १.०० |
| ४३ | राख मिश्रीत कोळसा व भुकटी, पडपा व अर्धवट जळालेला कोळसा (सिन्डर) | ३.०० | १.०० |
| वर्ग ४ : | इमारतीचे व इतर बांधकामाची सामुग्री | | |
| ४४ | सर्व प्रकारचे सिमेंट, सायगॉल, पीओपी, नेरु | ६.०० | १.०० |
| ४५ | डांबर(कोलटार), असफाल्ट, बिटयुमेन, फरसबंदीचे दगड, मॅगनीज, इमरी दगड किंवा चुरा, चुन्याची भुकटी (चॉक पावडर) दगडाच्या चिपा, दगडाची पुड, आगरा दगड, इमारतीचे दगड, खांगर (क्लिंकर) व कोळशाची राख. | ६.०० | १.०० |
| ४६ | चकाकी दिलेल्या विटा व फरश्या (टाईल्स), संगमरवरी दगड, भट्टीच्या विटा, विटा, सर्व प्रकारची छपरी कौले, फ्लोरिंग टाईल्स, फरशीच्या लाद्या इ., चायना मोझॅक चिप्स, मोझाईकचा संगमरवरी दगड, मोझाईक किंवा टेरॅझोची कौले, मातीचे नळ, चिनी मातीचे नळ, सिमेंटचे नळ आणि ॲसबेस्टॉस सिमेंटचे पत्रे. | ६.०० | १.०० |

| बाब क्र.<br>१ | मालाचा प्रकार<br>२ | जकात किंमतीवर शेकडा दर | |
|---|---|---|---|
| | | कमाल दर<br>३ | किमान दर<br>४ |
| ४७ | पिवळी माती इतर कोणत्याही प्रकारची माती, वाळु, धातु, डबर, मुरुम व खडी | ३.०० | १.०० |
| ४८ | रंग, डिसटेंम्पर व कलर वॉशेस आणि इमारतीत रंग देण्यासाठी वापरावयाचे इतर साहित्य, वॉरनिश, अळशीचे उकळविलेले तेल, टर्पेनटाईन, झिंक ऑक्साईड व रेड ऑक्साईड,रंगद्रव्ये यांचे मिश्रण व त्याचे घटक,कोटींग पावडर. | ५.०० | १.०० |
| ४९ | काच, काचेच्या वस्तु, चिनी मातीच्या वस्तु, एनमलच्या वस्तु व इमारतीच्या व सॅनेटरी फिटींगच्या बांधणीसाठी किंवा सुशोभित करण्यासाठी वापरण्यात येणारी सर्व प्रकारची कोकरी, धातुची व्हॉल्व्ह, तांब्याच्या तोटया व त्याची उपकरणे | ५.०० | १.०० |
| ५० | रुफिंग फेल्ट | ५.०० | १.०० |
| ५१ | इमारती लाकुड, बल्ल्या, बांबु, वेत व त्यापासुन तयार केलेल्या वस्तु, दरवाजे, खिडक्या, चौकटी, खुंटया, जिने, चंदणाचे लाकुड व अशा लाकडापासुन तयार केलेल्या वस्तु | ७.०० | १.०० |
| ५२ | प्लायवुड, सॉफ्टबोर्डस्, हार्डबोर्डस्, मॅसोलाईट किंवा कोणतेही घटक असलेले व कृत्रिम प्रक्रियेने तयार करण्यात आलेले इतर कोणतेही प्रकारचे लाकुड व त्यापासुन तयार केलेल्या वस्तु, सनमायका,फोरमायका,व्हिनिअर व त्यासारख्या इतर वस्तू. | ७.०० | १.०० |
| वर्ग ५ : | **सुगंधी द्रव्ये, प्रसाधने, रंग व घरगुती सामान** | | |
| ५३ अ | केसांचे तेल, सुंगधी तेल, सर्व प्रकारची सुंगधी द्रव्ये, सेंट्स, अत्तरे, सुंगधीत वस्तु, उदबत्त्या, सुंगधीत रसायने, सर्व प्रकारची सौदर्य प्रसाधने, दाढीची क्रिम, दाढीचा साबण, दंतमंजन, टूथपेस्ट, पोमेड, कंगवे, ब्रश, आरसे, केसांच्या पिना, ब्रेसेस, गार्टस व सस्पेंडर्स | ७.०० | १.०० |
| ५३ ब | कात्र्या, वस्तरे, सेफ्टी रेझर्स, ब्लेडस्, सुरी, चाकू, चमचे, काटे, कटलरी सर्व प्रकारची, सर्व प्रकारच्या सु-या, कुलूप व किल्ल्या, स्टोव्ह व पेट्रोमॅक्स आणि त्यांचे भाग व उपसाधने आणि लोखंडी सामान | ५.०० | १.०० |
| ५३ क | लेसेस, टेप्स, लाकडी व धातुच्या रिंग, भरत कामाच्या वस्तु, सेल्युलाईड व सेल्युलाईडच्या वस्तु, सर्व प्रकारचे मनी, कृत्रिम मोती, प्लास्टिक व प्लास्टिकचा माल, प्लास्टिक पावडर व दाणा, बेकेलाईट व बेकेलाईटचा माल, हस्तीदंत व हाडे यापासुन बनविलेल्या वस्तु, सर्व प्रकारची बटणे, किरकोळ जीन्नस (हॅबरडॅशरि) फायबर. | ५.०० | १.०० |
| ५३ ड | लाकडी, लोखंडी, पोलादी, वेताचे इ. सारखे सर्व प्रकारचे फर्निचर | ५.०० | १.०० |
| ५३ ई | छत्र्या, रेनकोटस्, पावसाळी हॅटस् व टोप्या | ४.०० | १.०० |
| ५४ अ | सोने | ३.०० | १.०० |
| ५४ ब | चांदी | ३.०० | १.०० |
| ५४ क | सोने व चांदी यापासुन बनविलेले दागिने व वस्तु | ५.०० | १.०० |
| ५४ ड | इतर मौल्यवान धातु व त्यापासुन बनविलेले दागिने व वस्तु | ५.०० | १.०० |
| ५४ इ | कृत्रिम दागिने व जवाहीर | ५.०० | १.०० |
| ५४ फ | सर्व प्रकारची खेळणी , क्रिडा व खेळाच्या वस्तु | ५.०० | १.०० |
| ५५ | (बांधकामाच्या किंवा इमारत सुशोभित करण्यासाठी वापरण्यात येणा-या वस्तुखेरीज) सर्व प्रकारच्या कोकरीच्या वस्तु (कोकरी) | ५.०० | १.०० |

| बाब क्र. १ | मालाचा प्रकार २ | जकात किंमतीवर शेकडा दर | |
|---|---|---|---|
| | | कमाल दर ३ | किमान दर ४ |
| ५६ | बांगडया, बाटल्या (बांधकामाच्या व इमारत सुशोभित करण्यासाठी वापरण्यासाठी वापरण्यात येणा-या वस्तु खेरीज) चिनीमातीच्या वस्तु व पोर्सलेनच्या व मातीच्या वस्तु यांसह काच व काचसामान | ५.०० | १.०० |
| **वर्ग ६** | **तंबाखू व तंबाखूच्या वस्तू** | | |
| ५७ | सिगारेटस् व सिगार, सिगार व सिगारेट होल्डर्स, स्मोकिंग पाईप, सिगारेटचा कागद पाईपचा, पाईपसाठी वापरला जाणारा तंबाखू, तंबाखूच्या केसेस, पोचेस, सिगार व सिगारेट ठेवण्याच्या डब्या, हुक्का व धुम्रपानासाठी आवश्यक वस्तु व सिगारेट लायटर्स,निकोटीन मिश्रीत प्रक्रिया केलेली तंबाखू व गुटखा,जर्दा,पानमसाला तंबाखूसह व तंबाखू नसलेला. | ७.०० | १.०० |
| ५८ अ | बिछोरा, फाडी, सरसा, चुरामाल धंतल | ५.०० | १.०० |
| ५८ ब | बिडया व तपकिर तयार करण्यासाठी तंबाखू व खाण्याचा तंबाखू | ५.०० | १.०० |
| ५९ | विडया व तपकिर | ५.०० | १.०० |
| ६० | विडयांची पाने , तेंदूची पाने | ३.०० | १.०० |
| **वर्ग ७ :** | **कापडाचे तागे व इतर कापड व वस्तु चामडे व चामडयाच्या वस्तु व रबरी माल** | | |
| ६१ | लोकरी, रेशीम, लीनन, ताग, कापुस, कृत्रिम व सिन्थेटिक वस्तुचे कापड व वरील वस्तुपैकी कोणत्याही एकाच्या किंवा अशंत: अशा वस्तुच्या व अन्यथा निर्दिशिष्ठ करण्यात आल्या नसतील अशा वस्तु आणि वरील वस्तुपासुन बनविण्यात आलेले तयार कापड | ५.०० | १.०० |
| ६२ अ | सरकी काढलेला कापुस | ३.०० | १.०० |
| ६२ ब | सरकी न काढलेला कापुस | ३.०० | १.०० |
| ६३ | टाकाऊ कापुस, टाकाऊ सुत व टाकाऊ लोखंड सामान (हार्ट वेस्ट) | ३.०० | १.०० |
| ६४ | कच्ची किंवा न कातलेली लोकर, हेम्प, ताग, नारळाचे व इतर तंतु आणि त्यापासुन बनवलेले दोर व इतर वस्तु व कंतान. | ५.०० | १.०० |
| ६५ | सूत व सर्व प्रकारचा दोरा | ५.०० | १.०० |
| ६६ | सर्व प्रकारची खळ (स्टार्चेस),साबुदाणा तांदुळ व त्याचे पीठ,अरारुट, टॅपिओका व त्याचे पीठ,चिंचेची पावडर,फारिना स्टार्चेस व कांजीच्या वस्तु,चरबी सायझिंग ऑईल्स व अशा त्याऐवजी वापरण्यात येणा-या वस्तु | ५.०० | १.०० |
| ६७ | चामडी व कातडी | ४.०० | १.०० |
| ६८ | खोगीर (हारनेस) जीन, पेटया, ट्रंक, जोडे, चप्पल, स्लिपर, सॅन्डल, पट्टे आणि कातडयाच्या सर्व वस्तु | ५.०० | १.०० |
| ६९ | सर्व प्रकारचे रबरी टायर्स व टयुब्ज | ५.०० | १.०० |
| ७० | रबर, रबरी माल, गटापर्चा व त्यापासुन (पुर्णत: व अशंत:) बनविलेल्या वस्तु, रबर, सोल्युशन, कच्चे रबर व लॅटेक्स पण त्यापासुन बनविलेली खेळणी सोडून | ५.०० | १.०० |
| **वर्ग ८ :** | **धातु व धातूच्या वस्तू** | | |
| ७१ | लोखंड व पोलाद | ५.०० | १.०० |
| ७१ अ | पिगआयर्न | ५.०० | १.०० |
| ७१ ब | ब्ल्युम्स बिलेटर्स व स्लॅब्स | ५.०० | १.०० |

| बाब क्र. १ | मालाचा प्रकार २ | जकात किंमतीवर शेकडा दर | |
|---|---|---|---|
| | | कमाल दर ३ | किमान दर ४ |
| ७१ क | बांधकाम विषयक (स्ट्रक्चरल) १) जॉइस्टस, २) चॅनल्स, ३) अँगल्स ईक्वल किंवा अनईक्वल, ४) बल्ब्स किंवा टी, ५) लाईट रेल्स, ६) लाईट रेल्ससाठी फीश प्लेट, ७) शेल,पोलाद,इनगॉटस,ब्ल्युम्स, बिलेटस व बार्स, ८) ब्लॅक किंवा गॅलव्हानाईज्ड शीट, प्लेन किंवा कॉरागेटेड, ९) प्लेटस बॉयलर व हाय टेन्साईल शिप बिल्डींग किंवा बुलेटप्रुफ पोलाद धरुन साधारण सौम्य पोलाद, १०) गज व सळया ११) स्प्रिंगचे पोलाद, व्हेहिक्युलर किंवा प्लॅटबार्स,१२) हुप्स व पट्टया,१३)नळ १४) बोल्टस्,नटस्,वॉशर्स,रिव्हेटस् व अशा इतर वस्तु १५) काटेरी तार,टेलिग्राफच्या किंवा ब्लॅक गॅलव्हनाईज्ड इतर प्रकारच्या तारा,१६) तारेचे खिळे | ५.०० | १.०० |
| ७२ | १) लोखंड २) पोलाद यांची मोड | ४.०० | १.०० |
| ७३ | लोखंड व पोलाद विशिष्टरित्या तरतुद करण्यात आली नसेल अशी कटलरी लोखंडी सामान व यंत्रे किंवा यंत्राचे भाग खेरीज करुन लोखंड वा पोलाद यापासुन बनविलेल्या इतर कोणत्याही वस्तु व त्याचे कास्टींग व फोर्जिंग | ५.०० | १.०० |
| ७४ अ | यंत्रसामुग्री व त्यांचे पुरक व सुटे भाग<br>१) वीज निर्मिती प्रक्षेपण व वितरण यासाठीची विज यंत्रसामुग्री व मोटर्स व जनरेटर्स व त्यांचे घटक भाग व सुटे भाग, २) सेल्स बॅटरी व तांब्याच्या पट्टया हार्न इलेक्ट्रीक यासह वीज माल, ३) वीजेची उपसाधणे सामुग्री, ४) विजेची घरगुती उपकरणे, ५) सर्व प्रकारची इलेक्ट्रीकल/वीज यंत्रसामुग्री, कंट्रोल स्वीच, गियर जनरेटर्स, ऑल्टरनेटर्स व डायनॅमो, मोटर्स, ट्रान्सफॉर्मर्स व टर्बोजनरेटींग सेटस् | ५.०० | १.०० |
| ७४ ब | शेतीची यंत्रसामुग्री व भाग | ५.०० | १.०० |
| ७४ क | तेल इंजिन, डिझेल इंजिन, वाफेची इंजिने, पेट्रोल व गॅस इंजिने व हायड्रोलिक प्रेशरवर चालणारी यंत्रे व त्याचे सुटे भाग | ५.०० | १.०० |
| ७४ ड | सर्व प्रकारची हत्यारे (टुल्स) | ५.०० | १.०० |
| ७४ इ | मुद्रण यंत्र व त्याचे सुटे भाग | ५.०० | १.०० |
| ७४ फ | विशिष्टरित्या तरतुद करण्यात आलेली नसेल अशी इतर कोणतीही इलेक्ट्रीकल यंत्रसामुग्री, तिचे पुरक व सुटे भाग | ५.०० | १.०० |
| ७५ अ | वाहने<br>मोटारी, मोटारसायकली, चेसीस व मालमोटारी, ट्रॅक्टर्स, विमाने, हेलिकॅप्टर, क्रेन्स, ट्रेलर, फोरक्लीप मशिन,बुलडोझर, एस्केव्हेटर, रोडरोलर,जेसीबी,क्रॉंक्रीट मिक्सर व त्याचे घटक व सुटे भाग. | ५.०० | १.०० |
| ७५ ब | दुचाकी (सायकली) बाबा गाडया, गाडया, सर्व प्रकारची वाहने व त्यांचे घटक भाग व सुटे भाग | ५.०० | १.०० |
| ७६ अ | उपकरणे, उपकरण संच व उपयंत्रे व त्याचे भाग<br>शिवणयंत्रे, घडयाळे व मनगटी घडयाळे, टंकलेखन यंत्र व त्याचे सुटे भाग | ६.०० | १.०० |
| ७६ ब | रेडिओ, रेडिओग्राम, टेलिव्हिजन सेट, उपकरण संच, लाऊडस्पिकर, ग्रामोफोन्स, अेम्प्लीफायर्स, बिनतारी यंत्र, त्याचे घटक भाग व सुटे भाग व सर्व प्रकारची वाद्ये | ६.०० | १.०० |
| ७६ क | फोटोग्राफिक यंत्र सामुग्री, फोटोविषयक रसायने, फिल्मस् व माऊंटस् व त्याचे घटक व सुटे भाग यासह फोटोविषयक माल व वस्तु | ६.०० | १.०० |

| बाब क्र. १ | मालाचा प्रकार २ | जकात किंमतीवर शेकडा दर | |
|---|---|---|---|
| | | कमाल दर ३ | किमान दर ४ |
| ७६ ड | सिने प्रोजेक्शन यंत्रसामुग्री व त्याचे घटक व सुटे भाग व त्यामध्ये वापरण्यात येणा-या वस्तु | ६.०० | १.०० |
| ७६ इ | सर्वेक्षण उपकरण संच | ६.०० | १.०० |
| ७६ फ | वैज्ञानिक उपयंत्रे | ६.०० | १.०० |
| ७६ ग | नेत्रोपचार विषयक (ऑप्टिकल) माल, शल्य उपकरणे व रुग्णालय विषयक वस्तु व त्यांचे सुटे भाग व उपसाधने, वैदयकिय/ सर्जिकल /डेन्टल व पशुवैद्यकिय उपकरणे/यंत्र,सहयंत्र व त्यांचे सुटे भाग. | ६.०० | १.०० |
| ७६ ह | कृसिबल्स सुती दोर धरुन मिल व जीन सामुग्री | ६.०० | १.०० |
| ७६ य | सर्व प्रकारची इलेक्ट्रॉनिक्स यंत्रे,सहयंत्रे,यंत्रसामुग्री,उपकरण संच व उपयंत्रे व त्याचे सुटे भाग,संगणक संच व त्याचे सुट्टे भाग,हार्डवेअर व सॉप्टवेअर व त्याचे साहित्य,मोबाईल हॅन्डसेट,प्रिपेड कार्ड, सिमकार्ड, पोस्टपेड कार्ड व त्यांचे घटक व सुटे भाग, टेलिफोनसाठी वापरल्या जाणा-या फायबर ऑप्टीक केबल्स. | ६.०० | १.०० |
| ७७ | अलोह धातु म्हणजेच पितळ, तांबे (तांबे व पितळ यांचे सर्कल (पत्रे) व तांबे व पितळेची मोड वगळुन) टिन, ॲल्युमिनीयम शिसे, जस्त, जर्मनसिल्व्हर, स्टेनलेसस्टील व त्यांचे मिश्र धातु, तारा, पत्रे, इंगॉटस् व सर्कल त्यापासून बनविलेले सामान व वस्तू तांब्याची व पितळेची भांडी व त्यांचे कास्टींग व फोर्जिंग | ५.०० | १.०० |
| वर्ग ९ : | इतर | | |
| ७८ | रंग द्रव्ये,टॅन्स, निळ व मुद्रणाची पेस्ट व शाई धरुन रंगविषयक सर्व वस्तु | ५.०० | १.०० |
| ७९ | कागद : नवीन स्टेशनरी,जाहिरात फलक, पोस्टर्स, पॅम्प्लेटस्, कॅटलॉग डायरी,वहया,कॉयर बोडर्स,कॅलेंडर्स,सर्व प्रकारच्या फाईल्स, लॉटरी तिकीटे, चेकबुक्स,प्लेईंग कार्डस्, डिरेक्टरीज, भिंतीपत्रक/ पोस्टर्स, चार्ट इत्यादी. | ५.०० | १.०० |
| ७९ अ | न्युजप्रिंट (वृत्तपत्रीय कागद) | ३.०० | ०.५० |
| ७९ ब | कार्डबोर्डस्, ग्रेबोर्डस् व मिल बोर्डस् | ५.०० | १.०० |
| ७९ क | कोणत्याही मिश्रणाचे व जाडीचे सर्व प्रकारचे कागद | ५.०० | १.०० |
| ८० | लाख व बुच (कॉर्क) व त्यापासुन केलेल्या वस्तु | ५.०० | १.०० |
| ८१ | लाकुड, दगड, चिकनमाती किंवा धातु यावर कोरीव काम केलेल्या वस्तु व इतर वस्तु व इतर मातीची भांडी | ५.०० | ३.०० |
| ८२ | अन्य निर्दिष्ठ करण्यात न आलेली चिनीमातीची भांडी, पोर्सोलेनची भांडी व विद्युत इन्सुलेटर्स | ५.०० | ३.०० |
| ८३ अ | कच्च्या सिनेमा फिल्म्स् | ४.०० | १.०० |
| ब | प्रक्रिया केलेल्या सिनेमा फिल्म्स् व रिळे | ४.०० | १.०० |
| क | फिल्मचे रोल | ४.०० | १.०० |
| ८४ | काकवी (मळी) | ३.०० | १.०० |
| ८५ | रासायनिक खते फक्त शेती उपयोगाकरीता. | जकात माफी | |

| बाब क्र. १ | मालाचा प्रकार २ | जकात किंमतीवर शेकडा दर | |
|---|---|---|---|
| | | कमाल दर ३ | किमान दर ४ |
| ८६ | वरील कोणत्याही बाबीत समाविष्ट न केलेल्या आणि अनुसूची दोन मध्ये विशेषतः सूट देण्यात न आलेल्या वस्तू. | ५.०० | १.०० |
| ❖ लेखी परवानगी नी परिवहन पास फी रक्कम रुपये ५०/- | | | |
| ❖ मार्गस्थ दाखला (एस्कॉर्ट) रक्कम रुपये ५०/- | | | |

दिनांक : / /२००६

ठिकाण : नाशिक

**आयुक्त,**
नाशिक महानगरपालिका,नाशिक

नाशिक महानगरपालिका,नाशिक

<u>अनुसूची दोन</u>

<u>नियम - ४</u>

<u>भाग - १</u>

**नाशिक महानगरपालिकेस ज्या मालावर जकात देय असणार नाही अशा मालाची यादी.**

१) जे सामान आयातीच्या वेळेस पुर्वीच वापरात असलेले असेल असे, हवाई मार्गाने, समुद्र मार्गाने, जलमार्गाने, रेल्वेने वा रस्त्याने येणा-या ऊतारुचे खरेखुरे व्यक्तीगत सामान व त्यांच्या खाजगी वा व्यक्तीगत वापरासाठी असलेल्या वस्तू व निवास बदलल्यामुळे येणारे जुने वापरलेले घरगुती सामान.

२) शैक्षणिक संस्थाच्या ख-या खु-या वापरासाठी असलेली शारिरीक श्रमावर चालणारी यंत्रे.

३) दौ-यावरील शासकीय अधिका-यांची शिबीर सामुग्री.

४) सैन्यदलाचे अधिपत्य करणा-या अधिका-यांनी, केवळ आपले जवान व सेवेतील यांच्या प्रत्यक्ष वापरासाठी प्राप्त केलेली सामुग्री व कपडेलत्ते (अन्न व पेय नसतील अशा) आवश्यक वस्तू, मात्र अशा वस्तू जकात हद्दीत आणण्यात येतील तेव्हा त्यासोबत त्याचा वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे वापर करावयाचा हेतू असल्याबद्यल समादेशक अधिका-याचे प्रमाणपत्र असेल.

५) रेल्वे गाडीतच ज्या मालाचे प्रदर्शन मांडण्यात आले असेल अशा गाडीतील माल जकात हद्यीमध्ये आणला जात असेल किंवा विक्रीसाठी नव्हे तर एखादया प्रदर्शनात मांडण्यासाठी म्हणून जकात हद्यीमध्ये आणण्यात येत असेल असा माल,मात्र जकात हद्यीमध्ये भरणा-या प्रदर्शनात मांडण्यासाठी म्हणून माल आणण्यात येईल. तेव्हा त्यासोबत उक्त प्रदर्शनाची व्यवस्था पाहणा-या व्यवस्थापकाचे किंवा सचिवाचे अशा अर्थाचे प्रमाणपत्र सादर करण्यात येईल.

६) वृत्तपत्रे, पुडक्यात बंद केलेल्या परिक्षेच्या उत्तर पत्रिका (को-या किंवा न वापरलेल्या उत्तर पत्रिका या व्यितिरीक्त, रद्दी व्यितिरीक्त जुनी कार्यालयीन कागदपत्रे किंवा अजून वापरात असलेली कागदपत्रे.

७) मोफत वाटपासाठीच खरोखरी असलेले व हस्तांतरणसाठी वा विक्रीसाठी नसलेले व आयातकाने तसे प्रमाणित केलेले व्यापारी वस्तूंचे नमुने.

८) नैसर्गिक/सेंद्रीय, रासायनिक व रसायन युक्त खतांसह इतर खते आणि किटकनाशके, बुरशीनाशके (शेती उपयोगाकरीता फक्त) व शेती उपयोगाकरीता असलेली सर्व औषधे.

९) रेल्वेने,सागरी वा हवाई मार्गाने आयात केलेला व रेल्वे, गोदी, बंदरे, धक्का, विमानतळ यांच्या जागातून न हलविता, पाठविण्याकरीता नोंदलेला निर्यात करण्यात आलेला माल.

१०)न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांनी आपल्या कार्यालयीन वापरासाठी आयात केलेला माल.

११) जकात हद्दीबाहेरील मेजवाण्या किंवा मनपा हद्दीत मेजवान्या, विवाह समारंभ आणि सार्वजनिक कार्यक्रम यासाठी जकात अधिका-यांच्या लेखी परवानगीने जे सामान भाडयाने घेऊन बाहेर नेण्यात आले असेल किंवा जे सामान भाडयाने मनपा हद्दीत आयात होत असेल असे सामान जकात हद्दीमध्ये आणण्यास ज्या सोबत, उक्त लेखी परवानगी असेल असे, वापरलेले फर्निचर, पियानो व तत्सम वाद्ये, तंबू छोलदारी,मातीची भांडी (क्रोकरी), भांडी, दिवे, बांबू, बल्ल्या, तट्टे (वेताच्या चटया).

११ अ) दुरुस्तीच्या किंवा संस्कारणाच्या प्रयोजनासाठी जकात हद्दीबाहेर नेण्यात आली होती, अशी यंत्रसामुग्री,उपकरणे व इतर वस्तू आणि त्यांचे सुटे भाग,जकात अधिका-याच्या लेखी परवानगीने आयात केल्यास व जकात हद्दीमध्ये पुन्हा प्रवेश करतांना उक्त लेखी परवानगी त्याच्या बरोबर जोडली असल्यास. मात्र दुरुस्तीसाठी व प्रक्रियेसाठी येणारा खर्च किंवा नवीन पार्ट टाकलेस व दिलेल्या मुदतीनंतर असा माल आयात झाल्यास त्यावर माफी नसेल.

**टीप : असा माल निर्यात झालेल्या तारखेपासून सहा महिन्याचे आत मनपा हद्दीत परत आयात होणे आवश्यक राहिल.**

१२)कोणत्याही स्वीयेतर शासनाकडून किंवा भारतात प्रवर्तित असलेल्या त्याच्या मान्यताप्राप्त एजन्सीकडून सहाय्य म्हणून मिळालेल्या मालाच्या कोणत्याही मोफत देणग्या.

**स्पष्टीकरण** :- १) या नोंदीच्या प्रयोजनासाठी मान्यताप्राप्त एजन्सी म्हणजे, राज्य शासनाने शासकिय राजपत्रातील आदेशाद्वारे मान्यताप्राप्त म्हणून विनिर्दिष्ट केलेली एजन्सी.

**स्पष्टीकरण** :- २) या नियमान्वये एखादी विशिष्ठ देणगी सूट देण्यास योग्य आहे किंवा कसे याबद्यल कोणतीही शंका असल्यास, ती शंका राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

१३)राज्य परिवहनाने, अशा बसेस जेथून सुरु होतात असा त्याचा संबंधित डेपो ज्या स्थानिक प्राधिका-याच्या अधिकारीतेत येत असेल त्या स्थानिक प्राधिकरणास आपल्या उतारु बसेसच्या बाबतीत, पुर्वीच जकात दिली असेल आणि अशी जकात अशा स्थानिक प्राधिकरणास दिली असल्याबद्दलची पावती किंवा तसे सिध्द करणारा इतर कोणताही दस्तऐवज सादर केला असेल तर, जकात हद्दीत प्रवेश करणा-या अशा राज्य परिवहनाच्या उतारु बसेस.

१४) कुटूंब नियोजनाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येणारी सर्व संतती प्रतिबंधक साधने,औषधे व उपकरणे.

१५) अ) हाती कातलेले कापसाचे सुत व खादीचे कापड.

ब) हाताने काढलेले लोकरी सुत व कातलेले, विणलेले कापड घोंगडया धरुन.

क) हाताने काढलेले व गुंडाळलेले रेशमी सूत व हाताने विणलेले रेशमी कापड,टसर सूत व कापड धरुन.

ड) ग्रामोद्योगाची उत्पादने.

**स्पष्टीकरण** :- महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई किंवा खादी व ग्रामोद्योग आयोग मुंबई यांच्याकडून माल प्रमाणित करण्यात आला आहे, या शर्तीच्या अधीन, या नोंदी अन्वये जकात शुल्क देण्यातून माफी देणेत यईल.

१६) टेबल सॉल्ट किंवा सर्वसाधारण मिठाचा कोणताही इतर प्रकार.

१७) विद्युतशक्ती (Electricity)

१८) भारतीय रिझर्व बँकेने, शासकिय निधी बंद करुन तो एजन्सी बँका किंवा बँकेचे मुख्य कार्यालय याजकडे पाठविण्यासाठी म्हणून, आपल्या एजन्सी बँकाना पुरविलेल्या रिकामे कोषागार पेटया.

१९) शालेय पोषण कार्यक्रम आणि विशेष कार्यक्रम याखाली जिल्हा परिषदांकडून पौष्टिक आहार म्हणून पुरवण्यात आलेल्या कोणत्याही वस्तू.

२०) भारत सरकारकडून पुरवण्यात आलेल्या सवलतीवर मिळणा-या छपाईच्या पांढ-या कागदापासून तयार केलेल्या वहया व शालेय पाठयपुस्तके.

२१) भारत सरकारकडून पुरवण्यात आलेला, सवलतीवर मिळणारा छपाईचा पांढरा कागद.

२२) स्थानिक ठिकाणाहून पाठविलेला माल हा सहा महिन्याचे आत परत आल्यास १३(अ) प्रमाणे प्रतिज्ञा पत्र घेऊन माफीस पात्र.

२३) जिल्हा परिषद यांचेतर्फे त्यांच्या शालेय खाद्य कार्यक्रमासाठी आयात होणारी सुकडी मालास.

**२४) सुर्य शक्तीवर व पवन शक्तीवर चालणारे यंत्रे व उपयंत्रे.**

1. Flat plate soler collectors.
2. Concenterting and pipe type solar collectors.
3. Solar cookers.
4. Solar waterheaters and system.
5. Air / gas / fluid beating systems.
6. Solar crop driers and systems.
7. Solar Stills & desalination Systems.
8. Solar pumps based on Solar thermal and Solar photovoltaic Conersion.
9. Solar power genrrating system.
10. Solar photovoltaic moduls and panels for Water pumping and other application.
11. Wind mills and any specially designed devices which run wind mills.
12. Any special devices including electric generators and pumps running on Wind energy.
13. Biogas plants and biogas engines.
14. Agricultural and municipal waste conversion devices producing energy.
15. Equipment for utilising ocean waves and themal energy.

थोडक्यात सोलरकुकर, पालापाचोळा, विष्ठा, मुत्र यापासून बायोगॅस करण्याची यंत्रे,पवनचक्क्या इत्यादींना जकात माफी आहे.

**२५) हातमागाकरीता वापरण्यात येणारे कापसाचे सूत हातमागाचे कापड.**

**स्पष्टीकरण - १** :- नोंद २५ बाबतीतील माफी ही ज्यावेळी असा माल जिल्हा औद्योगिक सहकारी संघटनेने, तालुका पातळीवर कार्य करणारे सहा.निबंधक सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य हातमाग कार्पोरेशन लि.नागपूर किंवा विणकर सहकारी संस्थांनी शिखर संस्था मग ती कोठेही काम करीत असो यांनी सदर सूत तयार हातमागाचे कापड हे त्यांच्या विणकरासाठी जरुर आहे किंवा त्यांनी ते तयार केले आहे किंवा शासकिय संस्थेचा शिक्का ज्यायोगे ते कापड किंवा संस्थेने तयार केले आहे असे असले पाहिजे. एखादे वेळेस महानगरपालिकेस अशा प्रमाणपत्रासंबंधी किंवा शिक्क्यासंबंधी कोणताही संशय असेल अशा वेळी तिने पूर्ण दराने जकात आकारुन ते प्रमाणपत्र किंवा शिक्का खरा आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी आयातिकावर टाकावी.

**स्पष्टीकरण** २ :- या नोंदीनुसार हातमागासाठी वापरात येणा-या कापासाचे सुताच्या माफीसाठी जिल्हा औद्योगिक केंद्रात तयार केले आहे, असे प्रमाणपत्र दिले तरी माफी देण्यात यावी.

२६) चलनी नोटा, नाणी व राष्ट्र ध्वज.

२७) महानगरपालिका हद्दीत नव्याने सुरु होणा-या अशा औद्योगिक संस्थात संस्थेच्या कामासाठी फक्त आयात केलेल्या मालावर जॉईन्ट डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज यांचा मान्यतेचा दाखला असल्यास जॉईन्ट डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज यांचेकडील पत्र क्र. डी.पी.एल./२४/ऑक्ट्रॉय/ ४४१७ दि. १२/१/१९६८ प्रमाणे त्यांचेकडे जकातीबाबत मागणी करावी.

२८) गवत,सुके गवत, चारा भुसा,तनुस (फेरा),कोंडा,कडबा व घास (घोडयासाठी वैरण)

२९) सरकारी तपासणीसाठी आलेली वजने व मापे.

३०) सरकारी प्रचाराच्या फिल्म्स व माहितीपत्र.

३१) शैक्षणिक पुस्तके व ग्रंथ, छापील पुस्तके, वर्तमानपत्रे व नियतकालिके यांचे ताजे अंक.

३२) सर्व प्रकारची बि-बियाणे,रोपे व फुले.

३३) कातडी मोटा.

३४) सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रोत्सवासाठी आयात होणा-या सर्व देवदेवतांच्या मातीच्या,शाडू मातीच्या व पीओपीच्या मुर्त्या.

३५) बेदाणा

३६) ताजे दूध, ताजा हिरवा व सर्व प्रकारचा भाजीपाला

३७) सुकी मिरची (सुकी लाल मिरची),सुके कांदे,सुके लसुण व बटाटे

## अनुसूची दोन
## नियम - ४
## भाग - १ (अ)

१) ज्या मालावर विविक्षित औद्योगिक उपक्रमांकडून कमी दराने जकात देय असेल अशा मालाची यादी.

अनुसूची १ मध्ये नोंद ६ (क), ३५, ४०, ६४, ६५, ७१, ७७ यात विनिर्दिष्ट केलेला सर्व माल व त्या अनूसूचीच्या नोंद २५ मध्ये नमूद केलेले खोबरे आणि नोंद ७० मध्ये नमूद केलेले नैसर्गिक कच्चे रबर व लेटेक्स, एखादया औद्योगिक उपक्रमामध्ये संस्करणासाठी कच्चा माल म्हणून उपयोग करण्यासाठी त्या उपक्रमाने आयात केला असेल व उपक्रमाने नमुना १४ मध्ये त्यासंबंधी प्रतिज्ञापन केले असेल तेव्हा त्यावर शेकडा १.०० पेक्षा कमी नसेल व शेकडा २.०० पेक्षा जास्त नसेल अशा दराने महानगरपालिकेकडून जकात बसविण्यात येईल.

## अनुसूची-२
### भाग - २
नियम (४)

नाशिक महानगरपालिका नविन औदयोगिक प्रकल्पास (न्यु इंडस्ट्रीयल अंडर टेकिंग) खालील बाबतीत महासभेवर धोरणात्मक निर्णय घेऊन जकातीमध्ये सवलत देणे बाबतचे धोरण.

नाशिक महानगरपालिकेने तशा अर्थाचा ठराव संमत केल्यावर ज्या मालावर जकात अंशतः सुट देय असेल अशा मालाबाबत तरतुदी.

१) नाशिक महानगरपालिका हद्दीत मेगा प्रोजेक्ट राज्य शासनाने व महानगरपालिकेने वेळोवेळी ठरविले असेल अशा उद्योगांमध्ये ५०० कोटी रुपये पेक्षा अधिक गुंतवणुक असेल अशा नविन औद्योगिक उपक्रमांना (न्यु इंडस्ट्रीयल अंडर टेकिंग) प्रारंभी आयात केलेले सुटे भाग, संयंत्र व यंत्रसामुग्री इ. यांना जकात करात अशंतः सुट देता येईल.

अ) मेगा प्रोजेक्ट अंतर्गत किमान रुपये ५०० कोटीची गुंतवणुक असावी.

ब) मेगा प्रोजेक्ट व खालील औद्योगिक उपक्रमांसाठीच जकातीतून सुट देणे बाबतचा विचार करता येईल. व त्यानुसार गुंतवणूकीची किमान मर्यादा असेल

| | | | |
|---|---|---|---|
| १) | वाहन विषयक उद्योग व इतर उद्योग | - | ५०० कोटी |
| २) | अन्न व अन्न प्रक्रिया उद्योग | - | २५० कोटी |
| ३) | माहिती व माहिती तंत्रज्ञान आधारीत उद्योग | - | १०० कोटी |
| ४) | शेती विषयक उद्योग. | - | २०० कोटी |

वरील औद्योगिक उपक्रमा बाबतच सवलतींचा विचार केला जाईल.

औद्योगिक उपक्रम यांना त्यांचे नवीन औद्योगिक उपक्रमांसाठी उभारणीसाठी लागणारे बांधकाम साहित्य,लोखंड,पोलाद,सिमेंट,विटा व विद्युत साहित्य यावर जकात सवलत दिली जाणार नाही.

२) नवीन औद्योगिक उपक्रम (न्यु इंडस्ट्रीयल अंडर टेकिंग) यांनी पुढील प्रमाणे माहिती महानगरपालिकेस सादर करणे आवश्यक राहिल.

अ) आपले नव्याने प्रस्तावित होणा-या प्रकल्पाचे स्वरुप व गुंतवणुक उत्पन्न इ. माहिती.

ब) नवीन उद्योग उपक्रमाचे उद्योग संचलनालय यांचे कडील नोंदणी मान्यताप्राप्त असलेचा दाखला.

क) नविन उद्योगामुळे किती रोजगार निर्मिती होणार आहे याची माहिती.

ड) नविन प्रकल्पाकरीता आयात होणा-या मालाची जसे मशिनरी व इतर मालाची यादी व संभाव्य किंमत या विषयीची माहिती.

इ) नविन प्रकल्पासाठी आयात होणा-या कच्च्या मालाची यादी व संभाव्य किंमत.

फ) प्रतिवर्षी किती उत्पन्न व उलाढाल (Turnover) होणार आहे.

ग) उत्पादीत होणारे वाहन,साहित्य,ब्रॅण्ड इ.माहिती. व उत्पादीत वस्तु निर्यातक्षम आहेत काय?

ह) सदरचा नविन प्रस्तावित होणारा प्रकल्प हा पुर्णतः नविन प्रकल्प आहे किंवा कसे? की तुमच्या सध्या अस्तित्वात असलेल्या प्रकल्पाचा विस्तारीत प्रकल्प आहे. पुर्णतः नविन प्रकल्प असल्यास त्याची सविस्तर माहिती ,अहवाल कंपनी रजिष्ट्रेशन नंबर इ.सह दयावी.

३) महानगरपालिका ठरवेल अशा ठराविक कालापर्यंत नविन औद्योगिक उपक्रमांनी वापरासाठी आयात केलेला कच्चा माल व हत्यारे इ. अंशतः सवलत देता येईल.
विदेशातून आयात केलेले पुर्वी वापरातील जुनी मशिनरी व संयत्रे इ. यावर बिल ऑफ इंन्ट्री एक्साईज पास इ.खात्रीवर जकात सवलत देता येईल.

४) १ (अ) व (ब) मध्ये नमुद केलेल्या मेगा प्रोजेक्ट बाबत महापालिकेस कोणत्याही मालाच्या बाबत महानगरपालिकेस तिच्या मते निव्वळ स्थानिक परिस्थितीचा विचार करुन (स्थानिक परिस्थितीचे कारण महासभेच्या ठरावात नोंदणे आवश्यक राहिल) काही कालापर्यंत जकात करात अंशतः सवलत देता येईल.

नाशिक महानगरपालिकेकडून जकातीची अंशतः सवलत देण्यात येईल त्यावेळी देय जकातीची आकारणी अनुसूची १ मध्ये नमुद केलेल्या वस्तुच्या बाबत किमान दरापेक्षा कमी असता कामा नये. अनुसूची १ मधील कोणत्या बाबी जकात सवलतीस पात्र रहाणार नाही यांचे पुर्णतः अधिकार महानगरपालिकेस असतील.

५) महानगरपालिकेने जकातीची सवलत देतांना औद्योगिक उपक्रमांनी आयात केलेल्या कच्चा मालाची यादी तसेच संयत्र व मशिनरी यांची यादीसह माहिती दयावी व संभाव्य किती रक्कमेपर्यंत अंशतः सवलत देता येईल. यासाठी महासभा ठरावाद्धारे मान्यता करुन घेणे आवश्यक राहिल.

६) मान्यताप्राप्त औद्योगिक उपक्रमांना (न्यु इंडस्ट्रीयल अंडर टेकिंग) सवलत देतांना पुर्वीच्या अस्तित्वात असलेल्या औद्योगिक उपक्रमांचे विभाजन करुन अथवा पुर्नबांधणी करुन करणार असेल तर त्याला नविन औद्योगिक उपक्रम म्हणून संबोधण्यात येणार नाही. किंवा पुर्वीच्या अस्तित्वात असलेल्या औद्योगिक उपक्रमाचे काही भाग किंवा मशिनरी हया नविन औद्योगिक उपक्रमात समाविष्ठ करता येणार नाही असे केल्यास दिलेली सवलत रद्य करण्यात येईल.

७) (अ)नविन औद्योगिक उपक्रम (न्यु इंडस्ट्रीयल अंडर टेकिंग) यांना जकात सवलतीचा कालावधी जास्तीत जास्त ५ वर्षाच्या मर्यादेपर्यंत राहिल.यामध्ये वाढ केली जाणार नाही.
(ब) नवीन औद्योगिक उपक्रम हा ३ वर्षाचे कालावधीत पुर्ण करणे उपक्रमास बंधनकारक असेल.

८) नविन औद्योगिक उपक्रम (न्यु इंडस्ट्रीयल अंडर टेकिंग) यांनी उपक्रम सुरु केल्यानंतर महानगरपालिका हद्दीतून सदरचा उद्योग किमान १५ वर्षेपर्यंत दुसरीकडे स्थलांतर/ बंद करणार नाही. स्थलांतर किंवा बंद केल्यास सवलती रद्द करुन सर्व जकात कर वसुल केला जाईल. याबाबतचे हमीपत्र महानगरपालिकेस देणे आवश्यक राहिल.

९) ज्या नविन औद्योगिक उपक्रमांमुळे (न्यु इंडस्ट्रीयल अंडर टेकिंग) पर्यावरण प्रदुर्षण होणार असेल अशा उपक्रमांना वरील प्रमाणे सवलत देय असणार नाही. नवीन उद्योगांकरीता महाराष्ट्र प्रदुर्षण नियंत्रण मंडळ यांचा दाखला असणे आवश्यक आहे.

**१०) आजारी उद्योगासाठी जकात सवलतीसाठी तरतुद :**

**व्याख्या** : आजारी उद्योग म्हणजे केंद्र व राज्य शासन निर्णयानुसार अथवा भारतीय रिझर्व बँकेने घोषित केलेले उद्योग.

नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्राचे शासन निर्णयानुसार जे उद्योगधंदे आजारी उद्योग म्हणुन घोषित असतील अशा आजारी उद्योगधंद्यांना प्रोत्साहित करण्यासाठी. अशा प्रकारच्या उद्योगधंद्यांनी आयात केलेला कच्चा माल यावर सदरचा नियम अस्तित्वात आल्यापासुन पहिल्या पाच वर्षाच्या मुदतीसाठी खाली निर्देशित निकष व दराप्रमाणे जकात आकारणी करण्यात येईल.

**निकष** :

१) संबंधित आजारी लघुउद्योगाला वित्तीय सहाय्य करणा-या वित्तीय संस्था/बँक यांनी बनविलेल्या पुनरुज्जीवीत योजनेत राज्य शासनातर्फे शुश्रुषा कार्यक्रमांतर्गत सोयी सवलती देण्यात येतात. उदा.विक्रीकर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या थकबाकीची मुळ रक्कम,व्याज व दंडनीय व्याज इत्यादिसह जी एकुण रक्कम होईल ती सर्व रक्कम थकबाकी म्हणून आली असेल व आजारी उद्योगाने ही संपूर्ण रक्कम जास्तीत जास्त ३६ मासिक हप्त्यामध्ये १३ % वार्षिक व्याजाने परतफेड करण्याचे मान्य केलेले असेल तरच संबंधित उद्योग जकात सवलतीस पात्र असतील.

२) आजारी औद्योगिक घटकाला वित्तीय सहाय्य करणा-या बँक / वित्तीय संस्थांनी संबंधित आजारी उद्योग घटकाकरीता शुश्रुषा कार्यक्रमांतर्गत पुनरुज्जीवन योजनेचा प्रस्ताव त्यामध्ये योजना सुरु होण्याच्या दिनांकासह योजनेचा कालावधी नमुद करुन संबधित उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक / जिल्हा उद्योग केंद्राच्या अधिक्षक यांनी उद्योग अधिका-यांकडे सादर करावा.

३) महाव्यवस्थापक/जिल्हा उद्योग केंद्राच्या अधिक्षकीय यांचेकडुन संबंधीत औद्योगिक घटकांने आजारी उद्योग प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

४) आजारी उद्योग प्रमाणपत्रांची प्रत महानगपालिकेस सादर करणे बंधनकारक राहील. व त्याप्रमाणे पुढे नमुद केल्याप्रमाणे जकात सवलत मा. आयुक्त साो. यांचे मान्यतेने देता येईल.

| **प्रचलित दर** | **एकुण जकातीच्या** | **सवलत** |
|---|---|---|
| अ) पहिल्या वर्षी | २० % | ८० % |
| ब) दुस-या वर्षी | ४० % | ६० % |
| क) तिस-या वर्षी | ६० % | ४० % |
| ड) चौथ्या वर्षी | ८० % | २० % |
| इ) पाचव्या वर्षी | ९० % | १० % |

**११) नविन औद्योगिक उपक्रम अथवा महापालिकेने सवलत दिलेले औद्योगिक उपक्रमात स्थानिक कुशल,अकुशल कामगार यांना प्राधान्य दयावे लागेल.**

दिनांक : / /२००६

ठिकाण : नाशिक

**आयुक्त,**
नाशिक महानगरपालिका,नाशिक

.............................................................................................

# नमुना १ (नियम १४)

**महानगरपालिका जकात हद्दीमध्ये खपासाठी,वापरासाठी किंवा विक्रीसाठी आयात केलेल्या शुल्कपात्र मालाबाबत प्रतिज्ञापत्र.**

**प्रतिज्ञापत्र = डिक्लेरेशन (या इंग्रजी शब्दाचे भाषांतर)**

जकात अधिकारी,जकात नाका क्रमांक..........महानगरपालिका यांस,

मी.........(आयातिकाचे पूर्ण नाव व पत्ता नमूद करावा)....याद्वारे जाहीर करतो की,खाली उल्लेखिण्यात आलेला माल महानगरपालिका जकात हद्दीतील खपासाठी,वापरासाठी किंवा विक्रीसाठी म्हणून उक्त हद्दीत आयात करण्यात येत असून,खाली उल्लेखण्यात आलेले त्याचे मूल्य व वजन/परिमाण हे खरे व अचूक आहे व मूळ बीजकानुसार ते नमूद करण्यात आले आहे. व बीजकाची खरी प्रत सोबत जोडण्यात आली आहे उक्त बीजकात माल नोंदपत्र/रेल्वे पावती/माल परिवहन ज्ञाप/विमानाने माल पाठविल्याबद्यल नोंदपत्र क्रमांक.........दिनांक.........अनुसार मी,आज रोजी आयात केलेला सर्व माल समाविष्ट आहे. आजपासून तीन वर्षाच्या आत आपल्याकडून मागणी करण्यात येईल तेव्हा आपल्या तपासणीसाठी उक्त बीजक व तद्अनुषंगिक कागदपत्रे सादर करण्यात येईल याचीही मी हमी देतो.

| | | वर्णन | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.नं. | माल नोंद पत्र/रेल्वे पावती/माल परिवहन ज्ञाप/विमानाने माल पाठविल्याचे नोदपत्र क्रमांक तारीख | पुडक्यांची संख्या व वर्णन | माल | वर्णन वजन किंवा परिमाण (एकुण) | मुल्य अधिक स्वतंत्रपणे दयावयाचे अनुषंगिक खर्च | माल पाठविणा-याचे नाव व संपूर्ण पत्ता | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

आयातिकाच्या निवासस्थानाचा / व्यापारधंदयाच्या जागेचा संपूर्ण पत्ता.

दिनांक..............                                        आयातिकाची सही

बीजकाबरोबर वरील तपशिल मी ताडून पाहिला असून मालाची पडताळणी केली आहे व ती बरोबर असल्याचे दिसून आले आहे. जोडण्यात आलेली बीजकाची खरी प्रत पडताळून पाहण्यात आली असून ती बरोबर असल्याचे दिसून आले आहे. जाहीर केलेले वजन किंवा परिमाण किंवा मूल्य अनुषंगिक खर्चासह हे बरोबर आहे. मालाचे कर योग्य वजन/परिमाण/मूल्य र.रु. ..................आहे व जकातीचा दर.........आहे.

दिनांक................जकातीदाखल रुपये.................ची रक्कम पावती क्रमांक ......... दिनांक .............. अन्वये वसुल करण्यात आली आहे.

दिनांक............                                        निरिक्षक/लिपीक

# नमुना २ (नियम १४)

**प्रवेश नाक्यापासून निर्गमन नाक्यांपर्यत संरक्षकाशिवाय शुल्कपात्र माल (जो) त्वरीत निर्यात करण्याचा इरादा आहे असा महानगरपालिका जकात हद्यीमध्ये (आयात केलेला माल) नेण्याची लेखी परवानगी मिळविण्यासाठी**

**प्रतिज्ञापत्र नि अर्ज**

जकात अधिकारी,जकात नाका क्रमांक..........महानगरपालिका,

मी.........(आयातिकाचे पूर्ण नाव व पत्ता नमूद करावा)....याद्वारे जाहीर करतो की,खालील तक्त्यामध्ये नमूद केलेला माल मी,दिनांक (माल आल्याची तारीख.......) रोजी........वाजता.......येथे (प्रवेशनाक्याचे नाव). आयात केला आहे......मी आयात केलेल्या मालाचा तपशील खालील तक्त्यात देण्यात आलेला असून तो बरोबर आहे. उक्त माल खपासाठी,वापरासाठी किंवा विक्रीसाठी म्हणून महानगरपालिका जकात हद्यीत आयात करण्यात येत असून तो जकात हद्यीबाहेरील...........ठिकाणी (माल जेथे निर्यात करावयाचा आहे त्या ठिकाणाचे नाव ) ताबडतोब निर्यात करण्याचा इरादा.

| मालनोंदपत्र /रेल्वेपावती क्रमांक | माल परिवहन/विमानाने माल पाठविल्याचे नोंदपत्र दिनांक | पुडक्यांची संख्या मालाचे वर्णन | वजन किंवा परिमाण | मूळ बीजकानुसार मूल्य | उक्त माल पाठविणा-याचे नाव व पत्ता | ज्याच्याकडे माल पोहोचवायचा असेल त्या माल घेणा-याचे पूर्ण नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

१) जो माल ताबडतोब निर्यात करण्याचा इरादा असेल अशा मालाच्या निर्यातीसाठी विहीत करण्यात आलेल्या शर्तीनुसार व रितीनुसार (मालाची) आयात करण्यात आल्याच्या वेळेपासून...........तासाचे आत, उक्त माल महानगरपालिकेच्या जकात हद्यीबाहेर नेण्यात येईल.

२) निर्गमन नाकयाकडे जाताना कुठेही न थांबता आयात केलेल्या मालाच्या आकारात किंवा परिमाणात फेरफार न करता आणि नेणारी माणसे न बदलता उक्त माल विहीत करण्यात आलेल्या मार्गानेच केवळ निर्गमन नाक्याकडे सरळ नेण्यात येईल.

३) मालाच्या वाहनावर कोणताही मोहोर लावण्यात आली असेल तर, वाहन व माल निर्गमन नाक्यातून बाहेर पडेपर्यंत उक्त मोहोर जशीच्या तशी राहील याची मी याद्वारे हमी देत आहे.

चालकाचा अनुज्ञाप्ती क्रमांक....

आयातिकाच्या निवासस्थानाचा किंवा व्यापारधंदयाच्या जागेचा पत्ता.........

आयात दिनांक....

आयात वेळ.............

दिनांक......

उक्त माल,संरक्षकाशिवाय निर्गमन नाक्यावर नेण्याची मला परवानगी दयावी ही विनंती,

आयातिकाची सही.

# नमुना ३ (नियम १४ व १९)

**महानगरपालिकेने ठेवलेल्या शुल्कबंद वखारीत ठेवून नंतर जो माल निर्यात करण्याचा इरादा असेल अशा महानगरपालिका जकात हद्दीमध्ये आयात केलेल्या शुल्कपात्र मालाबाबत अर्ज**

प्रभारी अधिकारी शुल्कबंध वखार ..........महानगरपालिका यांस,

मी.........(आयातिकाचे पूर्ण नाव व पत्ता नमूद करावा).......माझ्या जबाबदारीवर व जोखीमीवर माल मोटार क्र............मधील (परिवहन एजन्सीचे नाव किंवा चालकाचे नाव) यांस माझ्या वतीने, महानगरपालिकेने ठेवलेल्या शुल्कबंध वखारीत खाली नमुद केलेला माल ठेवण्याची लेखी परवानगीसाठी याद्वारे अर्ज करीत आहे. हा माल आवश्यक वाटेल तसतसा व तेव्हा जकात हद्दीबाहेर नंतर निर्यात करावयाचा आहे. खाली दिलेला तपशील अचूक आहे.

| आयात पत्रकाचे क्रमांक व दिनांक | पुडक्यांची संख्या व वर्णन | मालाचे वर्णन | वजन किंवा परिमाण | मूळ बीजकानुसार मुल्य | उक्त माल पाठविणा-याचे संपूर्ण नाव व पत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

मी याद्वारे शुल्कबंध वखारीत ठेवलेल्या मालासंबंधी अटीशर्ती यांचे पालन करण्याची व शुल्कबंध वखारीत माल ठेवण्यासाठी असलेल्या लेखी परवानगी या बाबतीत केलेल्या स्थायी आदेशात कोणतीही फी निर्दिष्ट केलेली असल्यास ती देण्याची हमी देत आहे.

दिनांक........... आयातीकाची सही

.............................................................................................................................

माल घेऊन शुल्कबंध वखारीत जाण्याची परवानगी देण्यात येत आहे.

मालावर मोहर लावण्यात आली आहे/नाही व पुढीलप्रमाणे तिच्यावर खूण करण्यात आली आहे / नाही.

प्रवेशनाका............... निरिक्षक / लिपीक

(शुल्कबंध वखारीच्या प्रभारी अधिका-याने भरावयाचा मजकूर)

वरील अर्जात उल्लेखिलेल्या सर्व मालाची पडताळणी करण्यात आली असून तो पुढील शर्तीस अधीन राहून या शुल्कबंध वखारीत ठेवण्यास अनुज्ञा देण्यात येत आहे.

(शुल्कबंध वखारीत माल ठेवण्यासाठी परवानगी मंजुर करण्यासाठी,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनुसार केलेल्या स्थायी आदेशाद्वारे मनपाने मान्य केलेल्या शर्तीच्या आधारावर येथे शर्ती नमूद कराव्यात.)

दिनांक.......... प्रभारी अधिकारी
शुल्कबंध वखार.......

या शुल्कबंध वखारीत.........दिवशी संपणा-या............दिवस मुदतीपर्यंत माल ठेवण्यासाठी लेखी परवानगी दाखलची फी म्हणून रुपये........पावती क्रमांक.........दिनांक.........अन्वये वसूल झाले.

प्रभारी अधिकारी
दिनांक............. शुल्कबंध वखार.......

.............................................................................................................................

(माल ठेवण्यात आलेल्या मुदतीत वाढ करण्यासंबंधी प्रमाणपत्र)

शुल्कबंध माल ठेवण्याबद्दल जी मुदत.......रोजी संपते, त्या मुदतीत.........पर्यंत वाढ करण्यात येत आहे.

प्रभारी अधिकारी
दिनांक............. शुल्कबंध वखार.......

## नमुना ४ ( नियम १४, २४, २५ )

**आयातीकाकडे तात्पुरता ठेवून नंतर निर्यात करावयाचा इरादा असेल असा किंवा परत केलेला माल म्हणून तात्पुरता ठेवावयाचा आहे असा शुल्कपात्र माल महानगरपालिका जकात हद्दीत आयात करण्यासंबंधीचे प्रतिज्ञापत्र**

जकात अधिकारी.............
जकात नाका क्र...............

मी.........(आयातिकाचे पूर्ण नाव व पत्ता नमूद करावा)........याद्वारे जाहीर करतो की,खाली उल्लेखिण्यात आलेला माल माझ्या जवळ..........(येथे माल ठेवण्यात येणारा असेल तो पत्ता निर्दिष्ट करावा) ठिकाणी तात्पुरता ठेवून नंतर तो जकात हद्दीबाहेर निर्यात करावयाचा आहे. त्यावरील संपूर्ण जकात इतकी रक्कम रोख स्वरुपात अनामत म्हणून (डिपॉझिट)देण्याची माझी तयारी असून, उक्त माल आयातीसबंधी रक्कम अनामत ठेवण्याच्या किंवा ज्या प्रसंगी अशी अनामत रक्कम कोणत्याही कारणासाठी ठेवली गेली नसल्यास आयातीच्या ठिकाणाहून ज्या तारखेस माल हलविण्यात आला आहे त्या तारखेपासून सहा महिन्याचे आत हद्दीबाहेर निर्यात करण्यात आला. तर उक्त रक्कम अनामतीच्या नियमानुसार परत करण्याची मी मागणी करीन. खाली उल्लेखिलेला तपशील खरा असून तो मूळ बीजकानुसार व बीजकाची खरी प्रत यासोबत सादर करण्यात आली आहे. उक्त बीजकामध्ये माल नोंदपत्र /रेल्वेपावती/माल परिवहन ज्ञाप/विमानाने माल पाठविल्याचे नोंदपत्र क्रमांक..........क्रमांक..........प्रमाणे मी आयात केलेला सर्व माल समाविष्ट आहे.

| अ.नं. व तारीख | आयात पत्रकाचा क्रमांक व तारीख | पुडक्यांची संख्या व वर्णन | मालाचे वर्णन | वजन किंवा परिमाण | मुल्य अधिक स्वतंत्रपणे दयावयाचे सर्व अनुषंगिक खर्च | माल पाठविणा-याचे नाव व संपूर्ण पत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

आयातिकाच्या निवासस्थानाचा / व्यापारधंदयाच्या जागेचा संपूर्ण पत्ता.

दिनांक.............. आयातिकाची सही

वरील तपशील बीजकाबरोबर तपासण्यात व पडताळून पाहण्यात आला असून तो बरोबर असल्याचे दिसून आले आहे. जोडण्यात आलेली बीजकाची खरी प्रत पडताळून पाहण्यात आली असून ती बरोबर असल्याचे दिसून आले आहे.
नमुद केलेले वजन किंवा परिमाण किंवा अनुषंगिक खर्चासह हे मूल्य बरोबर आहे.
मालाचे करपात्र वजन/परिमाण/मूल्य...........आहे व जकातीचा दर........आहे.

दिनांक............ निरिक्षक/लिपीक

जकातीची रक्कम रुपये..............
पावती क्रमांक........... दिनांक..........अन्वये वसूल करण्यात आली आहे.

दिनांक.......... निरीक्षक/लिपीक

## नमुना ५ ( नियम १४ व १५ )

**चालू खाते ठेवण्याची परवानगी दिलेला एखादा इसम,भागीदार पेढी किंवा संस्था यांच्या वतीने आयात करण्यात आलेल्या शुल्कपात्र मालासंबंधी प्रतिज्ञापन.**

जकात अधिकारी..................... जकात नाका क्र. .............. नाशिक महानगरपालिका यांस,

मी.........(आयातिकाचे पूर्ण नाव व पत्ता नमूद करावा)....याद्वारे जाहीर करतो की,खाली नमुद करण्यात आलेला माल (चालु खाते) ठेवण्याची परवानगी दिलेला इसम,भागीदार पेढी किंवा त्याचे नाव येथे नमुद करावे. यांच्या वतीने महानगरपालिका जकात हद्दीत आयात करण्यात येत असून,खाली उल्लेखण्यात आलेले मालाचे मूल्य व वजन/परिमाण हे खरे व बरोबर आहे व मूळ बीजकानुसार आहे. मूळ बीजकाची खरी प्रत सोबत सादर करणेत येत आहे माल नोंदपत्र/रेल्वे पावती/माल परिवहन ज्ञाप/विमानाने माल पाठविल्याचे पत्र क्रमांक.........दिनांक.........अनुसार मी,आज रोजी आयात केला आहे. तो उक्त बीजकात समाविष्ट आहे. आजपासून तीन वर्षाच्या आत केव्हाही आपणाकडून मागणी करण्यात आल्यास तपासणीसाठी उक्त बीजक सादर करण्यात येईल याची मी हमी देतो.

परिवहन ज्ञाप / विमानाने माल पाठविल्याचे नोंदपत्र क्रमांक............क्रमांक............
समाविष्ट आहे.

| **आयातिकाने भरावयाचा मजकूर** | | | | | | **मध्यवर्ती जकात कार्यालयाने भरावयाचा मजकूर.** | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.नं. | माल नोंद पत्र/रेल्वे पावती/माल परिवहन ज्ञाप/विमानाने माल पाठविल्याचे नोदपत्र क्रमांक तारीख | पुडक्यांची संख्या व वर्णन | माल वर्णन परिमाण | वजन किंवा दयावयाचे (एकुण) | मुल्य अधिक स्वतंत्रपणे दयावयाचे अनुषंगिक खर्च | जकात दर जकात | वसुली योग्य रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

माल पाठविणा-याचे नांव व पत्ता..................

चालू खाते देय रक्कमा नमूद करण्यात आल्या.

दिनांक.............. आयातिकाची सही

दिनांक : अधिक्षक

वरील तपशीलाची मी बिजंकाबरोबर तपासणी करुन मालाची पडताळणी केली आहे व ती बरोबर असल्याचे दिसून आले आहे. जोडण्यात आलेली बीजकाची खरी प्रत पडताळून पाहण्यात आली व ती बरोबर असल्याचे दिसून आले आहे. जाहीर करण्यात आलेले मालाचे वजन किंवा परिमाण किंवा अनुषंगिक खर्चासह मूल्य हे बरोबर आहे. पास क्रमांक.........दिनांक...........देण्यात आला आहे.

दिनांक............ निरिक्षक/लिपीक

# नमुना ६ ( नियम १५ )

**चालू खाते ठेवण्याची परवानगी दिलेला एखादा इसम,भागीदार पेढी किंवा संस्था यांच्या वतीने आयात करण्यात आलेल्या मालासाठी पास.**

महानगरपालिका,
पुस्तक क्रमांक........प्रवेश नाका क्रमांक..........पुस्तक क्रमांक..........प्रवेश नाका क्रमांक..............
...........................................................................................................................

चालू खात्यावर (इसम,भागीदारी संस्था किंवा संस्था यांचे नाव) ने आयात केलेल्या मालासाठी पास

पासाचे प्रतिज्ञापत्र केलेल्या

| वर्णन | पुडक्यांची संख्या व वर्णन | मालाचे वर्णन | वजन परिमाण किंवा मुल्य | |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | |

दिनांक
प्रवेश नाका निरिक्षक/लिपीक

दिनांक
प्रवेश नाका निरिक्षक/लिपीक

# नमुना ७ ( नियम १८ )

## लेखी परवानगी-नि-परिवहन पास (दोन प्रति)

पुढील माल, प्रवेश नाका........क्रमांक...........क्रमांक..........ते निर्गमन नाका क्रमांक पर्यंत ............मार्गाने,संरक्षकाशिवाय जावू देण्यास अनुज्ञा आहे.

| माल आल्याची तारीख व वेळ | वाहन क्रमांक किंवा रेल्वे पावती क्रमांक,ज्या तारखेस आयात करण्योत आला ती तारीख | कसा निर्यात करण्यात आला | पुडक्यांची संख्या व वर्णन | मालाचे वर्णन | वजन किंवा परिमाण | मूल्य | ज्याच्याकडे माल निर्यात करण्यात आला त्या इसमाचे नाव | मोहोर लावण्यात आला त्या इसमाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

आयातीकाचे संपूर्ण नाव व पत्ता
अनामत रक्कम रुपये.........संकिर्ण पावती क्रमांक......दिनांक.........अन्वये वसूल झाली

लेखी परवानगी नि परिवहन पास फी रु........संकिर्ण पावती क्रमांक..........दिनांक.........वसूली झाली.

निर्गमन नाका.........च्या पलिकडे..........वाजता माल निर्यात करण्यात आला पाहिजे.

प्रवेश नाका निरिक्षक/लिपीक यांची सही

मी याद्वारे प्रमाणित करतो की,वर उल्लेखण्यात आलेला माल आज दिनांक.........माहे.........सन ......रोजी..........वाजता रेल्वे पावती क्रमांक........वाहन क्रमांक...........अन्वये माझ्या डोळयादेखत जकात हद्दीबाहेर नेण्यात आला.

निर्गमन नाका निरिक्षक/लिपीक यांची सही

अनामत रक्कम परत .............मिळाली.

दिनांक......                                        आयातिकाची सही.

# नमुना ७-अ ( नियम १८ पहा)

**जेव्हा संरक्षक पुरविण्यात येतो त्यावेळेचा लेखी परवानगी-नि-परिवहन पास** (दोन प्रती)

पुढील माल, प्रवेश नाका क्रमांक.........ते निर्गमन नाका क्रमांक..........पर्यंत ............मार्गाने,संरक्षकाबरोबर जावू देण्यात अनुज्ञा आहे.

| माल आल्याची तारीख व वेळ | वाहन क्रमांक किंवा रेल्वे पावती क्रमांक,ज्या तारखेस आयात करण्यात आला ती तारीख | कसा निर्यात करण्यात आला | पुडक्यांची संख्या व वर्णन | मालाचे वर्णन | वजन किंवा परिमाण | मूल्य | ज्याच्याकडे माल निर्यात करण्यात आला त्या इसमाचे नाव | मोहोर लावण्यात आली किंवा कसे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

आयातीकाचे संपूर्ण नाव व पत्ता
संरक्षकाची फी म्हणून रक्कम रुपये..........संकिर्ण पावती क्रमांक.......दिनांक.........अन्वये वसूल झाली.
निर्गमन नाका..........च्या पलिकडे...........वाजता माल निर्यात करण्यात आला पाहिजे.

प्रवेश नाका निरिक्षक/लिपीक यांची सही

मी याद्वारे प्रमाणित करतो की,वर उल्लेखिण्यात आलेला माल आज दिनांक..........माहे.........सन .......रोजी...........वाजता रेल्वे पावती क्रमांक.........वाहन क्रमांक...........अन्वये माझ्या डोळयादेखत जकात हद्दीबाहेर नेण्यात आला.

निर्गमन नाका निरिक्षक/लिपीक यांची सही

दिनांक.......

## नमुना ८ ( नियम २० पहा)

**शुल्कबंध वखारीत ठेवलेल्या मालाच्या निर्यातीच्या लेखी परवानगीसाठी सूचना नि अर्ज.**

प्रभारी अधिकारी,शुल्कबंध वखार....................नाशिक महानगरपालिका यांस,

महोदय,

मी............(आयातीकाचे संपूर्ण नाव,पत्ता नमूद करावा)...........याद्वारे खाली तपशील दिल्याप्रमाणे,नाका क्रमांक............मधून...........ठिकाणी माल निर्यात करण्याचा माझा इरादा जाहीर करीत आहे. उक्त माल ज्या बीजकान्वये आयात करण्यात आला त्या मूळ बीजकाच्या/बीजकांच्या व आयातीच्या वेळी केलेल्या अर्जाच्या प्रमाणित प्रती सोबत जोडण्यात आल्या आहेत. कृपया उक्त नाक्याकडे माल नेण्याची परवानगी देण्यात यावी.

| अ.क्र. | पुडक्यांची संख्या व वर्णन | मालाचे वर्णन | वजन किंवा परिमाण | मूल्य | माल आयात केल्याचा व शुल्कबंध वखारीत ठेवल्याचा दिनांक | आयात बीजकाचा क्रमांक व तारीख | माल पाठविणाराचे नाव व संपूर्ण पत्ता | माल कसा निर्यात करण्यात आला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

दिनांक.........                                                    आयातीकाची सही.

# <u>नमुना ९ ( नियम २० पहा)</u>

## लेखी परवानगी नि निर्यात पास (दोन प्रती)

क्रमांक...............

.............महानगरपालिकेच्या शुल्कबंध वखारीपासून निर्गमन नाका क्रमांक.............पर्यंत निर्यात ठिकाण..................

| निर्देश पास क्रमांक व दिनांक | खूण क्रमांक व पुडके क्रमांक | माल वर्णन | वजन किंवा परिमाण (एकुण) | मुल्य अधिक स्वतंत्रपणे द्यावयाचे अनुषंगिक खर्च | माल पाठविणाराचे नांव व पत्ता | कसा निर्यात केला | मोहोर लावण्यात आली किंवा कसे आणि/किंवा संरक्षकासमवेत पाठविला किंसा कसे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

अनामत रक्कम रुपये..........संकीर्ण पावती क्रमांक.........दिनांक.........शुल्कबंध वखार ते निर्गमन नाक्यापर्यंत माल नेण्यासाठी लेखी परवानगी दाखल निर्यात पास फी रुपये.........संकीर्ण पावती क्रमांक........दिनांक.........निर्गमन नाका क्रमांक...............च्या पलिकडे............वाजेपर्यंत माल निर्यात करण्यात येईल.

वेळ..........

दिनांक........... शुल्कबंध वखारीच्या प्रभारी अधिका-याची सही

(आयातिकाची सही)

मी याद्वारे प्रमाणित करतो की,मालावरील मोहर जशीच्या तशी होती व वर उल्लेखिलेला माल आज दिनांक.......माहे..........सन......रोजी.........वाजता...........वाहन क्रमांक............मधून माझ्या देखत जकात हद्दीबाहेर नेण्यात आला.

दिनांक.......... निर्गमन नाका,निरिक्षक/लिपीक यांची सही

..........................................................................................................

शुल्कबंध वखार ते निर्गमन नाक्यापर्यंत माल नेण्याच्या परवानगीसाठी तयार करण्यात आलेल्या नियमाला अनुसरुन फी वाढविण्यात येईल.

## नमुना १० (नियम २३ पहा)

### अनामत रक्कम परत मिळविण्यासाठी अर्ज

जकात अधिक्षक..................महानगरपालिका यांस,

महोदय,

मी...........(आयातीकाचे संपूर्ण नाव व पत्ता नमूद करावा) निर्गमन नाका क्रमांक..........मधून, निर्यात पास क्रमांक..........दिनांक.............अन्वये निर्यात करावयाच्या मालाबद्यल शुल्कबंध वखार/नाका क्रमांक.........येथे.........रोजी.........रुपये रक्कम, अनामत पावती क्रमांक.........दिनांक..........अन्वये अनामत ठेवली होती. हा माल विहीत कालमर्यादेत निर्यात करण्यात आला आहे. मी निर्गमन नाका अधिका-याच्या तशा अर्थाच्या प्रमाणपत्रासह अनामत रक्कमेची पावती व वर उल्लेखिलेल्या निर्यात पासाची दुसरी प्रत सोबत जोडीत आहे.

कृपया उक्त रक्कम मला परत करण्यात यावी.

दिनांक................ आयातिकाची सही-

## नमुना ११ (नियम २५,२६ पहा)

### आयातिकाकडे तात्पुरत्या ठेऊन घेण्यात आलेला मालाच्या निर्यातीच्या लेखी परवानगीकरीता सूचना नि आवेदन.

जकात अधिक्षक....................महानगरपालिका यांस,

महोदय,

मी..........(आयातिकाचे संपूर्ण नांव पत्ता येथे नमूद करावा.) याद्वारे खाली तपशील दिल्याप्रमाणे नाका क्रमांक..........मधून.........ठिकाणी माल निर्यात करण्याचा माझा इरादा जाहीर करीत आहे. उक्त माल ज्या मूळ बीजकान्वये आयात करण्यात आला त्या बीजकाची/बीजकांची प्रमाणित प्रत/प्रती सोबत जोडण्यात येत आहे/आहेत.प्रत्यक्ष पडताळणीसाठी मी माल सादर केला आहे. उक्त नाक्याकडे माल नेण्याची मला परवानगी देण्यात यावी ही विनंती.

| अ. नं. | मालाचे वर्णन | परिमाण (गोण्यांची किंवा पेटयांची संख्या) | आयात दिनांक व प्रवेश नाका क्रमांक | आयात बीजक क्रमांक व दिनांक | अनामत रकमेची पावती क्रमांक व दिनांक | एकुण | मूल्य | परत करावयाची रक्कम | देण्यात आलेल्या परतावा निर्यात पासाचा क्रमांक | माल पाठविणा-राचे नाव व पत्ता | माल कसा निर्यात करण्यात आला. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |

दिनांक :

आयातिकाची सही

वरीलप्रमाणे मालाची व वजनाची पडताळणी केली व ती बरोबर असल्याचे दिसून आले.

प्रति स्वाक्षरीत.........

पावती क्रमांक.........

जकात अधिकारी

परतावा निरिक्षक/लिपीक यांची सही

# नमुना १२ (नियम २५ पहा)

## लेखी परवानगी नि परतावा निर्यात पास

पावती क्रमांक.......... दिनांक........

| अ. क्र. | महिना व तारीख | आयातिकाचे नाव व पत्ता | माल पाठविणा-राचे नाव व पत्ता | मालाचे वर्णन | परिमाण किंवा पेटया यांची संख्या | एकुण वजन | मूल्य | परत करावयाची अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

| माल कसा निर्यात केला | निर्गमन नाका क्रमांक | ज्या तारखेस व वेळी माल निर्यात नाक्यात पोहोचला ती तारीख व वेळ | मालावर मोहोर लावण्यात आली किंवा कसे व त्या सोबत संरक्षक दिले किंवा कसे | शेरा |
|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | १४ |

लेखी परवानगी नि परतावा निर्यात पास फी रु...............संकिर्ण
पावती क्रमांक.........
दिनांक..........

आयातिकाची सही.

जकात अधिका-याची सही

मी याद्वारे प्रमाणित करतो की, वर उल्लेखिण्यात आलेला माल आज.........माहे.........सन........रोजी.........वाजता रेल्वे पावती क्रमांक.........वाहन क्रमांक........अन्वये माझ्या देखत जकात हद्यीबाहेर नेण्यात आला.

माल पडताळणीसाठी सादर करण्यात आला त्यावेळी यावरील मोहोर कोणतीही असेल तर जशीच्या तशी होती.

दिनांक.............

निर्गमन नाका अधिका-याची सही
नाका क्रमांक.............

..........................................................................................................................

मध्यवर्ती जकात कार्यालय किंवा शाखा कार्यालय ते निर्गमन नाक्यापर्यंत माल नेण्याच्या परवानगीसाठी कलम-३८६ अन्वये करण्यात आलेल्या उपविधीस अनुसरुन फी बसविण्यात येईल.

## नमुना १३ (नियम २९ पहा)

**अनामत रक्कम परत करण्याबद्दल अर्ज.**

जकात अधिक्षक...............महानगरपालिका यांस,
महोदय,
मी........................राहणार.....................सोबत जोडलेल्या लेखी परवानगी नि परतावा निर्यात पास क्रमांक...........दिनांक..............यात उल्लेखिलेला माल, माझी सूचना नि अर्ज दिनांक...........या अन्वये रोजी निर्यात करण्यात आला असल्यामुळे त्या पासानुसार अनामतीची रक्कम परत मिळण्यासाठी याद्वारे अर्ज करीत आहे. म्हणून र.रु...............परत करावी ही विनंती.

सहपत्र..............
दिनांक : ...........

आयातिकाची सही

.................................................................................................................

## नमुना १३ अ (अनुसूची २ भाग-१ नोंद क्र.२२)

**माल परत केल्यामुळे जकातीपासून सुट मागण्यांसंबंधीचा अर्ज**

प्रति,
जकात अधिकारी, जकात नाका क्र..........महानगरपालिका
मी / आम्ही.........(आयातिकाचे संपूर्ण नाव व पत्ता लिहीवा) याद्वारे असे जाहीर करतो की,............................हा माल (मालाचे वर्णन, नग इ.)
मी/आम्ही माल वाहतूक पावती क्र.........रेल्वे पावती क्र..............माल नोंद पत्र क्र............या अन्वये आयात केला असून तो मी/आम्ही......................यांच्याकडे....................येथे...................रोजी अन्वये पाठविला होता आणि तो माल किंवा त्याचा भाग, माल घेणा-याने नाकारल्यामुळे परत पाठवण्यात आला आहे/माल न स्वीकारल्याने माल वाहून नेणा-याने परत आणला आहे / माल घेणा-याला मिळालेला नाही. माझ्या / आमच्या प्रतिज्ञापनाच्या पुष्टयर्थ मी / आम्ही या सोबत...........

१) मूळ नोंदपत्राची सत्यप्रत ज्याद्वारे माल देशांतर्गत भागातील खरेदीदाराकडे पाठवण्यात आला होता ते चलन
२) खरेदीदाराकडून आलेल्या नकार पत्राची सत्यप्रत किंवा माल वाहून नेणा-याने माल परत पाठवल्याचा पुरावा किंवा माल घेणा-याने माल परत पाठवल्याचा पुरावा किंवा माल घेणा-याने माल न स्विकारल्याचा पुरावा...........पाठवित आहे./आहोत.

मी / आम्ही आणखी असे जाहीर करतो की, उक्त वस्तू...............महानगरपालिका हद्दीत स्थानिकरित्या तयार करण्यात आल्या आहेत.
सद्यपरिस्थितीत उक्त वस्तूंना जकातीपासून सूट मिळावी अशी माझी/आमची विनंती आहे.
आयातकाराच्या निवासस्थानाचा / धंद्याच्या ठिकाणाचा संपूर्ण पत्ताः

दिनांक.........                                        आयातिकाची सही.

# नमुना १४ (अनुसूची २ भाग १ अ)

**स्वतःच्या औद्योगिक उपक्रमासाठी आयातिकाने आयात केलेल्या शुल्कपात्र मालासंबंधी करावयाचे प्रतिज्ञापत्र.**

मी...............................या द्वारे जाहीर करतो की, ज्या मालासंबंधी नियम १४ नुसार वेगळे प्रतिज्ञापन दिले आहे तो माल...................च्या उत्पादनात..............(येथे तो माल कच्चा माल म्हणून उपयोगात यावयाचा आहे त्या उपक्रमाचे संपूर्ण नाव व पत्ता द्यावा)........या माझ्या उपक्रमात कच्चा माल म्हणून उपयोगात आणणार आहे. आणि त्या मालाची मी विक्री करणार नाही अगर तो दुस-यास अन्य उपयोगासाठी देणार नाही, आणि तसा त्याचा उपयोग करावयाचा असल्यास त्यावर सामान्य रितीने ठरविलेल्या दराने जो जकातीचा दर होईल तो दर व महाराष्ट्र नगरपालिका जकात नियमाच्या अनुसूची दोन मध्ये नमूद केलेल्या सवलतीच्या दराने जकात दिली आहे. त्यामधील फरकाची रक्कम दिल्याखेरीज तसे करणार नाही. तसे केल्याचे तपासणीत आढळून आल्यास जकातीच्या दहा पट दंड भरण्यास मी पात्र राहिल.

दिनांक...............                                        आयातिकाची सही.

सूचना : हे प्रतिज्ञापत्र नुमना १ मधील संबधी प्रतिज्ञापत्रकाबरोबर पक्के जोडावयाचे.

# प्रस्तावित दरपत्रक

अनुसूची - १

## नाशिक महानगरपालिका जकातीचे प्रस्तावित दर

### अनुसूची - १ नियम (३) (१) (२) (३) (४)

| बाब क्र. | मालाचा प्रकार | जकात किंमतीवर शेकडा दर | | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| | | कमाल दर | किमान दर | शेकडा किंमतीवर (%) |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **वर्ग १ : माणसे किंवा प्राणी यांचेकडून अन्न किंवा पय म्हणून वापरण्यात येणा-या वस्तू व औषधी द्रव्ये** | | | | |
| १ | धान्य,पीठ,दाळी आणि गवार,सोयाबीन,भाजलेले धान्य,साळी,रवा,कणी, लाहया,कुरमुरे,फुटाणे व पोहे धरुन सर्व प्रकारची कडधान्ये. | दर १० किलोस १.०० | दर १० किलोस ०.२० | दर १० किलोस ०.२० |
| २ | गवत,सुके गवत,भुसा,तणूस(फेरा),कोंडा,कडबा व घास (घोडयासाठी वैरण) | | जकात माफी | जकात माफी |
| ३ | चुणी,मोहा,कोणत्याही प्रयोजनार्थ वापरण्यात आलेले धान्याचे खांडस धरुन पेंड | २.०० | ०५० | ०.५० |
| ४ | सर्व प्रकारची गळीताची धान्य फोलपाटासह किंवा फोलपाटावाचून भूईमुग व सरकी धरुन परंतु बाब ३५ मध्ये विनीर्दिष्ट केलेली वगळून. | दर १० किलोस १.०० | दर १० किलोस ०.२५ | दर १० किलोस ०.२५ |
| ५ अ | हायड्रोजनेटेड तेले किंवा वनस्पती यांच्या निर्मितीसाठी वापरावयाची खाद्य तेले हायड्रोजनेटेड तेले किंवा वनस्पती किंवा बाटली बंद केलेली तेले. | ३.०० | ०.५० | १.०० |
| ५ ब | इतर सर्व प्रकारची खाद्य तेले. | ३.०० | १.०० | १.०० |
| ६ अ | साखर व खडीसाखर चमचमी व बुरा | ३.०० | १.०० | १.०० |
| ६ ब | सर्व प्रकारचा गुळ,राब,पेंड खजुर,शिरा व काकवी | ३.०० | ०.८० | १.०० |
| ६ क | ऊस | १.०० | ०.२५ | ०.५० |
| ७ | मद्य व मद्यार्क,बीअर,गांजा व भांग,अफू,चरस,ताडी व माडी | ८.०० | १.०० | ७.०० |
| ८ | बर्फ | १.५० | ०.५० | १.०० |
| ९ | तुप व लोणी (टेबल बटर व्यतिरीक्त) | ४.०० | १.०० | २.०० |
| १० | वनस्पती व हैड्रोजनेटेड तेले | ३.०० | ०.८० | १.०० |
| ११ | चहा,कॉफी व कॉफीच्या बिया | ४.०० | १.०० | २.०० |
| १२ | केशर व कस्तुरी | ७.०० | १.०० | ५.०० |
| १३ अ | खाद्यपदार्थ बेकन व हेम,टेबल बटर,मार्गारिन,ताजीफळे व सुपारी वगळून सुकवलेली किंवा जतन केलेली फळे,व कवचफळे,डबाबंद मासळी,चीझ,खवा,मिठाई,मुरंबा व जेली,गोठलेले व जतन केलेले दुध,आईस्क्रीम,सर्व प्रकारचे पिठुळ अन्न,लोणची,कोको,कोकोचे बी व चॉकलेटस्,बिस्कीटे व केक,डुकराची पातळ चरबी (लार्ड) किंवा प्राण्यांची खाद्य चरबी,मावा,दुधाची मलई,चक्का व दही,फळांचे रस,सरबते व सर्व पेये,ग्लुकोज,डेक्स्ट्रोज किंवा कोणताही फलशर्करा (खाद्य तेला व्यतिरीक्त),तेल्याच्या दुकानातील माल,परिरक्षित किराणा माल,बेकिंग किंवा करी पावडर,सॅकरिन,सर्व प्रकारचे खाद्य रंग व अर्के,इतर सर्व प्रकारचे ग्लुकोज,सातूचे वाळलेले सत्व (माल्ट एक्स्ट्रॅक्ट) मध,पापड,बटाटयांचे वेफर्स,कोणत्याही वापरासाठी जतन केलेले मांस आणि स्कीन मिल्क पावडर किंवा निरा व विशेषरित्या तरतूद न करण्यात आलेले सर्व प्रकारच्या अन्न किंवा पेये , सर्व प्रकारचे मिक्स मसाले | ६.०० | १.०० | ३.०० |
| ब | ॲरिऐटेड आणि मिनरल वॉटर | ६.०० | १.०० | ३.०० |
| १४ अ | सर्व रसायने,रासायनिक किटक नाशके,शल्य चिकीत्सकेच्या सर्व प्रकारच्या वस्तु,गॅसने भरलेल्या वस्तु,सॅनिटरी टॉवेल्स,पदार्थ विज्ञान विषयक व प्रयोग शाळेच्या सर्व प्रकारच्या वस्तू,पारा व सुरमा (खडे किंवा भुकटी) | ४.०० | १.०० | २.०० |
| १४ ब | औषधी द्रव्ये व ॲलोपॅथिक औषधे आणि होमियोपॅथीक, युनानी व आयुर्वेदीक औषधे, औषधे बनविणेसाठी लागणारी सर्व घटक व द्रव्य. | ४.०० | १.०० | २.०० |

| बाब क्र. १ | मालाचा प्रकार २ | जकात किंमतीवर शेकडा दर | | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| | | कमाल दर ३ | किमान दर ४ | शेकडा किंमतीवर (%) ५ |
| १५ | खजुर सुकी व ओली | ४.०० | १.०० | २.०० |
| १६ | सर्व प्रकारची चिंच, सुके शिंगाडे, हळद, धने, अंबोशी (ड्रायमँगो पिसेस) किंवा अंबोशी कोकम, आले व रताळे | ४.०० | ०.५० | ०.५० |
| १७ | सर्व प्रकारची ताजी फळे | २.०० | ०.५० | ०.५० |
| १८ | नारळ | ४.०० (१०० नगास) | १.०० (१०० नगास) | २.०० (१०० नगास) |
| १९ | सर्व प्रकारची भारतीय मिठाई,ब्रेड,बरी,चिवडा, | ४.०० | १.०० | १.०० |
| २० | सर्व प्रकारची मेलेली किंवा जिवंत मासळी (डबा बंद न केलेली ),अंडी व ताजे मांस | ३.०० | १.०० | १.०० |
| २१ | कोंबडे,बदके,व इतर शिकारीचे पक्षी | ४.०० नगास | ०.५० नगास | ०.५० नगास |
| २२ | वन्य प्राणी सर्व प्रकारचे शिकारीचे प्राणी | ३.०० नगास | १.०० नगास | ३.०० नगास |
| २३ | विडयांची पाने (खाण्याची) | ३.०० | १.०० | १.०० |
| २४ अ | सुपारी | ४.०० | १.०० | १.०० |
| २४ ब | वेलची,काथ,लवंग,जायपत्री,जायफळ,ओलचा सिडस् ,मिरे व कापूर | ४.०० | १.०० | १.०० |
| २५ | इतरत्र विनिर्दिष्ट न केलेल्या किराणा वस्तु त्यात खालील वस्तुंचा समावेश होतो. ओवा, आंबेहळद व ओव्याचे फुल,कथ्था,कलमी,काकडी बीज व कुंकू, खसखस व खसखसीचे बोंड,गुलाब,गोडंबी,सरस व गोंद (डिंक), जिरे,तेजपान,दालचिनी,नाकेश्वर व काळेमीठ, बुक्का,राळ, शिंधा, शेंदुर, शहाजिरे,खाण्याचा सोडा,संजिरे,शेंधवमीठ (असली व नकली) हिंग,खोबरे | ४.०० | १.०० | १.०० |
| **वर्ग २ : प्राणी** | | | | |
| २६ | मेंढया,बक-या,कोकरे व करडे | ४.०० नगास | २.०० नगास | २.०० नगास |
| २७ अ | बैल,गायी,म्हशी,रेडे,वासरे,घोडे व गाढवे | ६.०० नगास | ३.०० नगास | ३.०० नगास |
| २७ ब | कुत्री,मांजरे,पोपट इ.सारखी पाळीव प्राणी | ४.०० नगास | २.०० नगास | २.०० नगास |
| २८ | डुकरे | ६.०० नगास | ३.०० नगास | ३.०० नगास |
| २९ | उंट व हत्ती | १५.०० नगास | १०.०० नगास | १०.०० नगास |
| **वर्ग ३ : इंधनासाठी, प्रकाशासाठी, धुण्यासाठी, औद्योगिक वापरासाठी वापरल्या जाणा-या वस्तु** | | | | |
| ३० अ | लोणारी कोळसा | ३.०० | १.०० | १.०० |
| ३० ब | कोळसा व कोक | ४.०० | १.०० | ३.०० |
| ३१ | फटाके,दारुकाम व त्याचे घटक भाग,कॅल्शियम कारबोईड व रक्षणवर्ती (सेप्टीफयुज) | ७.०० | १.०० | ५.०० |
| ३२ | दीपमाला,ग्लोब,चिमण्या,विजेचे बल्ब,विजेच्या किंवा गॅसच्या प्रकाशासाठी असलेल्या वस्तु | ५.०० | १.०० | ३.०० |
| ३३ अ | सर्व प्रकारचे साबण | ५.०० | १.०० | २.०० |
| ३३ ब | बुटाचे व धातुचे पॉलिश | ५.०० | १.०० | ३.०० |
| ३४ | पोटॅश, रिटा, सोडा, तुरटी, लवण पदार्थ, शिकेकाई, धुण्याचा सोडा, परिष्कृत, मिठाचे पेटरे, फिनेल व कपडे, फरशी व भांडी धुतांना वापरण्यात येणारी इतर पदार्थ | ४.०० | १.०० | ३.०० |
| ३५ | अखाद्य तेलाचे तेल बिया | ४.०० | १.०० | ३.०० |
| ३६ | अखाद्य वनस्पती तेले | ५.०० | १.०० | ३.०० |
| ३७ | काष्ठ मद्यार्क व विप्रकृत स्पिरिट व औद्योगिक अल्कोहोल | ५.०० | १.०० | ४.०० |
| ३८ अ | सर्व प्रकारची खनिज तेले, डिझेल तेल, पेट्रोल, विमानचालन स्पिरिट, | ४.०० | १.०० | २.०० |

| बाब क्र. १ | मालाचा प्रकार २ | जकात किंमतीवर शेकडा दर | | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| | | कमाल दर ३ | किमान दर ४ | शेकडा किंमतीवर (%) ५ |
| | सर्व प्रकारची वंगणे, व्हाईट ऑईल, तुर्कतेल, फरनेस ऑईल, पेट्रोलियम पदार्थ, माव्याचे तेल, शेवसाल ऑईल, सॉलव्हंन्ट ऑईल,किटकनाशके म्हणून उपयोगात असलेली इतर ज्वलन तेले,नैसर्गिक गॅसेलिन, रंग (नोंद ४८ खाली येत असतील त्या व्यतिरिक्त), सोल्युशन व कॉम्पोझिशेन, टर्की रेड ऑईल व खनिज तेलांचे उपपदार्थ परंतु यात यापुर्वी अंतर्भूत केलेल्या वस्तुंमध्ये या पोट नोंदीखाली घासलेटचा अंतर्भाव होणार नाही. | | | |
| ३८ ब | अशुध्द तेल (क्रुड ऑईल) | ४.०० | १.०० | २.०० |
| ३८ क | द्रवरुप पेट्रोलियम गॅस | ४.०० | १.०० | २.०० |
| ३८ ड | घासलेट | ४.०० | ०.५० | ०.५० |
| ३९ | ग्रिस व पेट्रोलियम जेली | ५.०० | १.०० | ३.०० |
| ४० अ | खाद्य म्हणुन उपयोगात न येणारे सर्व प्रकारची अखाद्य चरबी, वराव (टॅलो) डुकराची पातळ चरबी (लार्ड) | ४.०० | १.०० | ३.०० |
| ४० ब | सर्व प्रकारची रसायणे सोडियम सल्फेट, सायझिंग सल्फेट, लोखंडाचे सल्फेट, तांब्याचे सल्फेट, ॲल्युमिनियमचे सल्फेट, सोडयाचे शैलिक (सिलीकेट), कॉस्टीक सोडा आणि अन्यत्र विनिर्दिष्ट केलेली नसतील असे इतर क्षार, सल्फर, पोटॅशियम क्लोराईड, स्टोरिया, झिंक क्लोराईड, मॅग्नेशियम क्लोराईड, सॉल्ट पेट्रे सर्व प्रकारची आम्ले, सुलॅमोनिक, बोरेक्स, पांजणीचे पीठ | ५.०० | १.०० | ३.०० |
| ४१ | मेणबत्त्या, आगकाडीच्या पेटया इतरत्र व तरतुद करणेत न आलेले गॅस किंवा दिवाबत्तीसाठी असलेल्या इतर वस्तु, इस्त्र्या व त्याचे सुटे भाग | ५.०० | १.०० | ३.०० |
| ४२ | सरपण (जळाऊ लाकडे) | ३.०० | १.०० | १.०० |
| ४३ | राख मिश्रीत कोळसा व भुकटी, पडपा व अर्धवट जळालेला कोळसा (सिन्डर) | ३.०० | १.०० | ३.०० |
| **वर्ग ४ :** | **इमारतीचे व इतर बांधकामाची सामुग्री** | | | |
| ४४ | सर्व प्रकारचे सिमेंट, सायगॉल,पीओपी,नेरु | ६.०० | १.०० | ४.०० |
| ४५ | डांबर(कोलटार), असफाल्ट, बिटयुमेन, फरसबंदीचे दगड, मॅगनीज, इमरी दगड किंवा चुरा, चुन्याची भुकटी (चॉक पावडर) दगडाच्या चिपा, दगडाची पुड, आगरा दगड, इमारतीचे दगड, खांगर (क्लिकर) व कोळशाची राख. | ६.०० | १.०० | ४.०० |
| ४६ | चकाकी दिलेल्या विटा व फरश्या (टाईल्स), संगमरवरी दगड, भट्टीच्या विटा, विटा, सर्व प्रकारची छपरी कौले, फलोरिंग टाईल्स, फरशीच्या लाद्या इ., चायना मोझॅक चिप्स, मोझाईकचा संगमरवरी दगड, मोझाईक किंवा टेरॅझोची कौले, मातीचे नळ, चिनी मातीचे नळ, सिमेंटचे नळ आणि ॲसबेस्टॉस सिमेंटचे पत्रे. | ६.०० | १.०० | ३.०० |
| ४७ | पिवळी माती इतर कोणत्याही प्रकारची माती, वाळु, धातु, डबर, मुरुम व खडी | ३.०० | १.०० | १.०० |
| ४८ | रंग, डिसटेम्पर व कलर वॉशेस आणि इमारतीत रंग देण्यासाठी वापरावयाचे इतर साहित्य, वॉरनिश, अळशीचे उकळविलेले तेल, टर्पेनटाईन, झिंक ऑक्साईड व रेड ऑक्साईड,रंगद्रव्ये यांचे मिश्रण व त्याचे घटक,कोटींग पावडर. | ५.०० | १.०० | ३.०० |
| ४९ | काच, काचेच्या वस्तु, चिनी मातीच्या वस्तु, एनमलच्या वस्तु व इमारतीच्या व सॅनेटरी फिटींगच्या बांधणीसाठी किंवा सुशोभित करण्यासाठी वापरण्यात येणारी सर्व प्रकारची कोकरी, धातुची व्हॉल्व्ह, तांब्याच्या तोटया व त्याची उपकरणे | ५.०० | १.०० | ३.०० |
| ५० | रुफिंग फेल्ट | ५.०० | १.०० | ३.०० |
| ५१ | इमारती लाकुड, बल्ल्या, बांबु, वेत व त्यापासुन तयार केलेल्या वस्तु, दरवाजे, खिडक्या, चौकटी, खुंटया, जिने, चंदणाचे लाकुड व अशा लाकडापासुन तयार केलेल्या वस्तु | ७.०० | १.०० | ३.०० |

| बाब क्र. १ | मालाचा प्रकार २ | जकात किंमतीवर शेकडा दर | | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| | | कमाल दर ३ | किमान दर ४ | शेकडा किंमतीवर (%) ५ |
| ५२ | प्लायवुड, सॉफ्टबोर्डस्, हार्डबोर्डस्, मॅसोलाईट किंवा कोणतेही घटक असलेले व कृत्रिम प्रक्रियेने तयार करण्यात आलेले इतर कोणतेही प्रकारचे लाकुड व त्यापासुन तयार केलेल्या वस्तु, सनमायका,फोरमायका,व्हिनिअर व त्यासारख्या इतर वस्तू. | ७.०० | १.०० | ३.०० |
| **वर्ग ५ :** | **सुगंधी द्रव्ये, प्रसाधने, रंग व घरगुती सामान** | | | |
| ५३ अ | केसांचे तेल, सुंगधी तेल, सर्व प्रकारची सुंगधी द्रव्ये, सेंट्स, अत्तरे, सुंगधीत वस्तु, उदबत्त्या, सुंगधीत रसायने, सर्व प्रकारची सौदर्य प्रसाधने, दाढीची क्रिम, दाढीचा साबण, दंतमजन, टूथपेस्ट, पोमेड, कंगवे, ब्रश, आरसे, केसांच्या पिना, ब्रेसेस, गार्टस व सस्पेंडर्स | ७.०० | १.०० | ३.०० |
| ५३ ब | कात्र्या, वस्तरे, सेफटी रेझर्स, ब्लेडस्, सुरी, चाकू, चमचे, काटे, कटलरी सर्व प्रकारची, सर्व प्रकारच्या सु-या, कुलूप व किल्ल्या, स्टोव्ह व पेट्रोमॅक्स आणि त्यांचे भाग व उपसाधने आणि लोखंडी सामान | ५.०० | १.०० | ३.०० |
| ५३ क | लेसेस, टेप्स, लाकडी व धातुच्या रिंग, भरतकामाच्या वस्तु, सेल्युलाईड व सेल्युलाईडच्या वस्तु, सर्व प्रकारची मनी, कृत्रिम मोती, प्लास्टिक व प्लास्टिकचा माल, प्लास्टिक पावडर व दाणा, बेकेलाईट व बेकेलाईटचा माल, हस्तीदंत व हाडे यापासुन बनविलेल्या वस्तु, सर्व प्रकारची बटणे, किरकोळ जीन्नस (हॅबरडॅशरि) फायबर. | ५.०० | १.०० | ३.०० |
| ५३ ड | लाकडी, लोखंडी, पोलादी, वेताचे इ. सारखे सर्व प्रकारचे फर्निचर | ५.०० | १.०० | ३.०० |
| ५३ ई | छत्र्या, रेनकोटस्, पावसाळी हॅटस् व टोप्या | ४.०० | १.०० | ३.०० |
| ५४अ | सोने | ३.०० | १.०० | १.०० |
| ५४ ब | चांदी | ३.०० | १.०० | १.०० |
| ५४ क | सोने व चांदी यापासुन बनविलेले दागिने व वस्तु | ५.०० | १.०० | १.०० |
| ५४ ड | इतर मौल्यवान धातु व त्यापासुन बनविलेले दागिने व वस्तु | ५.०० | १.०० | ३.०० |
| ५४ इ | कृत्रिम दागिने व जवाहीर | ५.०० | १.०० | ३.०० |
| ५४ फ | सर्व प्रकारची खेळणी , क्रिडा व खेळाच्या वस्तु | ५.०० | १.०० | ३.०० |
| ५५ | (बांधकामाच्या किंवा इमारत सुशोभित करण्यासाठी वापरण्यात येणा-या वस्तुखेरीज) सर्व प्रकारच्या कोकरीच्या वस्तु (कोकरी) | ५.०० | १.०० | ३.०० |
| ५६ | बांगडया, बाटल्या (बांधकामाच्या व इमारत सुशोभित करण्यासाठी वापरण्यासाठी वापरण्यात येणा-या वस्तु खेरीज) चिनीमातीच्या वस्तु व पोर्सलेनच्या व मातीच्या वस्तु यांसह काच व काचसामान | ५.०० | १.०० | ३.०० |
| **वर्ग ६** | **तंबाखू व तंबाखूच्या वस्तू** | | | |
| ५७ | सिगारेटस् व सिगार, सिगार, व सिगारेट होल्डर्स, स्मोकिंग पाईप, सिगारेटचा कागद पाईपचा, पाईपसाठी वापरला जाणारा तंबाखू, तंबाखूच्या केसेस, पोचेस, सिगार व सिगारेट ठेवण्याच्या डब्या, हुक्का व धुम्रपानासाठी आवश्यक वस्तु व सिगारेट लायटर्स,निकोटीन मिश्रीत प्रक्रिया केलेली तंबाखू व गुटखा,जर्दा,पानमसाला तंबाखूसह व तंबाखू नसलेला. | ७.०० | १.०० | ५.०० |
| ५८ अ | बिछोरा, फाडी, सरसा, चुरामाल धंतल | ५.०० | १.०० | ५.०० |
| ५८ ब | बिडया व तपकिर तयार करण्यासाठी तंबाखू व खाण्याचा तंबाखू | ५.०० | १.०० | ५.०० |
| ५९ | विडया व तपकिर | ५.०० | १.०० | ५.०० |
| ६० | विडयांची पाने , तेंदूची पाने | ३.०० | १.०० | १.०० |
| **वर्ग ७ :** | **कापडाचे तागे व इतर कापड व वस्तु चामडे व चामडयाच्या वस्तु व रबरी माल** | | | |
| ६१ | लोकरी, रेशीम, लीनन, ताग, कापुस, कृत्रिम व सिन्थेटिक वस्तुचे कापड व वरील वस्तुपैकी कोणत्याही एकाच्या किंवा अशंतः असा वस्तुच्या व अन्य निर्दिशिष्ठ करण्यात आल्या नसतील अशा वस्तु आणि वरील | ५.०० | १.०० | २.०० |

| बाब क्र. १ | मालाचा प्रकार २ | जकात किंमतीवर शेकडा दर | | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| | | कमाल दर ३ | किमान दर ४ | शेकडा किंमतीवर (%) ५ |
| | वस्तुपासुन बनविण्यात आलेले तयार कापड | | | |
| ६२ अ | सरकी काढलेला कापुस | ३.०० | १.०० | १.०० |
| ६२ ब | सरकी न काढलेला कापुस | ३.०० | १.०० | १.०० |
| ६३ | टाकाऊ कापुस, टाकाऊ सुत व टाकाऊ लोखंड सामान (हार्ट वेस्ट) | ३.०० | १.०० | ३.०० |
| ६४ | कच्ची किंवा न कातलेली लोकर, हेम्प, ताग, नारळाचे व इतर तंतु आणि त्यापासुन बनवलेले दारे व इतर वस्तु व कंतान. | ५.०० | १.०० | ३.०० |
| ६५ | सूत व सर्व प्रकारचा दोरा | ५.०० | १.०० | २.०० |
| ६६ | सर्व प्रकारची खळ (स्टार्चेस), साबुदाणा तांदुळ व त्याचे पीठ, अरारुट, टॅपिओका व त्याचे पीठ, चिंचेची पावडर, फारिना स्टार्चेस व कांजीच्या वस्तु, चरबी सायझिंग ऑईल्स व अशा त्याऐवजी वापरण्यात येणा-या वस्तु | ५.०० | १.०० | ३.०० |
| ६७ | चामडी व कातडी | ४.०० | १.०० | ३.०० |
| ६८ | खोगीर (हारनेस) जीन, पेटया, ट्रंक, जोडे, चप्पल, स्लिपर, सॅन्डल, पट्टे आणि कातडयाच्या सर्व वस्तु | ५.०० | १.०० | ३.०० |
| ६९ | सर्व प्रकारचे रबरी टायर्स व टयुब्ज | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७० | रबर, रबरी माल, गटापर्चा व त्यापासुन (पुर्णतः व अशंतः) बनविलेल्या वस्तु, रबर, सोल्युशन, कच्चे रबर व लॅटेक्स पण त्यापासुन बनविलेली खेळणी सोडून | ५.०० | १.०० | ३.०० |
| **वर्ग ८ :** | **धातु व धातूच्या वस्तू** | | | |
| ७१ | लोखंड व पोलाद | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७१ अ | पिग आयर्न | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७१ ब | ब्ल्युम्स बिलेटर्स व स्लॅब्स | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७१ क | बांधकाम विषयक (स्ट्रक्चरल) १) जॉइस्टस, २) चॅनल्स, ३) अँगल्स ईक्वल किंवा अनईक्वल, ४) बल्ब्स किंवा टी, ५) लाईट रेल्स, ६) लाईट रेल्ससाठी फीश प्लेट, ७) शेल,पोलाद,इनगॉटस,ब्ल्युम्स, बिलेटस व बार्स, ८) ब्लॅक किंवा गॅलव्हानाईज्ड शीट, प्लेन किंवा कॉरागेटेड, ९) प्लेटस बॉयलर व हाय टेन्साईल शिप बिल्डींग किंवा बुलेटप्रुफ पोलाद धरुन साधारण सौम्य पोलाद, १०) गज व सळया ११) स्प्रिंगचे पोलाद, व्हेहिक्युलर किंवा प्लॅटबार्स,१२) हुप्स व पट्टया,१३)नळ १४) बोल्टस्,नटस्,वॉशर्स,रिव्हेटस् व अशा इतर वस्तु १५) काटेरी तार,टेलिग्राफच्या किंवा ब्लॅक गॅलव्हनाईज्ड इतर प्रकारच्या तारा,१६) तारेचे खिळे | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७२ | १) लोखंड २) पोलाद यांची मोड (स्क्रॅप) | ४.०० | १.०० | १.२५ |
| ७३ | लोखंड व पोलाद विशिष्ट रित्या तरतुद करण्यात आली नसेल अशी कटलरी लोखंडी सामान व यंत्रे किंवा यंत्राचे भाग खेरीज करुन लोखंड वा पोलाद यापासुन बनविलेल्या इतर कोणत्याही वस्तु | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७४ अ | यंत्रसामुग्री व त्यांचे पुरक व सुटे भाग - वीज निर्मिती प्रक्षेपण व वितरण यासाठीची विज यंत्रसामुग्री व मोटर्स व जनरेटर्स व त्यांचे घटक भाग व सुटे भाग, २) सेल्स बॅटरी व तांब्याच्या पट्टया हार्न इलेक्ट्रीक यासह वीज माल, ३) वीजेची उपसाधणे सामुग्री, ४) विजेची घरगुती उपकरणे, ५) सर्व प्रकारची वीज यंत्रसामुग्री, कंट्रोल स्वीच, गियर जनरेटर्स, ऑल्टरनेटर्स व डायनॅमो, मोटर्स, ट्रान्सफॉर्मर्स व टर्बोजनरेटींग सेटस | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७४ ब | शेतीची यंत्रसामुग्री व भाग | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७४ क | तेल इंजिन, डिझेल इंजिन, वाफेची इंजिने, पेट्रोल व गॅस इंजिने व हायड्रोलिक प्रेशरवर चालणारी यंत्रे व त्याचे सुटे भाग | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७४ ड | सर्व प्रकारची हत्यारे, | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७४ इ | मुद्रण यंत्र व त्याचे सुटे भाग | ५.०० | १.०० | ३.०० |

| बाब क्र. १ | मालाचा प्रकार २ | जकात किंमतीवर शेकडा दर | | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| | | कमाल दर ३ | किमान दर ४ | शेकडा किंमतीवर (%) ५ |
| ७४ फ | विशिष्टरित्या तरतुद करण्यात आलेली नसेल अशी इतर कोणतीही यंत्रसामुग्री, तिचे पुरक व सुटे भाग | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७५ अ | वाहने<br>मोटारी, मोटारसायकली, चेसीस व मालमोटारी, ट्रॅक्टर्स, विमाने, हेलिकॅप्टर, क्रेन्स, ट्रेलर, फोरकलीप मशिन, बुलडोझर, एस्केव्हेटर, रोडरोलर, जेसीबी, क्रॉंक्रीट मिक्सर व त्याचे घटक व सुटे भाग. | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७५ ब | दुचाकी (सायकली) बाबा गाडया, गाडया, सर्व प्रकारची वाहने व त्यांचे घटक भाग व सुटे भाग | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७६ अ | उपकरणे, उपकरण संच व उपयंत्रे व त्याचे भाग<br>शिवणयंत्रे, घडयाळे व मनगटी घडयाळे, टंकलेखन यंत्र व त्याचे सुटे भाग | ६.०० | १.०० | ४.०० |
| ७६ ब | रेडिओ, रेडिओग्राम, टेलिव्हिजन सेट, उपकरण संच, लाऊडस्पिकर, ग्रामोफोन्स, अेम्प्लीफायर्स, बिनतारी यंत्र, त्याचे घटक भाग व सुटे भाग व सर्व प्रकारची वाद्ये | ६.०० | १.०० | ४.०० |
| ७६ क | फोटोग्राफिक यंत्र सामुग्री, फोटोविषयक रसायने, फिल्डस् व माऊंटस् व त्याचे घटक व सुटे भाग यासह फोटोविषयक माल व वस्तु | ६.०० | १.०० | ४.०० |
| ७६ ड | सिने प्रोजेक्शन यंत्रसामुग्री व त्याचे घटक व सुटे भाग व त्यामध्ये वापरण्यात येणा-या वस्तु | ६.०० | १.०० | ४.०० |
| ७६ इ | सर्वेक्षण उपकरण संच | ६.०० | १.०० | ४.०० |
| ७६ फ | वैज्ञानिक उपयंत्रे | ६.०० | १.०० | ४.०० |
| ७६ ग | नेत्रोपचार विषयक (ऑप्टिकल) माल, शल्य उपकरणे व रुग्णालय विषयक वस्तु व त्यांचे सुटे भाग व उपसाधने,वैदयकिय/सर्जिकल/डेन्टल व पशुवैद्यकिय उपकरणे/यंत्र,सहयंत्र व त्यांचे सुटे भाग. | ६.०० | १.०० | ४.०० |
| ७६ ह | कृसिबल्स सुती दोर धरुन मिल व जीन सामुग्री | ६.०० | १.०० | ४.०० |
| ७६ य | सर्व प्रकारची इलेक्ट्रॉनिक्स यंत्र,सहयंत्र,यंत्रसामुग्री, उपकरण संच व उपयंत्रे व त्याचे सुटे भाग,संगणक संच व त्याचे सुट्टे भाग,हार्डवेअर व सॉप्टवेअर व त्याचे साहित्य,मोबाईल हॅन्डसेट,प्रिपेड कार्ड, सिमकार्ड, पोस्टपेड कार्ड व त्यांचे घटक व सुटे भाग, टेलिफोनसाठी वापरल्या जाणा-या फायबर ऑप्टीक केबल्स. | ६.०० | १.०० | ४.०० |
| ७७ | अलोह धातु म्हणजेच पितळ, तांबे (तांबे व पितळ यांचे सर्कल (पत्रे) व तांबे व पितळेची मोड वगळुन) टिन, ॲल्युमिनीयम शिसे, जस्त, जर्मनसिल्व्हर, स्टेनलेसस्टिल व त्यांचे मिश्र धातु, तारा, पत्रे, इंगॉटस् व सर्कल, कास्टींग व फोर्जिंग, त्यापासून बनविलेले सामान व वस्तू तांब्याची व पितळेची भांडी | ५.०० | १.०० | ३.०० |
| वर्ग ९ : | इतर | | | |
| ७८ | रंग द्रव्ये, टॅन्स, निळ व मुद्रणाची पेस्ट व शाई धरुन रंगविषयक सर्व वस्तु | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७९ | कागद,नवीन स्टेशनरी,जाहिरात फलक, पोस्टर्स, पॅम्प्लेटस्,कॅटलॉग, डायरी, वहया, क्वायरबोर्डस्, कॅलेंडर्स, सर्व प्रकारच्या फाईल्स, लॉटरी तिकीटे,चेकबुक्स,प्लेईग कार्डस् इत्यादी. | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७९ अ | न्युजप्रिंट (वृत्तपत्रीय कागद) | ३.०० | ०.५० | १.०० |
| ७९ ब | कार्डबोर्डस्, ग्रेबोर्डस् व मिल बोर्डस् | ५.०० | १.०० | ३.०० |
| ७९ क | कोणत्याही मिश्रणाचे व जाडीचे सर्व प्रकारचे कागद | ५.०० | १.०० | ३.०० |
| ८० | लाख व बुच (कॉर्क) व त्यापासुन केलेल्या वस्तु | ५.०० | १.०० | ३.०० |
| ८१ | लाकुड, दगड, चिकनमाती किंवा धातु यावर कोरीव काम केलेल्या वस्तु व इतर वस्तु व इतर मातीची भांडी | ५.०० | ३.०० | ३.०० |
| ८२ | अन्य निर्दिष्ठ करण्यात न आलेली चिनीमातीची भांडी, पोर्सोलेनची भांडी व विद्युत इन्सुलेटर्स | ५.०० | ३.०० | ३.०० |

| बाब क्र. १ | मालाचा प्रकार २ | जकात किंमतीवर शेकडा दर | | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| | | कमाल दर ३ | किमान दर ४ | शेकडा किंमतीवर (%) ५ |
| ८३ अ | कच्च्या सिनेमा फिल्म्स् | ४.०० | १.०० | ३.०० |
| ब | प्रक्रिया केलेल्या सिनेमा फिल्म्स् व रिळे | ४.०० | १.०० | ३.०० |
| क | फिल्मचे रोल | ४.०० | १.०० | ३.०० |
| ८४ | काकवी (मळी) | ३.०० | १.०० | १.०० |
| ८५ | रासायनिक खते फक्त शेती उपयोगाकरीता. | जकात माफी | | - |
| ८६ | वरील कोणत्याही बाबीत समाविष्ट न केलेल्या आणि अनुसूची दोन मध्ये विशेषत: सूट देण्यात न आलेल्या वस्तू. | ५.०० | १.०० | ३.०० |
| लेखी परवानगी नी परिवहन पास फी रक्कम रुपये ५०/- | | | | |
| मार्गस्थ दाखला (एस्कॉर्ट) रक्कम रुपये ५०/- | | | | |

दिनांक : / /२००६

ठिकाण : नाशिक

आयुक्त,
नाशिक महानगरपालिका,नाशिक

## औद्योगिक उपक्रमांकडून कच्चा माल म्हणून आयात होणा-या मालावर सवलतीच्या दराने जकात देय मालाची यादी.

प्रचलित जकात रिवाजपटाचे अनुसूची २ भाग-१ अ नुसार खालील नमुद केलेल्या बाबींमध्ये समाविष्ट होणारा माल औद्योगिक संस्थांनी कच्चा माल म्हणून उपयोग करण्यासाठी आयात केल्यास व आयातीच्या वेळी सदर औद्योगिक उपक्रमाने नमुना नं.१४ मध्ये त्या संबंधी प्रतिज्ञापन सादर केल्यास मालाची व बिलाची खात्री करुन त्यावर खालीलप्रमाणे सवलतीच्या दराने आकारणी करणेत यावी. परंतु सदरचा माल हा एखादया उपक्रमाने/फर्मने विक्रीकरीता/ट्रेडींगकरीता आयात केल्यास नियमित दराने आकारणी करण्यात यावी.

### अनुसूची - २
### भाग - १ अ

| औद्योगिक वापरासाठी आयात होणारा कच्च्या मालावरील सवलतीचे जकात दर | | |
|---|---|---|
| बाब क्र. | मालाचा प्रकार | प्रस्तावित दर |
| | | दर शेकडा किंमतींवर |
| | | |
| ३५ | अखाद्य तेलाच्या तेल बिया | १.२५ |
| ४० अ | खाद्य म्हणून उपयोगात न येणा-या सर्व प्रकारची अखाद्य चरबी,वराव (टॅलो) डुकरांची पातळ चरबी (लार्ड)इ. | १.२५ |
| ४० ब | सर्व प्रकारची रसायने,सोडियम सल्फेट,सायझिंग सल्फेट,लोखंडाचे सल्फेट,तांब्याचे सल्फेट,ॲल्युमिनीयमचे सल्फेट,सोडयाचे शैलीक (सिलीकेट) कॉस्टीक सोडा आणि अन्य विनिर्दीष्ट केलेले नसतील असे इतर क्षार,सल्फर,पोटॅश,क्लोराईड,स्ट्रॉटीया,झिंक क्लोराईड,मॅग्नेशियम क्लोराईड,सॉल्ट पेट्रे,सर्व प्रकारची आम्ले,सॅलॅमोनिक,बोरेक्स,पांजणीचे पिठ | १.२५ |
| ६४ | कच्ची व न कातलेली लोकर,हेम्प,ताग, नारळाचे व इतर तंतू आणि त्यापासून बनवलेले दोर व इतर वस्तू | १.२५ |
| ६५ | सुत व सर्व प्रकारचा दोरा | १.२५ |
| ७० | नैसर्गिक कच्चे रबर व लॅटेक्स | १.२५ |
| ७१ | लोखंड व पोलाद<br>अ)पीग आयर्न ब)ब्लुम्स बिलेटर्स व स्लॅब्स क) बांधकाम विषयक (स्ट्रक्चरल) १)जॉईन्टस्,२)चॅनल्स्,३)ॲगल्स् इक्वल किंवा अनइक्वल,४)बल्ब्स किंवा टी ५)लाईट रेल्स् ६) लाईट रेल्ससाठी फिश प्लेट ७)शेल पोलाद इनगॉटस् ब्लुम्स्,बिलेटस् व बार्स ८) ब्लॅक किंवा गॅल्व्हनाईज शीटस् प्लेन किंवा कोरागेटेड ९)प्लेटस् बॉयलर व हायटेन्साईल शिप बिल्डींग किंवा बुलेटप्रुफ पोलाद धरुन साधारण सौम्य पोलाद १०)गज व सळया ११) बोल्टस् नटस्,वॉशर्स,रिव्हेटस् व अशा इतर वस्तु १२) काटेरी तारा,टेलिग्राफच्या किंवा ब्लॅक गॅल्व्हनाईजच्या इतर प्रकारच्या तारा १३) तारेचे खिळे १४) स्प्रिंगचे पोलाद,हेवीकुलर किंवा फ्लॅट बार्स १५)हुप्स् व पट्टया १६) नळ | १.२५ |
| ७७ | अलोह धातू म्हणजेच पितळ,तांबे,टीन,ॲल्युमिनीयम,शिसे,जस्त,जर्मन सिल्वर,स्टेनलेस स्टील्स् व त्याचे मिश्र धातू,तारा,सामान,पत्रे,इन्गॉटस् व सर्कल व त्यापासून बनविलेल्या वस्तू, तांब्याची व पितळाची भांडी | १.२५ |

दिनांक : / /२००६

ठिकाण : नाशिक

आयुक्त,
नाशिक महानगरपालिका,नाशिक

नाशिक महानगरपालिका,नाशिक

## नाशिक महानगरपालिका प्रारुप जकात नियमावली - २००५ तयार करणे.

**- समिती बैठकीचा वृत्तांत -**

**सभा क्र. : ६** **दिनांक : ६/०२/२००६**

**नाशिक महानगरपालिका महासभा ठराव क्रमांक १२० दिनांक १/६/२००५ अन्वये गठीत करणेत आलेल्या जकात नियमावली समितीची मिटींग दि. ६/२/२००६ रोजी मा.उपमहापौर सो.यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृह,मनपा मुख्यालय,नाशिक येथे संपन्न झाली असता सदर बैठकीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | मा.पांडे विनायक किशोर,उपमहापौर | अध्यक्ष |
| २. | मा.विनिता सिंगल,आयुक्त | सदस्या |
| ३. | मा.गिते वसंतराव निवृत्ती | सदस्य |
| ४. | मा.साने विजय राजाराम | सदस्य |
| ५. | मा.आढाव दिनकर गोटीराम | सदस्य |
| ६. | मा.कांबळे उत्तमराव एलिया | सदस्य |
| ७. | मा.काठे गणपतराव पुंडलिक | सदस्य |
| ८. | मा.लोंढे प्रकाश मोगल | सदस्य |
| ९. | मा.फडोळ एच.डी,सहा.आयुक्त (कर) | सदस्य |
| १०. | मा.देशमुख अे.बी. , प्र.नगरसचिव | सदस्य |

सदर बैठकीत खालील विषयावर चर्चा करणेत आली.

**विषय क्रमांक - १ : नाशिक महानगरपालिकेची प्रारुप जकात नियमावली तयार करणे बाबत.**

महासभा ठराव क्रमांक ९२९ दिनांक १९/१२/२००५ अन्वये जकात नियमावली संदर्भात दि.२७/१२/२००५ रोजी दै.सकाळ व दै.पुण्यनगरी तसेच दि.२८/१२/२००५ रोजी दै.लोकमत या वृत्तपत्रातून जाहीर प्रकटन देऊन जनतेच्या हरकती व सुचना मागविण्यात आल्या होत्या.त्यानुसार प्राप्त झालेल्या एकुण १९ सुचना अर्ज बैठकीमध्ये वाचून दाखविण्यात आल्या. व त्यावर सविस्तर चर्चा करणेत आली. व खालील प्रमाणे सुचनांबाबत समितीचे वतीने निर्णय घेण्यात आला.

१) वजनाऐवजी किंमतीवर जकात आकारणी करण्याचे धोरण निश्चीत झाले असल्याने वजनावर जकात आकारणी करणे योग्य राहणार नाही. सर्व मालाचे किंमतीवर जकात आकारणी करणेत यावी. किंमती करीता दरमहा विविध प्रकारच्या मालाचे बाजारभाव निश्चीत करुन ते जकात नाक्यावर पाठविणेत यावेत.

२) मालाची एमआरपी किंमती गृहीत धरुन जकात आकारणी करणेत यावी.कारण ब-याच मालांच्या आयातीचे वेळेस कच्चे बिले सादर करणेत येतात. त्यामध्ये मोठयाप्रमाणात किंमतीची तफावत आढळून येत असल्याने आकारणी करतांना मनपाचे नुकसान होत असते. अशावेळी एमआरपी किंमत गृहीत धरुन आकारणी करणे योग्य राहिल. जर मालासोबत मुळ टॅक्स बिल असल्यास बिलाप्रमाणे आकारणी करणेत यावी.

३) फळे यावर जकात माफी देणेबाबतची मागणी फेटाळणेत येत आहे कारण बहुतांशी फळांची आवक ही इतर जिल्हा व राज्यातून होत असल्यामुळे स्थानिक शेतक-यांना किंवा व्यापा-यांना त्याचा लाभ होणार नाही. त्यामुळे त्यावरील किंमतीमध्ये कोणत्याही प्रकारचा फरक पडणार नसल्याने जकात माफी देणे योग्य होणार नाही.

४) कांदे, बटाटे, सुके लसुण,लाल मिरची व हिरव्या पालेभाज्या यावरील मागिल दोन ते तीन आर्थीक वर्षातील जकात वसुलीचा आढावा घेता सदर मालावर माफी देणेबाबतचा निर्णय घेण्यात येत आहे.

५) सिमेंट,स्टील व प्लायवूड या मालावर सध्या अस्तित्वात असलेल्या दरामध्ये ०.५० टक्क्याने वाढ करुन जकात आकारणी करण्याचे ठरविण्यात येत आहे.

६) सोने,चांदी व त्यापासून बनविणेत आलेले दागिने या मालाची सुध्दा मागिल तीन वर्षाची जकात वसुलीची आकडेवारी बघता पाहिजे त्याप्रमाणात सोने चांदी व्यापारी जकात भरत नसल्याने त्या मालाच्या जकात दरामध्ये सोने व चांदी यावर किंमतीवर शेकडा ०.५० टक्के व त्यापासून बनविलेले दागिने व वस्तू यावर किंमतीवर शेकडा १ टक्का या दराने जकात आकारणी करावी.

७) सुकी मासळी,सुकट,झिंगे,बोंबील,ताजी मासळी यावर जकात माफी देता येणार नाही. तसेच सदर मालाची वजनावर आकारणी करणेत येणार नाही कारण किंमतीवर जकात आकारणी करणेचे धोरण निश्चीत करणेत आले आहे. त्यानुसार सदर मालावर १ टक्का दराने आकारणी करण्यात यावी.

८) रेकॉर्ड तपासणी बाबत सध्याचे नियमामध्ये तरतूद नसल्यामुळे कोणा एका आयातीकाचे/व्यापा-याचे/फर्मचे रेकॉर्ड तपासणी करणेस अडचण निर्माण होत असतात त्यामुळे जकात रेकॉर्ड तपासणी बाबतची तरतूद करणेत येत आहे. त्यामध्ये मागिल तीन वर्षाचे रेकॉर्ड तपासणीचे मनपास अधिकार ठेवण्यात यावे. असे ठरविणेत येत आहे.

विषय क्रमांक - २ : **मे.मोटार इंडस्ट्रीज कंपनी लि.सातपूर व मे.महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनी लि.सातपूर यांचे (EOU) प्रोजेक्ट करीता आयात होणा-या मालावर जकात माफी व इतर करात सवलती देणे बाबत.**

महासभा ठराव क्रमांक ९२९ दिनांक १९/१२/२००५ अन्वये तसा प्रस्ताव मा.शासनाकडेस पाठविणेत आला होता त्यानुसार सदर बाबत मा.उपसचिव,नगरविकास विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.नामनपा/१९०५/८९६/प्र.क्र.१९१/०५ नवि-२५ दि.१/२/२००६ चे

पत्रासोबत दि.३१/१/२००६ चा शासननिर्णय पाठवून मे.महिंद्रा ॲन्ड महिंद्रा व मे.मोटार इंडस्ट्रीज कंपनी लि.यांचे कॉमन रेल (**DSLP**) इंजेक्टर प्रोजेक्ट करीता आयात होणा-या मालावर जकात माफी/सवलत देणे बाबत कळविले आहे. सदरचे पत्र व शासननिर्णय समिती बैठकीत वाचून दाखविणेत आला. त्यावर समितीने शासनाचे पत्राप्रमाणे जकात सवलती बाबत खालील प्रमाणे टप्पे ठरवून त्याप्रमाणे कार्यवाही करणेस मंजुरी दिली.

**पहिल्या वर्षी - ०.५ टक्के**
**दुस-या वर्षी - ०.५ टक्के**
**तिस-या वर्षी - १.०० टक्के**
**चौथ्या व पाचव्या वर्षी - २.०० टक्के**

वरील पाच वर्षाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर नियमित दराने जकात आकारणी करणेत यावी.

येणेप्रमाणे कामकाज झालेनंतर बैठक संपल्याचे जाहिर करणेत आले.

| उपस्थित समिती सदस्यांचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|
| १. मा.पांडे विनायक किशोर,उपमहापौर | ..................................... |
| २. मा.विनिता सिंगल,आयुक्त | ..................................... |
| ३. मा.गिते वसंतराव निवृत्ती | ..................................... |
| ४. मा.साने विजय राजाराम | ..................................... |
| ५. मा.आढाव दिनकर गोटीराम | ..................................... |
| ६. मा.कांबळे उत्तमराव एलिया | ..................................... |
| ७. मा.काठे गणपतराव पुंडलिक | ..................................... |
| ८. मा.लोंढे प्रकाश मोगल | ..................................... |
| ९. मा.फडोळ एच.डी,सहा.आयुक्त (कर) | ..................................... |
| १०.मा.देशमुख अे.बी. , प्र.नगरसचिव | ..................................... |

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

# प्रस्तावित जकात दरपत्रक